CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २२ नोव्हेंबर २०२४। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com








## महत्त्वाचे

### विक्रीच्या माऱ्यात शेअर बाजार कोसळला

**मुंबई** : अदानी समूहाच्या शेअर्सच्या विक्रीच्या माऱ्यामुळे मोठ्या घसरणीचा फटका गुरुवारी भारतीय शेअर बाजारांना बसला. सेन्सेक्स ४२२ अंकांनी घसरून ७७,१५५ वर बंद झाला. निफ्टी १६८ अंकांच्या घसरणीसह २३,३४९ या पातळीवर स्थिरावला.



अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्यासह सात जणांवर अमेरिकेतील कोर्टात लाचखोरी आणि फसवणुकीचा आरोप निश्चित करण्यात आला. याचे पडसाद शेअर बाजारात उमटले. अदानी समुहातील काही कंपन्यांचे शेअर्स आज २० टक्क्यांपर्यंत घसरले. यामुळे अदानी समूहाचे बाजार भांडवल २.२५ लाख कोटींनी कमी होऊन १२ लाख कोटींवर आले. आरोपानंतर अदानी समूहाशी संबंधित कंपन्यांच्या शेअर्संना फटका बसला. आजच्या घसरणीचा फटका बसल्याने बीएसईतील सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ५,२७,७६७,.५७ कोटी रुपयांवरून घसरून ४,२५,३८,९०८ कोटी रुपयांवर आले.

### पीएम आवास योजनेची नोंदणी महिलांच्या नावावर

**नवी दिल्ली** : महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलताना केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात केवळ महिलांनाच घराचे मालकी हक्क देण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान आवास योजनेला बुधवारी आठ वर्षे पूर्ण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये आगरा येथे ही योजना सुरू केली होती. दुसऱ्या टप्प्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण मंत्रालयाने प्रक्रिया सुरू केली आहे. याअंतर्गत लाभार्थ्यांची ओळख पटावी, यासाठी सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील घरांमध्ये सेल्फ सबमिशनची सुविधा देण्यात आली असून, या योजनेत नाव देवू इच्छिणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या फोटोसह ॲपवर अर्ज करता येणार आहे.

### राज्यात महायुतीचेच सरकार येणार

**मुंबई** : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक बुधवारी म्हणजेच 20 नोव्हेंबरला पार पडली आहे. या निवडणुकीत कुणाला किती मतं मिळाली आहेत हे २३ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहे. मात्र आता जे एक्झिट पोल समोर येत आहेत त्यानुसार राज्यात महायुतीचं सरकार येईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बुधवारी जे ९ विविध पोल्स आले आहेत त्यापैकी ६ पोल्सनीही हाच अंदाज वर्तवला होता. आता ॲक्सिस माय इंडियाने भाजपा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल आणि १७८ ते २00 जागा मिळतील हा अंदाज वर्तवला आहे. आता नेमकं काय होणार हे चित्र २३ नोव्हेंबरला म्हणजेच येत्या शनिवारी स्पष्ट होणार आहे.

### अजित पवारांना बारामती कोर्टाचे समन्स

**बारामती** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानसभा निवडणुकीच्या निकालाआधी बारामती कोर्टाकडून समन्स बजावण्यात आलं आहे. २०१४ च्या निवडणुकांमध्ये केलेल्या एका वक्तव्यामुळे बारामतीच्या कोर्टाकडून समन्स बजावण्यात आलं आहे. बारामती कोर्टाने अजित पवार यांना आपली बाजू न्यायालयात मांडण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे अजित पवार कोर्टात काय भूमिका मांडतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या अडचणी वाढल्या आहेत. अजित पवार यांना बारामती कोर्टात हजर राहण्यासाठी समन्स बजावण्यात आले आहे. आता १६ डिसेंबर रोजी अजित पवार यांना कोर्टात हजर राहून आपली बाजू मांडावी लागणार आहे. २०१४ सालच्या निवडणुकीदरम्यान, अजित पवारांनी केलेल्या एका वक्तव्यासंदर्भात हे सगळ प्रकरण आहे. माझी आयपीएस अधिकारी सुरेख खोपडे यांनी याचिका दाखल केली होती.

# ३० वर्षांतील दुसरे सर्वाधिक मतदान

**● महिलांचा सहभाग वाढला ● प्रथम मतदान करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ**

◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

१५ व्या विधानसभा निवडणुकीतील राज्याच्या मतदानाची टक्केवारी ६५.११ टक्के इतकी आहे. मतदानाची ही टक्केवारी १९९५ नंतरची दुसरी सर्वात मोठी आहे. १९९५ मध्ये राज्यात ७१.६९ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर मागील ३० वर्षांतील सर्वाधिक मतदान यंदा झाले आहे.

१९९५ मध्ये मतदानाने नवा विक्रम प्रस्थापित केला होता. मतदानाची टक्केवारी वाढली आणि युतीचे सरकार राज्यात स्थापन झाले होते. त्यानंतर मतदारांमध्ये मतदानाविषयी उदासिनता दिसली. १९९५ नंतर सलग सहा निवडणुकांमध्ये मतदारांनी निराश केल्याचे चित्र पहायला मिळाले. १९९९ ते २०१९ या काळात मतदानाची टक्केवारी ६० ते ६३ टक्क्यांच्या मध्येच राहिली. केवळ २००९ मध्ये ती अत्यंत कमी म्हणजे ५९.०६ टक्के एवढी होती. यावेळी विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाच्या मतदानाची नोंद झाली आहे.

याच कालावधीत लोकसभेची आकडेवारी मात्र उलट राहिली असून, १९९५ मध्ये ७१.६९ टक्के मतदानाच्या विक्रमाची नोंद झाली. हा विक्रम आजही तुटला नाही. त्याच्या पुढच्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मात्र ५२.०४ टक्के अशी अत्यंत कमी मतदानाची नोंद झाली होती. १९९६ ते २०२४ या काळात झालेल्या लोकसभेच्या सहा निवडणुकांमध्ये २००९ च्या निवडणुकीत ५०.०५ टक्के सर्वांत कमी मतदान झाले होते. तर, सर्वाधिक मतदानाची नोंद २०१९ मध्ये ६४.०१ एवढी झाली होती.



**मतदान टक्केवारी**

| विधानसभा |
|---|
| १९९५- ७१.६९ |
| १९९९- ६०.०९ |
| २००४- ६३.०४ |
| २००९- ५९.०६ |
| २०१४- ६३.०३ |
| २०१९- ६१.०४ |

| लोकसभा |
|---|
| १९९६- ५२.०४ |
| २००४- ५४.०३ |
| २००९- ५०.०५ |
| २०१४- ६०.०४ |
| २०१९- ६४.०१ |
| २०२४- ६१.०५ |

| जिल्हा | टक्के | जिल्हा | टक्के | जिल्हा | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| भंडारा | ७०.८७ | चंद्रपूर | ७१.३३ | वाशीम | ६७.०९ |
| गोंदिया | ६९.७४ | बुलढाणा | ७०.६० | अमरावती | ६६.४० |
| गडचिरोली | ७५.२६ | अकोला | ६४.७६ | वर्धा | ६९.२९ |

**टक्केवारीपेक्षा आकडेवारी मोठी**

१९९५ मध्ये ५ कोटी ५० लाख ९३ हजार ८६२ पैकी ३ कोटी ९४ लाख ९८ हजार ८६१ मतदारांनी मतदान केले होते. या आकड्यापेक्षा यंदा ९ कोटी ५९ लाख मतदार आहेत. यापैकी ६ कोटींहून अधिक मतदारांनी मतदान केले. याचा अर्थ असा की, मतदानाची टक्केवारी १९९५ मध्ये अधिक दिसत असली तरी, प्रत्यक्षात १९९५ पेक्षा दुप्पट मतदान २०२४ मध्ये झालेले आपल्या आढळून येते. ◀(तभा वृत्तसेवा)

### टक्केवारी कशी वाढली?

राज्यातील मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. २०१९ मध्ये राज्यातील मतदारांची संख्या ८.८५ कोटी होती, ती आता ९.६९ कोटी झाली आहे. अर्थात् १ कोटी १६ लाख एवढी वाढ झाली. यात १९ लाख ४८ हजार मतदार पहिल्यांदा मतदानाचा हक्क बजावणारे आहेत. यात तरुणींची संख्यादेखील लक्षणीय आहे, वाढीव १ कोटी मतदारांमध्येही महिलांचा मोठा समावेश असल्याने महिला मतदारांच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे चित्र दिसते. ही किमया महिला मतदारांच्या वाढीव आकडेवारीची आहे. याला लाडकी बहीण योजनेला जोडले जात असले तरी, प्रत्यक्षात या योजनेमुळे महिलांच्या मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचा दावा करणे धाडसाचे ठरेल.

# युक्रेनने प्रथमच वापरले आयसीबीएम क्षेपणास्त्र

◆ **कीव्ह, २१ नोव्हेंबर**

रशियाने युक्रेनच्या डनिप्रो शहरावर गुरुवारी सकाळी आयसीबीएम अर्थात् आंतरखंडीय क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. या युद्धात प्रथमच अशा क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला. रशियाने यासाठी आरएस-२६ रुबेझ क्षेपणास्त्राचा वापर केला असण्याची शक्यता आहे, ज्यावर अस्त्रखान भागातून गोळीबार करण्यात आला होता.

युक्रेनच्या हवाई दलाने या हल्ल्याला दुजोरा दिला. या क्षेपणास्त्राशिवाय किंजल हायपरसॉनिक आणि केएच-१०१ क्रूझ क्षेपणास्त्रांनीही हल्ला झाला. त्यांच्या महत्त्वाच्या संस्था, इमारती आणि संरचनांचे नुकसान झाले. या हल्ल्यात अण्वस्त्रांचा वापर करण्यात आला असल्याचा दुजोरा युक्रेनियन हवाई दलाने दिला.

रशियाने क्रूझ क्षेपणास्त्रे डागण्यासाठी आपल्या लांब पल्ल्याच्या बॉम्बर टीयू-९५एमएसचा वापर केला. या बॉम्बरने व्होल्गोग्राड भागातून उड्डाण केले, तर किंजल हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे तांबोव भागातून उडवलेल्या मिग-३१के फायटर जेटमधून डागण्यात आली. दरम्यान, त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने दोन ब्रिटिश स्टॉर्म शॅडो क्षेपणास्त्रे पाडली आहेत. ही क्षेपणास्त्रे युक्रेनने रशियाच्या दिशेने डागली होती. युक्रेनने प्रथमच रशियाविरुद्ध या क्षेपणास्त्राचा वापर केला, असा दावा रशियाने केला आहे.

रशियन सैन्य त्यांचे आयसीबीएम क्षेपणास्त्र आरएस-२६ रुबेझ सोडण्याच्या तयारीत आहे, असा दावा बुधवारी युक्रेनियन गुप्तचरांनी दावा केला होता. कपुस्टिन यार हवाई तळावरून हे क्षेपणास्त्र सोडण्यात येणार आहे. या भागाला अस्त्रखान असेही म्हणतात. या क्षेपणास्त्रात अण्वस्त्रे वाहून नेण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले.

या क्षेपणास्त्राचे वजन ३६ हजार किलोग्रॅम आहे. यात प्रत्येकी १५०/३०० किलोटनची चार शस्त्रे एकाच वेळी बसवता येतात. म्हणजेच हे क्षेपणास्त्र एमआयआरव्ही तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. ते एकाच वेळी चार लक्ष्यांवर हल्ला करू शकते. ◀(वृत्तसंस्था)

## गौतम अदानींवरील आरोपांमुळे राजकारण तापले

# २५ कोटी डॉलर्सची लाच दिल्याचा दावा



◆ **न्यू यॉर्क, २१ नोव्हेंबर**

सौर ऊर्जा करारासाठी अनुकूल अटींच्या बदल्यात भारतीय अधिकाऱ्यांना २५ कोटी डॉलर्सची लाच दिल्याचा आरोप अमेरिकी अभियोक्त्यांनी भारतीय अब्जाधीश उद्योजक गौतम अदानी यांच्यावर केला आहे.

सौर ऊर्जा करार मिळवण्यासाठी २०२० ते २०२४ या कालावधीत २५ कोटी डॉलर्सपेक्षा जास्त लाच दिल्याचा आरोप अमेरिकी वकिलांनी गौतम अदानी, त्यांचा पुतण्या सागर आणि इतरांवर केला. यामुळे अदानी यांना दोन अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नफा मिळू शकेल, असा त्यांचा दावा आहे. अमेरिकी गुंतवणूकदार किंवा बाजाराचा संबंध असल्यास, अमेरिकी कायदा विदेशी भ्रष्टाचाराच्या आरोपांचा पाठपुरावा करण्यास परवानगी देतो.

या मुद्यावर प्रतिक्रिया विचारली असता, अदानी समूहाने कोणताही प्रतिसाद दिला नाही. अदानी समूहाने अब्जावधी डॉलर्सचा करार मिळवण्यासाठी भारतीय सरकारी अधिकाऱ्यांना लाच देण्याची विस्तृत योजना तयार केली, असे हे प्रकरण उचलणारे न्यू यॉर्कच्या पूर्व जिल्ह्यातील अमेरिकी वकील ब्रायन पीस यांनी सांगितले.

बंदरांपासून ते ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या असलेल्या समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी, समूहाची अक्षय ऊर्जा शाखा अदानी ग्रीन एनर्जी लि. चा कार्यकारी संचालक व अदानी यांचा पुतण्या सागर अदानी तसेच त्यांचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी विनित जैन यांच्यावर सिक्युरिटी फसवणुकीच्या कटाचा आरोप आहे. ◀(वृत्तसंस्था)

# आरोपांची जेपीसी चौकशी करा



◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

उद्योगपती अदानी सौर ऊर्जा भ्रष्टाचारात सहभागी असल्याचे अमेरिकेत त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रावरून सिद्ध झाले आहे, असा आरोप करीत, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांच्या अटकेची मागणी केली. या प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती अर्थात् जेपीसीमार्फत चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

काँग्रेस मुख्यालयात आज सकाळी आयोजित पत्रपरिषदेत राहुल गांधी यांनी अदानी मुद्यावरून पुन्हा एकदा मोदी सरकारवर हल्ला चढवला. अदानी यांच्या भ्रष्टाचारात पंतप्रधान मोदी यांचाही सहभाग आहे. त्यामुळेच त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जात नसल्याचा आरोप गांधी यांनी केला.

संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. त्यामुळे काँग्रेस संसदेतही हा मुद्दा उपस्थित करण्याची शक्यता आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाचे ठेके मिळवण्यासाठी अदानी समूहाने मोठी लाच दिल्याचा आरोप अमेरिकी चौकशी यंत्रणांनी या आरोपपत्रातून केला आहे.

अदानी यांच्या भ्रष्टाचाराविरोधात अमेरिकेतील चौकशी संस्थांनी त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. अदानी यांच्याविरुद्ध अमेरिकेने कारवाई सुरु केली आहे; मात्र भारतात त्यांच्याविरुद्ध कारवाई होत नाही, असे ते म्हणाले.

अदानी यांनी दोन हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचे या आरोपपत्रावरून दिसून येते. या भ्रष्टाचारात त्यांच्यासोबत सहभागी असलेल्यांची सखोल चौकशी करून सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. ◀(तभा वृत्तसेवा)

# गयाना, डॉमिनिकाने प्रदान केला पंतप्रधान मोदींना सर्वोच्च पुरस्कार






◆ **जॉर्जटाऊन, २१ नोव्हेंबर**

कोरोना महामारीच्या काळात दिलेले योगदान, जागतिक समुदायासाठी केलेले अपवादात्मक कार्य आणि दोन्ही कॅरेबियन देशांसोबत द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांकरिता गयाना आणि डॉमिनिकाने त्यांचा सर्वोच्च पुरस्कार पंतप्रधान नरेंदर मोदी यांना प्रदान केला आहे.

तीन देशांच्या दौऱ्यातील शेवटच्या टप्प्यात गयाना येथे या देशाचे राष्ट्राध्यक्ष इरफान अली यांनी नरेंद्र मोदी यांना 'द ऑर्डर ऑफ एक्सलन्स' पुरस्कार प्रदान केला.

गयानातील सर्वोच्च 'द ऑर्डर ऑफ एक्सलन्स' हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल मी राष्ट्राध्यक्ष डॉ. इरफान अली यांचे मनापासून आभार मानतो. ही भारतातील १४० कोटी लोकांची ओळख आहे, असे नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टवर म्हटले आहे. आमच्या नात्यांप्रती असलेल्या तुमच्या सखोल बांधिलकीचा हा जिवंत पुरावा आहे, जो आम्हाला प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा देत राहील, असे मोदी यांनी पुरस्कार स्वीकारताना म्हटले. यानंतर डॉमिनिकाच्या राष्ट्राध्यक्ष सिल्वानिया बर्टन यांनी मोदी यांना त्यांच्या देशातील 'डॉमिनिका अवॉर्ड ऑफ ऑनर' हा सर्वोच्च पुरस्कार प्रदान केला.

नरेंद्र मोदींनी हा सन्मान भारताच्या नागरिकांना आणि दोन्ही देशांतील लोकांमधील खोलवर रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित केला, असे परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले. ◀(वृत्तसंस्था)



# शिंदे सेना-शरद राष्ट्रवादी पक्ष संभाव्य युतीचे संकेत!

**● दरेकर : शिंदे शरद पवारांसोबत जाणार नाहीत**

**मुंबई, २१ नोव्हेंबर,**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जाणार असल्याचा दावा भाजपने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीविरोधात निवडणूक लढवली आहे. त्यामुळे ते त्यांच्यासोबत जातील अशी कोणतीही शक्यता नाही. आमदार संजय शिरसाट यांनी यासंबंधी मांडलेली भूमिका त्यांच्या पक्षाची नाही, असे भाजपने म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाला आहे. आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे महायुतीच्या गोटात खळबळ माजली असताना भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी शिरसाट यांचा दावा धुडकावून लावला आहे.

# २०५० पर्यंत भारतात ३५ कोटी लहान मुले!

### हवामान बदलाचा सामना करावा लागणार

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

२०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज युनिसेफच्या अहवालात व्यक्त करण्यात आला. आजच्या तुलनेत भारतात १०.६ कोटी मुलांची घट होणार असली तरी चीन, नायजेरिया आणि पाकिस्तानसह भारताचा जागतिक मुलांच्या लोकसंख्येतील वाटा १५ टक्के इतका असेल. पर्यावरणीय आणि हवामान बदलांच्या परिणामांपासून या मुलांचे रक्षण करण्याचे मोठे आव्हान भारतासमोर असेल, असे या अहवालात म्हटले आहे.

युनिसेफचा प्रमुख अहवाल 'स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन २०२४, द फ्यूचर ऑफ चिल्ड्रन इन अ चेंजिंग वर्ल्ड' नुकताच नवी दिल्लीत जाहीर करण्यात आला. यात लोकसंख्याशास्त्रीय बदल, हवामान बदलाची संकटे आणि सीमावर्ती तंत्रज्ञानावर प्रकाश टाकण्यात आला. हा अहवाल २०५० पर्यंत लहान मुलांच्या जीवनाला नवा आकार देणारा ठरणार आहे. ऊर्जा आणि संसाधन संस्थेच्या (टेरी) सुरूची भडवाल, युनिसेफचे युवा अधिवक्ता कार्तिक वर्मा यांच्यासह युनिसेफच्या भारताच्या प्रतिनिधी सिंथिया मॅकॅफ्रे यांनी या अहवालाचे अनावरण केले.

### युनिसेफच्या अहवालातील माहिती



२०५०पर्यंत लहान मुलांना तीव्र हवामान आणि पर्यावरणीय संकटांचा सामना करावा लागेल आणि वर्ष २००० च्या तुलनेत जवळजवळ आठ पट जास्त मुले अतिउष्णतेच्या लाटेला सामोरे जातील, असेही अहवालात नोंदवण्यात आले आहे.

हवामान आणि पर्यावरणीय संकटे ही कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये विशेषतः आफ्रिकेत जास्त प्रमाणात आहेत. जेथे संसाधने कमी आहेत. तेथे सर्वाधिक मुले असतील. भारतापुढील आव्हानांचा विचार करता तातडीने पावले उचलण्याची गरज या अहवालात अधोरेखित करण्यात आली आहे. त्यादृष्टीने वर्तमानात घेतलेले निर्णय या मुलांच्या भविष्याला आकार देतील. मुले आणि त्यांचे हक्क हे धोरण बनवताना केंद्रस्थानी ठेवणे हे समृद्ध, शाश्वत भविष्य घडवण्यासाठी आवश्यक असल्याचे अहवालात नमूद आहे. ◀(वृत्तसंस्था)

### हवामान जोखीम निर्देशांक

जगभरातील जवळपास एक अब्ज मुले आधीच तीव्र हवामानाचा सामना करीत आहेत. मुलांच्या हवामान जोखीम निर्देशांकात भारत २६ व्या क्रमांकावर आहे. भारतीय मुलांना अतिउष्णता, पूर आणि वायू विशेषतः ग्रामीण आणि कमी उत्पन्न असलेल्या समुदायांमध्ये तीव्र जोखमीचा सामना करावा लागतो. अहवालानुसार, हवामानातील संकटांमुळे त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि पाण्यासारख्या अत्यावश्यक स्त्रोतांवर परिणाम होईल.

# दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

◆ **पुणे, २१ नोव्हेंबर**

निवडणुकीची धामधूम संपली. आता निकालाकडे लक्ष असताना, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाकडून दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले.

वेळापत्रकानुसार बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. दरवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे आठ ते दहा दिवस आधी परीक्षा होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी वेळापत्रकाची माहिती दिली. महाराष्ट्र बोर्डाची परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेण्यात येत असून, पहिली शिफ्ट सकाळी ११ दुपारी २ आणि दुसरी शिफ्ट दुपारी ३ ते सायंकाळी ६ पर्यंत असणार आहे. दहावीची परीक्षा पहिल्या दिवशी मराठी भाषेच्या पेपरने सुरू होईल आणि बारावीच्या परीक्षेचा पहिला पेपर इंग्रजीचा असेल. ◀(वृत्तसंस्था)

# खैबर पख्तुनख्वात दहशतवादी हल्ला; ५० ठार

## अतिरेक्यांचा प्रवासी वाहनावर गोळीबारात २० जखमी



◆ **कराची, २१ नोव्हेंबर**

खैबर पख्तुनख्वात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात ५० जण ठार झाले. हा हल्ला खैबर पख्तुनख्वाच्या डाऊन कुर्रम परिसरात एका प्रवासी वाहनावर झाला. या हल्ल्यात पोलिस अधिकारी आणि महिलांसह २० जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या हल्ल्यात ५० जण ठार झाल्याचे वृत्त पाकिस्तानी माध्यमांनी दिले. प्रवासी वाहन लोअर कुर्रमच्या ओचुट काली आणि मंदुरीजवळून जात असताना घात लावून बसलेल्या अतिरेक्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. हे वाहन पाराचिनार येथून पेशावरला जात होते.

तहसील मुख्यालय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. गयूर हुसैन यांनी हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती शोक संवेदना व्यक्त केल्या.

निर्दोष प्रवाशांवर गोळीबार करणे हे भेकड आणि अमानवी कृत्य आहे, अशा शब्दांत पाकिस्तान पीपल्स पार्टी अर्थात् पीपीपीने एक्सवर निषेध नोंदविला. या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना कठोर शिक्षा व्हावी सोबतच जखमींना उपचारासाठी मदतीची घोषणा करावी, अशी मागणी पक्षाने केली आहे. *(वृत्तसंस्था)*



पाटणा येथील प्रकल्पांचे लोकार्पण करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अन्य

# नितीन गडकरी यांच्या हस्ते महामार्ग प्रकल्पाची पायाभरणी, लोकार्पण

### बिहारमधील प्रकल्पासाठी ३,७०० कोटींचा निधी

◆ **पाटणा, २१ नोव्हेंबर**

रस्त्यांचे जाळे तयार करून बिहारमधील विकासाचा वेग वाढवण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी बोधगया येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-६ च्या प्रकल्पाची पायाभरणी तसेच लोकार्पण केले. या प्रकल्पासाठी ३,७०० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी, उपमुख्यमंत्रिद्वय सम्राट चौधरी आणि विजयकुमार, मंत्री प्रेम कुमार, नालंदाचे खासदार कौशलेंद्र कुमार, खासदार विवेक ठाकूर, माजी खासदार सुशीलकुमार सिंह, अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

बोधगया बिहारचा सांस्कृतिक वारसा आणि अध्यात्मिक केंद्र आहे. आज पायाभरणी झालेल्या प्रकल्पांच्या माध्यमातून या अध्यात्मकि भूमीचा विकास वेगाने होईल. पायाभरणी झालेल्या प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय महामार्ग-२० च्या बख्तियारपूर-राजौली विभागातील हल्दिया मार्गाच्या रुंदीकरणामुळे झारखंड आणि बिहारमधील जोडणी वाढेल तसेच त्याचा फायदा नवादा जिल्ह्यालाही होईल. आज इतर महत्त्वपूर्ण योजनांचीही पायाभरणी करण्यात आली. त्यात सीआरआयएफच्या अंतर्गत विकास योजनांचा समावेश आहे. जहानाबाद शहरात मुथेर येथू गोल बगिचा मार्ग रुंदीकरण योजनेमुळे शहरात वाहतूक सुरळीत होईल. गया आणि दोमुंहान रस्ता रुंदीकरणामुळे पाटणा आणि बोधगयेत जोडणी वाढणार आहे. नवादा येथे राष्ट्रीय महामार्ग-८ वर आरओबी, नालंदा येथे मोठा पूल उभारल्याने वाहतूक सुरळीत होणार आहे. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### बारामती कोर्टाचा अजित पवारांना समन्स

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांना २०१४ च्या निवडणुकीत केलेल्या एका वक्तव्यामुळे बारामती कोर्टाकडून समन्स बजावण्यात आला. याचिकाकर्ते सुरेश खोपडे यांनी या संदर्भात माहिती दिली. अजित पवारांनी २०१४ च्या निवडणुकीत उमेदवाराला मतदान केले नाही, तर गावचे पाणी बंद करू, असे वक्तव्य केले होते. सुरेश खोपडे यांनी अजित पवारांच्या याच वक्तव्याविरोधात याचिका दाखल केली. खापडे २०१४ मध्ये आपचे उमेदवार होते. समन्सनुसार अजित पवार यांना २६ नोव्हेंबर रोजी कोर्टात हजर राहण्याचा निर्देश देण्यात आला आहे.



गुरुग्राम येथे गुरुवारी आयोजित एका कार्यक्रमात सहभागी झालेली अभिनेत्री काल्की कोचलिन

### मतदानदिनी ट्रकमधून १०,०८० किलो चांदी जप्त

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीतील मतदानाच्या दिवशी पोलिसांनी धुळे जिल्ह्यात एका ट्रकमधून १०,०८० किलो चांदी जप्त केली. बुधवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास थाळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नागपूरच्या दिशेने निघालेल्या ट्रकला पोलिसांनी अडवले व त्याची झडती घेतली असता, त्या ट्रकमधून १०,०८० किलो चांदी आढळून आली, असे पोलिसांनी सांगितले.१५ ऑक्टोबरपासून राज्य आणि केंद्रीय संस्थांनी अंमलबजावणी क्रियाकलापांचा भाग म्हणून ७०६.९८ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. यात अवैध रोकड, दारू, अमली पदार्थ आणि मौल्यवान धातूंचा समावेश आहे.

### झारखंडमध्ये बस उलटून सात ठार

**रांची :** झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यात प्रवाशांसह पाटणकडे जाणारी बस उलटून सात जणांचा मृत्यू झाला असून, १० जण जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ५० किमी अंतरावर असलेल्या गोरहर पोलिस स्टेशनच्या परिसरात अरुंद वळण घेत असताना बस उलटली. बसमध्ये सुमारे ५० प्रवासी होते. अरुंद वळणावर चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि वाहन उलटले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### बस-ट्रकच्या धडकेत पाच ठार

**अलिगड :** यमुना एक्सप्रेसवेवर बस आणि ट्रकची धडक झाली. यात पाच जण ठार झाले, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. जिल्ह्यातील टप्पल परिसरात बुधवार आणि गुरुवारच्या मध्यरात्री ही घटना घडली. एक खाजगी बस दिल्लीच्या काश्मीर गेटवरून पूर्व उत्तरप्रदेशातील आझमगडला जात होती. धडक झालेल्या ट्रकमध्ये काचेच्या वस्तू होत्या. अपघाताची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी बचाव कार्य हाती घेतले. पोलिसांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७७,१५५.७९ ( -४२२.५९) |
| निफ्टी | २३,३४९.९० (-१६८.६०) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ७७,९५० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९२,००० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.६ | १७.0 |
| अमरावती | ३०.४ | १५.२ |
| भंडारा | ३०.४ | -.- |
| बुलडाणा | २७.६ | १५.० |
| चंद्रपूर | २८.८ | १४.८ |
| गडचिरोली | २८.४ | १३.४ |
| गोंदिया | २८.१ | १३.४ |
| नागपूर | २९.१ | १५.१ |
| वर्धा | २९.० | १५.० |
| वाशीम | २९.२ | -.- |
| यवतमाळ | २९.५ | -.- |

# दिल्लीत सोमवारपासून आंतरराष्ट्रीय सहकार संमेलन

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

सहकार मंत्रालय, आंतरराष्ट्रीय सहकार आघाडी तसेच इफ्कोतर्फे दिल्लीत २५ नोव्हेंबरपासून विश्व सहकार संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रगती मैदानस्थित भारतमंडपम्मध्ये २५ ते ३० नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीषकुमार भुतानी आणि इफ्कोचे प्रबंध संचालक डॉ. उदयशंकर अवस्थी यांनी आज एका पत्रपरिषदेत दिली.

या संमेलनाला भूतानचे पंतप्रधान दाशो त्शेरिंग तोबगे आणि फिजीचे उपपंतप्रधान मनोआ कामिकामिका प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. विविध देशांचे सहकार मंत्री, सचिव यावेळी उपस्थित राहणार आहेत. २५ नोव्हेंबरला दुपारी तीन वाजता गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेत या संमेलनाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभानंतर रोशडेल पायनियर्स अवार्डही प्रदान केले जाणार आहेत.

संयुक्त राष्ट्राने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष जाहीर केले आहे. त्यामुळे यावेळी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त एका डाकतिकिटाचे विमोचन केले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार आघाडीच्या १३० वर्षांच्या इतिहासात हे संमेलन प्रथमच भारतात होत आहे. सहकाराच्या माध्यमातून सर्वांची समृद्धी हा संमेलनाचा मुख्य विषय आहे. सुमारे तीन हजार प्रतिनिधी या संमेलनात सहभागी होणार असून, यात हजारावर परदेशी प्रतिनिधींचा समावेश राहणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### ओडिशातील चकमकीत माओवाद्याचा खात्मा

**मलकानगिरी :** ओडिशा-छत्तीसगड सीमेवरील जिनेलीगुडा जंगलात माओवादी व सुरक्षा दलात झालेल्या चकमकीत एका माओवाद्याचा खात्मा करण्यात आला, तर एक पोलिस जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. ओडिशाच्या मलकानगिरी जिल्ह्यातील जंगलात येणाऱ्या माओवाद्यांना रोखण्यासाठी बुधवारी रात्री पोलिसांनी मोहीम सुरू केली. त्यावेळी ही चकमक झडली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईत दोन माओवाद्यांना अटक करण्यात आली. दामारू बडनायक असे जखमी झालेल्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव असून, त्याला मलकानगिरी जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ठार झालेल्या माओवाद्याची ओळख अद्याप पटली नाही.

# संपूर्ण मणिपुरात आफ्स्पाची मुदत वाढवा

### कुकी आमदारांची मागणी

◆ **इम्फाळ, २१ नोव्हेंबर**

लुटलेली शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी संपूर्ण मणिपुरात आफ्स्पाची मुदत वाढवा, अशी मागणी मणिपूर विधानसभेतील १० कुकी आमदारांनी केली. यात भाजपाच्या नेतृत्वातील सरकारच्या सात आमदारांचा समावेश आहे.

वांशिक हिंसाचारामुळे परिस्थिती अस्थिर असल्याचे स्पष्ट करीत केंद्रीय गृह मंत्रालयाने हिंसाचारग्रस्त जिरिबामसह सहा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत आफ्स्पाची मुदत १४ नोव्हेंबर रोजी वाढवली.

आफ्स्पाची मुदत वाढवण्याबाबत दिलेल्या आदेशाचा फेरआढावा घेत उर्वरित १३ पोलिस ठाण्यांच्या हद्दीतही तो लावावा, असे कुकी आमदारांनी संयुक्त निवेदनात म्हटले आहे.

मागील वर्षी ३ मेपासून मैतेई समुदायाने लुटलेली सहा हजारांपेक्षा जास्त अत्याधुनिक शस्त्रास्त्रे परत मिळवण्यासाठी संपूर्ण राज्यात आफ्स्पा लागू केला जावा. कारण, हिंसाचार रोखण्यासाठी ही एक प्रदीर्घ मुदतीच्या कारवाईची गरज आहे, असे त्यांनी पत्रात सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# हिंसाचारग्रस्त मणिपुरात केंद्रीय दलाच्या आणखी आठ कंपन्या



संवेदनशील भागात गस्त घालताना सुरक्षा दलाचे जवान

◆ **इम्फाळ, २१ नोव्हेंबर**

मणिपुरात नव्याने उसळलेल्या हिंसाचाराच्या पृष्ठभूमीवर केंद्रीय सशस्त्र दलांच्या आठ कंपन्या इम्फाळमध्ये दाखल झाल्या. त्यांची तैनाती संवेदनशील आणि हिंसाचारग्रस्त भागात तैनात केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

सीआरपीएफ आणि बीएसएफच्या प्रत्येकी चार कंपन्या राज्यातील संवेदनशील आणि धोकादायक परिसरात तैनात केल्या जातील, असे अधिकाऱ्याने सांगितले. सीआरपीएफच्या कंपनीत एका महिला बटालियनचा समावेश आहे.

मणिपुरात सीएपीएफच्या ५० कंपन्या तैनात केल्या जातील, अशी घोषणा केंद्र सरकारने अलिकडेच केली होती. मागील आठवड्यात जिरिबाम जिल्ह्यात काँग्रेस आणि भाजपाच्या कार्यालयांची तोडफोड झाल्यानंतर राज्यात हिंसाचार उसळला होता.

**आमदाराच्या घरावर हल्ला; दीड कोटींच्या ऐवजाची लूट**

जमावाने अलिकडेच आपल्या घरावर हल्ला करीत १८ लाख रुपयांची रोकड आणि दीड कोटी रुपयांचे दागिने लुटून नेले, अशी तक्रार जदयूचे आमदार जॉयकिशन सिंह यांच्या आईने केल्याची माहिती पोलिसांनी दिली. पश्चिम इम्फाळच्या थांग्मेइबंद येथील घरावर केलेल्या हल्ल्यादरम्यान जवामाने विस्थापितांसाठी ठेवलेल्या काही वस्तूही लुटून नेल्या. या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला. हल्ला झाला त्यावेळी आ. जॉयकिशन सिंह कुटुंबातील एका सदस्यावरील उपचारासाठी दिल्लीत होते. *(वृत्तसंस्था)*



लखनौ येथे 'द साबरमती रिपोर्ट' हा चित्रपट मंत्रिमंडळातील अन्य सदस्यांसोबत पाहताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

# 'द साबरमती रिपोर्ट' गुजरातमध्ये करमुक्त

◆ **अहमदाबाद, २१ नोव्हेंबर**

गुजरात भाजपा सरकारने २००२ च्या गोध्रा ट्रेन जाळण्याच्या घटनेवर आधारित 'द साबरमती रिपोर्ट हा चित्रपट राज्यात करमुक्त घोषित केला आहे.

बुधवारी रात्री चित्रपट पाहिल्यानंतर मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी हा निर्णय घेतला, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. पटेल यांनी निर्माती एकता कपूर, जेष्ठ बॉलिवूड स्टार जितेंद्र, अभिनेत्री रिद्धी डोग्रा आणि गुजरातचे गृहराज्यमंत्री हर्ष संघवी यांच्यासमवेत हा चित्रपट पाहिला.

मुख्यमंत्र्यांनी या चित्रपटाचे कौतुक केले आणि नंतर गुजरातमध्ये तो करमुक्त केला. मागील आठवड्यात चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या विक्रांत मेसी स्टार चित्रपटाला करमुक्त करणारे गुजरात हे पाचवे राज्य आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला राजस्थान, हरयाणा, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशने या चित्रपटाला करमुक्त घोषित केले. *(वृत्तसंस्था)*

# हवामान बदलाविरुद्धच्या लढ्यात भारताची उत्तम कामगिरी

◆ **बाकू, २१ नोव्हेंबर**

क्लायमेट चेंज परफॉर्मन्स इंडेक्स अहवाल प्रसिद्ध करण्यात आला. यात ६० हून अधिक देशांच्या यादीत भारत दोन स्थानांनी घसरून १० व्या स्थानावर आला आहे; तथापि अहवालात हवामान बदलाविरूद्धच्या लढ्यात भारताच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करण्यात आले. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. मात्र, या देशाचे उत्सर्जन आणि ऊर्जा वापर तुलनेने कमी आहे. डेन्मार्क चौ□थ्या स्थानावर असून, चीन आणि अमेरिका हे दोन सर्वांत मोठे उत्सर्जन करणारे देश ५५ व्या आणि ५७ व्या स्थानावर आहेत.

या वर्षाच्या अहवालात भारत १० व्या क्रमांकावर असून, तो अव्वल कामगिरी करणाऱ्यांपैकी एक आहे. भारतातील दरडोई उत्सर्जन २.९ टन कार्बन डायऑक्साईड समतुल्य हे विविध हरितगृह वायूंच्या हवामान प्रभावांचे प्रमाणीकरण करण्यासाठी वापरले जाणारे मोजमापाचे एकक आहे.

**श्रीमंत देशांना भारताचे मदतीचे आवाहन**

भारताने विकसनशील देशांना हवामान अनुकुलतेसाठी पाठिंबा वाढवण्याचे आवाहन केले आहे. त्यात जास्त हवामानातील घटनांची वाढती तीव्रता लोकांचे अस्तित्व धोक्यात आणत आहे, विशेषत: गरीब देशांमध्ये विकसनशील जगाला हवामान बदलाच्या परिणामांमुळे विषमतेने ग्रासले आहे, जे मुख्यत्वे विकसित देशांच्या ऐतिहासिक उत्सर्जनाचा परिणाम आहे. *(वृत्तसंस्था)*

### पुसदचा पल्लव शिरमवार अबॅकस स्पर्धेत जगात पहिला



◆ **पुसद, २१ नोव्हेंबर**

येथील ज्योतिर्गमय इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी पल्लव आनंद शिरमवार याने अबॅकस स्पर्धेत ११ देशांतून प्रथम क्रमांक मिळविल्याने त्याच्यावर सर्वत्र कौतुकांचा वर्षाव होत आहे.

कोलकाता येथे झालेल्या २१ व्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत पुसदचा पल्लव शिरमवार याने ११ देशांतून पहिला येण्याचा मान मिळविला. या स्पर्धेत ११ देशांसह संपूर्ण भारतातील ९ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्यामध्ये पुसद येथील सिप अबॅकस अकादमीमध्ये शिकणारा पल्लव हा ११ देशांच्या स्पर्धेत भारतातून पहिला आला आहे. पल्लवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व सिप अबॅकसचे धनंजय देशमुख व शाळेतील शिक्षकांना दिले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# वायू प्रदूषणामुळे वाढतोय 'सीओपीडी'चा धोका



◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

श्वासोच्छवासाचा त्रास जगभरात चिंतेचा विषय बनला आहे. वायू प्रदूषणामुळे ही समस्या लोकांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येत आहे. क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) हा असाच एक आजार आहे, जो फुफ्फुस आणि श्वसनमार्गावर परिणाम करतो. हा आजार कालांतराने वाढत जातो आणि वायू प्रदूषणामुळे अधिक गंभीर होऊ शकतो. अशा परिस्थितीत प्रदूषित वातावरणात राहून या आजारापासून स्वत:चा बचाव करण्यासाठी काही खबरदारी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**काय आहे क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव पल्मोनरी डिसीज?**

सीओपीडी हा फुफ्फुसांचा आजार आहे. हा रोग हळूहळू पसरतो. ज्यात श्वासनलिकेतील पाईप पातळ होतो, ज्यामुळे श्वास घेण्यात आणि सोडण्यात अडचणी येतात, या आजारात सर्वप्रथम खोकला होतो.

**सीओपीडी रोखण्याचे मार्ग**

बाहेर जाणे टाळा : सकाळी आणि सायंकाळी प्रदूषणाची पातळी जास्त असते, त्यामुळे या वेळेत बाहेर जाणे टाळावे.

मुखाच्छादन वापरा : बाहेर जायच्या वेळी हानीकारक कण टाळण्यासाठी एन९५ मुखाच्छादन वापरा.

**औषधी आणि थेरपी**

एअर क्वालिटी इंडेक्सची (एडीआय) पातळी लक्षणीय वाढली असेल, तर अतिरिक्त खबरदारी घेतली पाहिजे. नियमित पल्मोनोलॉजिस्टला भेट देणे आणि तपासणी करणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून उपचारात काही बदल करणे आवश्यक असल्यास ते वेळेत केले जाऊ शकते. *(वृत्तसंस्था)*

# आपच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

### तीन विद्यमान आमदारांना उमेदवारी नाकारली

◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची अद्याप घोषणा झाली नसताना आम आदमी पक्षाने उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. असे करीत आपने भाजपा आणि काँग्रेस यांच्यावर दबाव वाढवला आहे.

माजी मुख्यमंत्री आणि आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्या अनुमतीने दिल्ली प्रदेश आपचे अध्यक्ष गोपाल राय यांनी आप उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. ११ उमेदवारांच्या या यादीत आपच्या तीन विद्यमान आमदारांना उमेदवारी नाकारण्यात आली असून, भाजपा आणि काँग्रेसमधून आपमध्ये आलेल्या सहा नेत्यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

२०२० मध्ये निवडणूक जिंकलेल्या तीन आमदारांना तिकीट नाकारण्यात आले असून, पराभूत झालेल्या सहा उमेदवारांवर पुन्हा विश्वास दाखवण्यात आला आहे. विश्वासनगरमधून दीपक सिंघला, रोहतासनगरमधून सरिता सिंह तसेच बदरपूरमधून रामसिंह या पराभूत नेत्यांना आपने उमेदवारी दिली आहे.

किराडीचे ऋतुराज झा, सीलमपूरचे अब्दुल रहमान आणि मटियालाचे गुलाबसिंह या तीन विद्यमान आमदारांना आपने उमेदवारी नाकारली. छतरपूरमध्ये ब्रम्हसिंह तंवर, किराडीतून अनिल झा तर लक्ष्मीनगरमधून बी. बी. त्यागी या बाहेरून आलेल्या नेत्यांना आपने उमेदवारी दिली. हे तिघेही नुकतेच भाजपातून आपमध्ये आले आहेत. सीलमपूरमधून जुबैर चौधरी, सीमापुरीतून वीरसिंह धिंगान आणि मटियालातून सुमेश शौकीन यांना आपने उमेदवारी दिली. हे तिन्ही नेते काँग्रेसमधून आपमध्ये आले आहे. *(तभा वृत्तसेवा)*

## इति-उवाच...



मिलिंद देवरा यांनी मते मिळत नसल्याचे लक्षात आल्यानंतर राज ठाकरेंच्या नावाने खोटे पत्र व्हायरल केले. लाडक्या बहिणींचे हे लाडके भाऊ चिटर आहेत. प्रत्यक्षात मनसे किंग मेकर आहे, हे ४८ तासांनी कळेल.

**संदीप देशपांडे**, मनसे



वाढलेल्या मतांचा फायदा महायुतीला होईल. 'कटेंगे तो बटेंगे'चा फायदाही होणार आहे. एकनाथ शिंदे नेहमी योग्य दिशेने जातात. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. आम्हाला गुवाहाटी पार्ट २ करण्याची गरज नाही, आम्ही नवीन ठिकाणी जाऊ.

**संजय शिरसाट**, शिवसेना



गेल्या वेळेस एका ठिकाणी इतर पक्षातील आमदार घे, स्वत:च्या पक्षातील आमदाराला बसवा, समोर लढत द्यायला कुणीच नाही आणि आरशासमोर उभे राहून तलवारीने लढले होते. त्यामुळे माझा मुलगा युद्धात लढून जिंकेल, याचा मला अभिमान आहे.

**शर्मिला ठाकरे**, मनसे



अजितदादांना मत म्हणजे भारतीय जनता पक्षाला मत. त्यामुळे बारामतीतील मतदार दादांना जिंकवणार नाहीत. यावेळी ते ४० हजार मतांनी पडतील.

**उत्तमराव जानकर**, राकाँशप

# लाडकी बहीण योजनेमुळे मतदान टक्केवारीत वाढ!

**महिला मतदारांचे वाढते मतदान**



◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीतील मतदानात ६५.११ टक्के इतकी प्रभावी टक्केवारी नोंदवली गेली. रात्री ११.४५ वाजेपर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार, ही टक्केवारी मागील निवडणुकीपेक्षा जास्त होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात महिलांनी मतदानाला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली, ज्यामुळे लाडकी बहीण योजनेचा प्रभाव अधोरेखित झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे महिला मतदारांचे प्रमाण वाढल्याचे राजकीय वर्तुळात चर्चिले जात आहे. ही योजना महिलांसाठी विशेष सवलती आणि सुविधांचे आश्वासन देते, ज्यामुळे महिला मतदारांचे लक्ष वेधले गेले. या वाढलेल्या टक्केवारीचा फायदा महायुतीला होणार की महाविकास आघाडीला, हे निकालानंतर स्पष्ट होईल.

**विदर्भ-मराठवाड्यात महिलांची संख्या अधिक**

विदर्भात सरासरी ५८ ते ६० टक्के मतदान झाले, ज्यात महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता. मराठवाड्यातही महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले. ही वाढती टक्केवारी महत्त्वाची असून, ती निवडणुकीच्या निकालांवर परिणाम करू शकते. मुंबई शहराचा विचार करता, इतर भागांच्या तुलनेत मतदानाची टक्केवारी कमी राहिली. मात्र, राज्याच्या इतर भागांमध्ये मतदानाच्या आकडेवारीत लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

**महिला मतदार निर्णायक ठरणार**

लाडकी बहीण योजना महिलांच्या हितासाठी केंद्रित असल्याने, महिला मतदारांचा ओघ ज्या पक्षाकडे आहे, त्याला याचा फायदा होण्याची शक्यता आहे. अनेक मतदारसंघांमध्ये महिला मतदारांची संख्या निर्णायक ठरू शकते.

विशेषतः जिथे मतदानाचे प्रमाण वाढले आहे, तेथील निकाल महायुतीच्या बाजूने जातील, अशी चर्चा आहे.

लाडकी बहीण योजनेमुळे महिलांमध्ये सरकारविषयी सकारात्मक भावना निर्माण झाल्या आहेत. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, या योजनेच्या प्रभावामुळे ग्रामीण महिलाही मोठ्या प्रमाणावर मतदानासाठी पुढे सरसावल्या.

राजकीय तज्ज्ञांच्या मते, महिलांचे वाढलेले मतदान अनेक मतदारसंघांमध्ये निकालाचे गणित बदलू शकते. लाडकी बहीण योजनेमुळे निर्माण झालेला हा ट्रेंड निवडणुकीतील प्रमुख घटक ठरू शकतो. ◀(वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्रिपदावरून निकालापूर्वी भांडण!

**पटोले म्हणाले, काँग्रेसचाच असेल** | **उबाठानेही चंग बांधला**



◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीच्या निकालापूर्वीच महाविकास आघाडी सरकारबाबत मोठा दावा केला. ते म्हणाले, महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येईल. काँग्रेसचे सर्वाधिक आमदार निवडून येतील. त्यामुळे मुख्यमंत्री काँग्रेसचाच असेल. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी नाना पटोले यांच्या विधानाला उत्तर दिले. राऊत म्हणाले, हे विधान आम्ही मान्य करणार नाही. महाविकास आघाडीचे सर्व घटक पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील. काँग्रेस हायकमांडने नाना पटोले यांना मुख्यमंत्रिपदासाठी सांगितले असेल, तर राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे यांनी तशी अधिकृत घोषणा करावी.

यापूर्वीही नाना पटोले आणि संजय राऊत यांच्यात वाद झाले आहेत. हरयाणामधील निवडणुकीत काँग्रेसच्या पराभवानंतर राऊत यांनी टीका केली होती, ज्यावर पटोले यांनी आक्षेप घेतला होता. त्यांनी म्हटले की, गठबंधनाबाबत अशा प्रकारे सार्वजनिक आरोप करणे अयोग्य आहे.

जागावाटपाच्या मुद्द्यावरूनही मुख्यमंत्रिपदावरून उबाठा आणि काँग्रेसमध्ये चांगलीच जुंपली होती. उबाठाचा उद्धव ठाकरेंच्या चेहऱ्यासाठी आग्रह होता. मात्र, काँग्रेसच्या नाना पटोलेंनी ते मान्य केले नव्हते. जागावाटपातही काँग्रेसने जास्त जागा मागितल्या होत्या. शरद पवारांनी या दोघांमधील वाद कसाबसा शमवला होता. आता निकालाआधीच मुख्यमंत्रिपदाचे वेध लागल्याने महाविकास आघाडीत रस्सीखेच होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्यक्ष निकालानंतर स्थिती काय राहील, हे मात्र दोन दिवसांनंतरच समजणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# मतदानातही पुणेकरांचे 'एक ते चार'!



◆ **पुणे, २१ नोव्हेंबर**

पुण्यातील लोकांविषयी अनेक समजुती ख्यात आहेत. त्यातही दुपारी एक ते चार पुणेकर कुठेही न जाता, सर्व कामे बाजूला सारून वामकुक्षी घेतातच, या समजुतीचाही समावेश आहे. याच धोरणाला कायम ठेवत दुपारच्या वेळी पुण्यातील मतदानाची प्रक्रिया मंदावली होती.

मतदान केंद्रात भ्रमणध्वनी नेण्यावरून झालेले वाद आणि मतदान यंत्र काही काळ बंद पडण्याचा अपवाद वगळता पुण्यातील आठही विधानसभा मतदारसंघांतील मतदानाची प्रक्रिया बुधवारी शांततेत पार पडली. मतदान केंद्रांबाहेर सकाळी लागलेल्या रांगा, दुपारी १ ते ४ या काळात मंदावलेला वेग, मतदान केंद्रांबाहेर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची लगबग, सुसज्ज प्रशासकीय व्यवस्था आणि कडेकोट पोलिस बंदोबस्त असे आश्वासक चित्र मतदान प्रक्रियेवेळी दिसून आले. ज्येष्ठ नागरिकांसोबतच 'लाडक्या बहिणीं'चा मतदान प्रक्रियेतील लक्षणीय सहभाग ही मतदानाची वैशिष्ट्ये ठरली.

दुपारी एक ते चार या कालावधीत कसबा, खडकवासला मतदारसंघ वगळता अन्यत्र तुलनेने कमी मतदान झाले. दुपारी चारनंतर मतदार बाहेर पडल्याने मतदानाचा वेग वाढला. त्यामुळे अनेक मतदार केंद्रांबाहेर सहानंतरही मतदारांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसून आले.

लोकसभा निवडणुकीत दुबार मतदार, नावे वगळली गेल्याच्या तक्रारी, मतदान केंद्र बदलण्यात आल्याचा अनुभव अनेकांनी घेतला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र त्याची पुनरावृत्ती झाली नाही. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी, तर प्रशासकीय पातळीवर कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून दक्षता घेण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदार याद्यातील घोळही फारसा दिसून आला नाही. त्यामुळे केंद्राबाहेर गोंधळ झाला नाही. बोगस मतदानाच्या तक्रारीही झाल्या नाहीत. ◀(वृत्तसंस्था)

# एक्झिट पोलनंतर मविआच्या हालचाली सुरू

### जयंत पाटील, बाळासाहेब थोरात अपक्ष, बंडखोरांच्या संपर्कात

◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर विविध संस्थांच्या एक्झिट पोल्सचे निकाल समोर आले होते. यात महाविकास आघाडी आणि महायुतीला संमिश्र कौल मिळाल्याने संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली होती. या पृष्ठभूमीवर महाविकास आघाडीने फासे टाकायला सुरुवात केली आहे. राज्यात कोणत्याही आघाडीला बहुमत न मिळाल्यास अपक्षांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे महाविकास आघाडीने बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांशी संपर्क साधायला सुरुवात केली आहे.

मतदान संपल्यानंतर महाविकास आघाडीची बैठक बोलावण्यात आली आहे. गुरुवारी सकाळपासून महाविकास आघाडीचे प्रमुख नेते कामाला लागले आहेत. जे बंडखोर विजयी होऊ शकतात, त्यांच्याशी बाळासाहेब थोरात आणि जयंत पाटील यांच्या माध्यमातून संपर्क साधायला सुरुवात झाली आहे. यामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढला आहे. त्यामुळे हा वाढीव टक्का कोणासाठी फायदेशीर ठरणार, याबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काँटे की टक्कर झाल्यास कोणालाही बहुमत मिळणार नाही, असेही अंदाज व्यक्त केले जात आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# विरोधी पक्षनेताच सरकारमध्ये सहभागी झाला

### २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरच्या नाट्यपूर्ण घटना

**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

१९९५ नंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा-सेना युतीची सत्ता आली होती. भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. १९९५ मध्ये महाराष्ट्रात शिवसेना-भाजपा युतीची सत्ता आली होती; कारण त्यावेळी शिवसेनेच्या आमदारांची संख्या जास्त होती. शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले होते. २०१४ मध्ये मात्र भाजपा आमदारांची संख्या शिवसेनेपेक्षा जास्त होती. परिणामी, भाजपाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले होते. त्यावेळचे सरकार हे भाजपा-सेना युतीचे होते.

२०१४ ची विधानसभा निवडणूक जागावाटपावरून मतैक्य न झाल्यामुळे शिवसेना आणि भाजपाने वेगवेगळी लढवली होती. या निवडणुकीत २५ वर्षांपासून असलेली भाजपा-सेना युती पहिल्यांदा तुटली होती. विशेष म्हणजे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातही जागावाटपाचा समझोता होऊ शकला नाही. या दोन्ही पक्षांची १५ वर्षांची आघाडी या निवडणुकीत पहिल्यांदा तुटली. त्यामुळे राज्यात प्रथमच भाजपा, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे चार पक्ष वेगवेगळे लढले होते.



या निवडणुकीत राज्यात कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. सर्वाधिक १२२ जागा जिंकत भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला होता. राज्यात भाजपाने स्वबळावर जिंकलेल्या आतापर्यंतच्या या सर्वांत जास्त जागा होत्या. भाजपा समर्थित एक आमदारही निवडून आला होता, त्यामुळे भाजपाचे संख्याबळ १२३ होत होते. भाजपाला बहुमतासाठी २२ जागा कमी पडत होत्या. शिवसेनेने दुसऱ्या क्रमांकाच्या ६३ जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसने ४२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागा जिंकल्या होत्या. अपक्षांना ७ तर अन्यांना १३ जागा मिळाल्या होत्या. भाजपाला २७.८० टक्के मते मिळाली होती. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या शिवसेनेने १९.३० टक्के मते घेतली. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागांच्या संख्येत तसेच मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता. काँग्रेसला १८ टक्के तर राष्ट्रवादी काँग्रेसला १७.२० टक्के मते मिळाली होती.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ८२ तर राष्ट्रवादी काँग्रेसने ६२ जागा जिंकल्या होत्या. भाजपाने ४६ तर शिवसेनेने ४५ जागा जिंकल्या होत्या. राज ठाकरे यांच्या मनसेने आपल्या इतिहासातील सर्वाधिक १३ जागा जिंकल्या होत्या.

२००९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने बहुमतांचा आकडा गाठला होता. काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार उपमुख्यमंत्री झाले होते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीनंतरच भाजपाला आपली ताकद समजली. तोपर्यंत राज्यात शिवसेना मोठा भाऊ तर, भाजपा लहान भाऊ होता. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने शंभरावर जागा जिंकत सर्व पक्षांना मागे टाकले. त्याचा नंतरच्या काळात भाजपाला फायदाच झाला. २०१४ मध्ये शिवसेनेने दिलेल्या जागांवर भाजपाने निवडणूक लढवली असती, तर भाजपा राज्यात नेहमीसाठी दुय्यम भूमिकेतच राहिला असता. राज्यात त्रिशंकू विधानसभा असल्यामुळे तसेच कोणत्याही पक्षाला स्वबळावर स्पष्ट बहुमत नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी भाजपाला सरकार बनवण्यासाठी परस्पर पाठिंबा देऊन टाकला. शिवसेना पुन्हा भाजपाजवळ येऊ नये म्हणून पवारांनी खेळलेली ही खेळी होती, असे म्हणतात.

२०१४ मध्ये सरकार स्थापन करण्यासाठी राज्यात अनेक नाट्यपूर्ण घटना घडल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. नंतर आवाजी मतदानाने विधानसभेत बहुमत सिद्ध केले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे विरोधी पक्षनेते होते, त्यांनी मतविभाजनाची मागणी केली, पण ती फेटाळून लावण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केल्यामुळे भाजपावर टीकाही झाली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने आपल्याला फारकाळ सरकार चालवता येणार नाही, हे भाजपाच्या लक्षात आले. सरकारच्या स्थैर्यासाठी जुना मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेला जवळ आणण्याच्या हालचाली भाजपाने सुरू केल्या. भाजपा नेते आणि शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांच्यात चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. शिवसेनेलाही सरकारमध्ये सहभागी होण्यात आपला राजकीय फायदा दिसत होता. त्यामुळे शिवसेनेने भाजपाला पाठिंबा देत सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. पाच वर्ष हे सरकार यशस्वीपणे चालले आणि देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून आपला पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला.

# मतदारांसाठी सेल्फी पॉईंट ठरला आकर्षण




◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून प्रचाराचा प्रचंड धुरळा उडाला. हटके रिल्स, व्हिडीओज आणि फोटोंच्या माध्यमातून तरुणांनी विधानसभा निवडणुकीत प्रचारात रंगत आणली. मतदानानंतर सेल्फीची क्रेझ असणाऱ्यांसाठी ठिकठिकाणी उभारलेले सेल्फी पॉईंट आकर्षणाचा विषय ठरला.

निवडणूक सुरू झाल्यापासून राजकीय पक्षांनी सोशल मीडिया सांभाळणारी स्वतंत्र यंत्रणा राबविली. त्यासाठी स्वतंत्र सोशल मीडिया वॉररूमदेखील सज्ज ठेवण्यात आली होती. मतदानाच्या आदल्या दिवशीपासून सोशल मीडियावर मतदान करण्याचे आवाहन केले जात होते. प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या उमेदवारांचे व्हिडीओ, रिल्स बनवून सोशल मीडियावर व्हायरल केले. यात तरुणाही मागे राहिली नाही.

निवडणुकीच्या दिवशी मतदानासाठी आवाहन केले. अनेकांनी मतदान केल्याची निशाणी दाखवत काढलेले फोटो व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर शेअर केले. सहकुटुंब मतदान केल्यानंतर सेल्फी घेऊन समाज माध्यमावर अपलोड करण्यात आल्या, तर काही जणांनी निवडणुकीत उमेदवार, राजकीय नेते, सेलिब्रिटी यांच्यासमवेत फोटो काढून समाज माध्यमांवर व्हायरल केले.

**नवमतदारांना सेल्फीचा मोह**

पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणाऱ्या तरुण-तरुणींमध्ये उत्साह दिसून आला. आई-वडिलांसमवेत मतदान केंद्रात जाऊन मतदान केल्यावर सेल्फी घेण्याचा मोह अनेकांना आवरला नाही. पहिल्यांदा मतदान केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. मतदान केल्याची बोटावरील शाईची खूण मित्र-मैत्रिणींना दाखवून अनेकांनी एकत्रित फोटोसेशनही केले. ◀(वृत्तसंस्था)

# कोल्हापूर राज्यात भारी!

**निवडणुकीत उच्चांकी ७६.१७ टक्के मतदान**



◆ **कोल्हापूर, २१ नोव्हेंबर**

यंदाही वाढत्या टक्केवारीची परंपरा कायम ठेवत कोल्हापूर जिल्हा आघाडीवर राहिला आहे. करवीर मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वाधिक मतदान झाले. जिल्ह्याने निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे. या निवडणुकीत उच्चांकी ७६.१७ टक्के इतके मतदान झाले. त्यामुळे कोल्हापूर राज्यात भारी ठरला.

जिल्ह्यातील करवीर मतदारसंघ राज्यात अव्वल राहिला. येथे ८४.९५ टक्के मतदान झाले. गेल्या तीन निवडणुका पाहिल्यास ही टक्केवारी वाढतच आहे. यंदाही वाढत्या टक्केवारीची परंपरा कायम ठेवत कोल्हापूर जिल्हा आघाडीवर राहिला. २००९ मध्ये ७३.९१ टक्के, २०१४ मध्ये ७५ टक्के, २०१९ मध्ये ७४.०८ टक्के मतदान झाले होते. या निवडणुकांमध्ये करवीर मतदारसंघाने राज्यात बाजी मारली होती.

जिल्ह्यातील दहाही मतदारसंघात चुरशीने सुमारे ७६.१७ टक्के मतदान झाले. जिल्हा प्रशासनाकडून मतदार नोंदणी व मतदान जनजागृतीसाठी उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचबरोबर मतदार नोंदणीसाठी ऑनलाईन सॉफ्टवेअरचा वापर करून स्वत:हून मतदानासाठी प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे मतदानाची टक्केवारी प्रत्येक निवडणुकीत वाढतच असल्याचे दिसून येत आहे. ◀(वृत्तसंस्था)

# 'लोकल' बंद न ठेवता 'त्यांनी' केले मतदान

### रेल्वे प्रशासनाची प्रशंसनीय व्यवस्था

◆ **मुंबई, २१ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर रेल्वे प्रशासनाने अत्यावश्यक सेवांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी खास सवलत दिली होती. मुंबईची जीवनरेखा असणारी लोकल बंद न ठेवता तेथील कर्मचाऱ्यांनी व्यवस्थित मतदान केले, हे विशेष.

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या सेवा बुधवारी १०० टक्के सुरू असल्याने प्रशासनाने रेल्वे

कर्मचाऱ्यांना कामाच्या वेळेत चार तासांची विशेष सुटी दिली होती, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. असे असले तरी, रेल्वेची नियमित सेवा अबाधित राहिली असून, प्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची काळजी घेण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. अत्यावश्यक सेवा वगळता इतर कर्मचाऱ्यांना मतदान करता यावे, यासाठी सुटी देण्यात आली होती.

मध्य आणि पश्चिम रेल्वेने सकाळी ७ ते सायंकाळी ६ दरम्यान कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, म्हणून ड्यूटीच्या वेळेनुसार चार तासांची सुटी दिली होती या सवलतीचा लाभ घेणाऱ्यांमध्ये कमर्शिअल स्टाफ, मोटारमन, गार्ड, ट्रेन ऑपरेशनशी संबंधित कर्मचारी आणि इतर अत्यावश्यक सेवा देणारे कर्मचारी यांचा समावेश होता. ◀(वृत्तसंस्था)

**१२ अतिरिक्त लोकल**

मतदानाच्या ड्यूटीवरील कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेतर्फे बुधवारी १२ अतिरिक्त लोकल चालविण्यात आल्या. मुख्य मार्गावरील सीएसएमटी ते कल्याण अप-डाउन आणि सीएसएमटी ते पनवेलदरम्यान या लोकल चालविण्यात आल्या.

# प्रणिती शिंदेंची गाडी फोडण्याआधी तुझी गाडी फोडतो

**काँग्रेसच्या युवक नेत्याचा इशारा**

◆ **सोलापूर, २१ नोव्हेंबर**

काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर दक्षिणमध्ये काँग्रेसने ठाकरे गटाच्या अमर पाटील यांच्याऐवजी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिल्याने महाविकास आघाडीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी या दोन्ही काँग्रेस नेत्यांवर सडकून टीका केली. शरद कोळी यांनी प्रणिती शिंदे भाजपाच्या बी टीम असल्याचा, प्रणिती शिंदेंनी भाजपासोबत आतून हातमिळवणी केली असून, त्या भाजपाचा प्रचार करतात, असा आरोप केला. मात्र, शिंदे कुटुंबाची ही शेवटची खासदारकी आहे, यापुढे तुम्हाला खासदारकी मिळणार नाही, असा इशाराही शरद कोळी यांनी दिला. सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांनी सोलापूरचा विकास केला नाही. शिंदे कुटुंबाने आमचे आभार मानण्याऐवजी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले. ही माणसं धोकेबाज निघाली, गद्दाराकडून काय अपेक्षा करणार, असा हल्लाबोल त्यांनी केला. आता काँग्रेसकडूनही शरद कोळी यांच्यावर पलटवार करण्यात आला आहे.

**काँग्रेसकडून गाडी फोडण्याचा इशारा**

सोलापुरात ठाकरे गट आणि काँग्रेसमधील वाद टोकाला गेला आहे. प्रणिती शिंदेंची गाडी फोडण्याआधी तुझी गाडी फोडतो, असा इशारा युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षाने शरद कोळींच्या कार्यालयापुढे जाऊन दिला. काँग्रेसच्या युवक नेत्याने म्हटले आहे. ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळींनी काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर आज युवक काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. शरद कोळींची गाडी ज्या दिवशी कार्यालयासमोर थांबेल, त्या दिवशी ती गाडी फोडणार, असा इशारा काँग्रेसने दिला. ◀(वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# ‘एक है तो सेफ है’

जेमतेम पाच वर्षांच्या काळात तब्बल अडीच सत्ताबदल अनुभवलेल्या महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघांत २० नोव्हेंबरला विधानसभेसाठी एकाच वेळी झालेल्या निवडणुकांनंतर आता देशाचे लक्ष महाराष्ट्रावर केंद्रित झाले आहे. २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्राने सत्तेच्या राजकारणाचे अनेक कंगोरे अनुभवले. याच काळात मतदारांनी दिलेला कौल नाकारून महाविकास आघाडीने सत्तेवर कब्जा मिळविला आणि त्या सत्तेच्या अडीच वर्षांतील संकटकाळात महाराष्ट्राच्या प्रगतीची चाके उलटी फिरल्याचा अनुभव महाराष्ट्राने घेतला. अशा अनिश्चित आणि निष्क्रिय सत्ताकाळात राजकीय नाराजीनाट्य उफाळून येणे साहजिकच होते, त्यामुळे सव्वादोन वर्षांपूर्वी महायुतीचे सरकार सत्तेवर आले आणि अस्थिर झालेला कारभार पूर्वपदावर येऊन स्थिरावल्याचेही महाराष्ट्राने अनुभवले. या पृष्ठभूमीवर विधानसभेची ही निवडणूक औत्सुक्यपूर्ण ठरणार होतीच. उद्या, २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाल्यानंतर निकाल जाहीर होणारच आहेत. निर्णयासाठी आता जेमतेम काही तासांचा अवधी शिल्लक असताना, सत्ता कोणाची येणार, यावर केवळ अंदाज वर्तविण्यात हशील नाही. बुधवारी मतदानाची वेळ संपल्यानंतर विविध माध्यमांनी घेतलेल्या मतदानोत्तर चाचण्यांतूनही फारसे काही ठोस अंदाज वर्तविले गेलेले नाहीत. असे अंदाज वर्तविणे ही माध्यमविश्वातील केवळ प्रथा मानून तसे करण्याची आता गरज राहिलेली नाही. दुसरे म्हणजे, मतदाराच्या मनाचा थांग घेण्यासाठी त्याच्या मनाच्या तळाशी डोकावण्याचे तंतोतंत तंत्र अजूनही कोणास साधलेले नाही. त्यामुळे मतमोजणीनंतरचे प्रत्यक्ष निकाल हेच यावेळी महाराष्ट्राच्या सत्ताधीशांची दिशा स्पष्ट करणारे एकमेव सूत्र आहे. म्हणून त्याची अनावश्यक मीमांसा न करता, या निवडणुकीच्या नव्या वेगळेपणाची चर्चा करणे उचित ठरेल. तब्बल तीन दशकांनंतर महाराष्ट्राच्या मतदारांमधील मरगळ झटकली जात असल्याचे संकेत या निवडणुकीतील मतदानाने दिले, हे या निवडणुकीचे वेगळेपण ठरले आहे. महाराष्ट्राच्या मतदारांमध्ये ही जागरूकता कशामुळे आली, त्याचा शोध घेणे ही या निवडणुकीच्या निकालानंतरची नेमकी मीमांसा ठरेल आणि भरघोस मतदानातील मोठा वाटा मतदारांच्या कोणत्या वर्गाने उचलला, याचा नेमका आढावा घेणे हे या निमित्ताने शोधणे उचित ठरेल. मतदानाची वेळ संपल्यानंतर राज्यात जाहीर झालेल्या मतदानाच्या टक्केवारीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत, हे स्पष्ट दिसते आहे. या मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीचे मूळ कशात आहे, हे शोधणे आवश्यक ठरते. बुधवारी रात्री उशिरा मतदानाची सारी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्पष्ट झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार १३४ मतदारांपैकी ६५ टक्क्यांहून अधिक, म्हणजे जवळपास ६ कोटी ३१ लाख मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. गेल्या सुमारे ३० वर्षांतील हा मतदानाच्या टक्केवारीचा उच्चांक मानला जातो. १९९५ मधील विधानसभा निवडणुकीत ७१.७० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. तेव्हा राज्यातील मतदारांची एकूण संख्या पाहता, आजच्या निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीतील भरघोस प्रतिसादाची कल्पना करणे शक्य आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान राज्यातील मतदानाची टक्केवारी ६१.३९ टक्के एवढी होती आणि पाच वर्षांपूर्वी, २०१९ मधील विधानसभा निवडणुकीत ६१.४० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारण आणि सत्ताकारणावरून मतदारांनी बरेच काही धडे घेतले असावेत, असा अंदाज या वाढलेल्या टक्केवारीवरून वर्तविता येऊ शकतो. पण हेदेखील तेवढेच एकमेव कारण नाही. निवडणुका जाहीर झाल्यापासून गेल्या जवळपास महिनाभरात राज्याच्या कानाकोपऱ्यात सत्तास्पर्धेतील दोन प्रमुख आघाड्यांनी केलेल्या आक्रमक प्रचाराचा हा परिणाम असू शकतो का, याचे उत्तरही उद्याच मिळणार आहे. तरीही या प्रचाराच्या काही मुद्यांचा प्रभाव अधोरेखित करावा लागेल. गेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपप्रणीत महायुतीला मोठा फटका बसला असला, तरी त्या विजयाचा डांगोरा पिटणाऱ्या महाविकास आघाडीच्या मतांची टक्केवारी महायुतीहून केवळ सुमारे सव्वा टक्क्यांनी अधिक होती आणि विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातून हा फरक भरून काढण्याकरिता आखणी करण्याचे आव्हान महायुतीसमोर होते. भारतीय जनता पार्टीने महायुती करून या निवडणुकीत काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडीस शह देण्याकरिता हीच नीती वापरून मतदारांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव टाकला, हा मतदानाच्या वाढीव टक्केवारीचा प्राथमिक परिणाम मानता येईल. ‘एक है तो सेफ है’ ही महाराष्ट्राच्या राजकारणासाठी केवळ निवडणूक प्रचाराची घोषणा नव्हती, तर समाजात भय फैलावणाऱ्या प्रवृत्तींच्या विरोधात दिली गेलेली ती राजकीय ऐक्याची हाक होती असे मानले, तर मतदानाच्या वाढीव टक्केवारीमागील कारणे स्पष्ट होऊ शकतात. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत विविध समाजघटकांमध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे अस्पष्ट, अंधुक अशा मानसिक दुफळीच्या रेषा उमटल्या आहेत. त्यामुळे निर्माण झालेल्या सामाजिक अशांततेमुळे काही अनामिक भयाचे सावटही समाजव्यवस्थेवर दाटून राहिले आहे. या पृष्ठभूमीवर ऐक्याची हाक देऊन निवडणुकीच्या निमित्ताने समाजात पुन्हा एकदा ऐक्याच्या भावनेचे महत्त्व रुजविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला का, याचे विश्लेषण केल्यास, मतदानाच्या वाढीव टक्केवारीमागे हेदेखील कारण असू शकते. ‘एक है तो सेफ है’ या आवाहनामुळे राज्यातील समाज राजकीयदृष्ट्या एकवटला आणि मोठ्या संख्येने मतदान करून सुरक्षितता आश्वस्त करण्याची समाजाची सामूहिक मानसिकता असावी, असाही या वाढीव मतदानाचा निष्कर्ष असू शकतो. म्हणूनच निकालांनंतर सत्तेच्या राजकारणाचे भवितव्य स्पष्ट होणार असले, तरी तब्बल तीन दशकांनंतर पुन्हा एकदा मतदारांच्या सामूहिक मानसिकतेमधील जागरूकता हे या निवडणुकीचे वेगळेपण नजरेआड करता येणार नाही.

मतदारांच्या या राजकीय उत्स्फूर्ततेचे प्रतिबिंब निकालात कसे उमटेल आणि कोणत्या पक्षास सत्तेच्या राजकारणात त्याचा लाभ होईल याविषयी राजकीय पक्षांचे दावे-प्रतिदावे आता सुरू झाले आहेत. मतदारांचा हा भरघोस कौल आपल्याच पारड्यात पडणार, असा दावा महाविकास आघाडी आणि महायुती या उभय प्रतिस्पर्ध्यांकडून केला जात आहे. मात्र, मतदानोत्तर चाचण्यांतून निघालेले सावध निष्कर्ष या दाव्यांना ठाम विश्वासाचे पाठबळ देत नाही. म्हणूनच जेव्हा मतदानाची टक्केवारी वाढते तेव्हा नेमके काय घडते हे तपासणे योग्य ठरते. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात सर्वाधिक म्हणजे ७१.६९ टक्के एवढे मतदान झाले होते. त्याआधीच्या युतीच्या झंझावाती प्रचारात काँग्रेसच्या कारभाराची लक्तरे भाजपाने अक्षरशः वेशीवर टांगली होती. राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, लाचखोरी हेच प्रमुख मुद्दे घेऊन भाजपाने राज्याचा कानाकोपरा पिंजून काढला आणि १९९५ पूर्वीच्या तीन-चार वर्षांत राज्याने भोगलेल्या भयाग्रस्ततेची परतफेड करून मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीच्या हाती सत्तेची सूत्रे सोपविली होती. त्याआधी १९६२ पासून १९९५ पर्यंतच्या सात विधानसभा निवडणुकांत मतदानाच्या सरासरीने ६० टक्क्यांची सीमा पार केली नव्हती. पुढे २०१४ मध्ये मतदानाची टक्केवारी ६३.३८ पर्यंत पोहोचली आणि भाजपाचा सत्तेचा मार्ग मतदारांनी प्रशस्त केला. २०१९ मध्येही ६१.४४ टक्के मतदान झाले आणि वाढीव मतदानाचा फायदा पुन्हा युतीलाच झाला होती. उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी जुळविलेल्या नव्या गणितांमुळे मतदारांचा हा कौल खुंटीवर टांगला गेला असला, तरी मतदारांची मानसिकता मात्र स्पष्ट होती. त्यामुळे जेव्हा मतदार मोठ्या संख्येने बाहेर पडतो, तेव्हा त्याचा कौल भाजपाला असतो, असा प्राथमिक निष्कर्ष यंदाच्या मतदानासही पोषक ठरू शकतो. ‘एक है तो सेफ है’ असा संदेश देणाऱ्या पक्षावर सामाजिक सुरक्षिततेची जबाबदारी असते. हा संदेश भाजपाने दिलेला असल्याने, ती जबाबदारी भाजपावर पडते, म्हणून मतदारांचा कौल भाजपाच्या बाजूने पडतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. त्यासाठी आणखी केवळ काही तासांचीच प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## दृष्टिक्षेप

### प्रवीण दीक्षित

# तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कारागृह सुरक्षा अन् सुधारणा

महाराष्ट्रात ६० कारागृहे आहेत. त्यातील मुंबई, ठाणे, तळोजा, येरवडा-पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती ही मध्यवर्ती कारागृहे आहेत. सध्या कारागृहात जवळ जवळ ४१ हजार कैदी आहेत. मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांची संख्या तेथील मान्यताप्राप्त क्षमतेहून कित्येक पटींनी अधिक आहे. यातील न्यायालयाने शिक्षा सुनावलेले ७७०० कैदी आहेत; ज्यात ७०७० पुरुष व २४५ महिला आहेत. शिवाय ३३,३०० वर कच्चे कैदी आहेत. त्यात ३१,७०० पुरुष तर १३४२ महिला आहेत. या कैद्यांसोबतच १५ तृतीयपंथीसुद्धा कच्चे कैदी म्हणून बंदिस्त आहेत. सर्वाधिक कैदी असलेल्या कारागृहांचा तपशील- येरवडा ५५१०, ठाणे ३९९९, मुंबई ३४४१, तळोजा २५०२, कल्याण २०५० व नागपूर १८९२. जवळपास ७९ टक्के कैदी हे कच्चे कैदी आहेत. त्यांना कोणतेही शारीरिक काम देता येत नाही. त्यांना शिक्षण, शिक्षेत सवलत अशा सुविधा मिळत नाहीत. कच्च्या कैद्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यांच्यावर शासनाचा खूप खर्च होतो. त्यांना न्यायालयात वेळेवर उपस्थित करणे, त्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचा फौजफाटा तैनात करणे आणि पोलिस वाहनांची व्यवस्था करणे या कामांचा भारही शासनाला सहन करावा लागतो. याशिवाय कच्च्या कैद्यांना न्यायालयात नेताना तसेच न्यायालयातही त्यांच्यावर त्यांचे विरोधक जीवघेणा हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा वेळोवेळी प्रयत्न करतात. कच्च्या कैद्यांना वारंवार रुग्णालयात तपासासाठी न्यावे लागते. अनेक वेळा कारागृहात राहण्यातून सुटका सुटका मिळविण्यासाठी व रुग्णालयात स्वतःला ठेवून घेण्यासाठी हे कच्चे कैदी डॉक्टरांवर दबाव टाकतात.

वरील समस्यांवर उपाय म्हणून भारत सरकारने १ जुलै २०२४ पासून लागू केलेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहितामधील कलम ५३० चा उल्लेख करणे आवश्यक आहे. या कलमाप्रमाणे न्यायालयात तक्रारदाराची तपासणी, साक्षीदारांचे जबाब इत्यादी सर्व खटल्यांचे कामकाज दृक्श्राव्य पद्धतीने करण्यास नुसती मान्यता नव्हे, तर प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्याच बरोबर सर्व शासकीय रुग्णालयात आज टेली-मेडिसीन व्यवस्था उपलब्ध आहे; त्याद्वारे कैद्यास कारागृहातच तिथे नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मदतीने जवळच्या शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याकडून उपचार मिळण्याची सोय उपलब्ध आहे. दृक्श्राव्य माध्यमातून कच्चा कैदी त्याच्या विधि सल्लागाराशी तसेच नातेवाईकांशी संभाषण करू शकतो. त्यामुळे ठरावीक काही मध्यवर्ती कारागृहात गर्दीने व गैरसोयीने राहण्यापेक्षा राज्यातील ज्या कारागृहात कच्चे कैदी कमी आहेत, अशा ठिकाणी न्यायालयाचा आदेश मिळवून राहणे सहज शक्य आहे. तसेच कच्चा कैदी स्वतःच्या सुरक्षेसाठी सुनावणी दृक्श्राव्य पद्धतीने व्हावी म्हणून मागणी करू शकतो. जसे श्रद्धा वालकर खटल्यातील आरोपीने सांगितले की, त्याला लॉरेन्सकडून धमकी आहे? त्याची सुनावणी दृक्श्राव्य माध्यमाने घेण्यात यावी.

शिवाय कारागृहातून सुरक्षा भेदून ठिकठिकाणी दहशतवादी आणि कुख्यात गुन्हेगार पळून जाण्यात अनेक वेळा यशस्वी होताना दिसतात. आज जवळ जवळ सर्व महत्त्वाच्या कारागृहात पाकिस्तानी दहशतवादी, पाकिस्तानच्या मदतीने दहशतवाद माजवणारे काश्मीर येथील दहशतवादी, खलिस्तानवादी, सिमीसारख्या मूलतत्त्ववादी संघटनांचे कार्यकर्ते, आयसिसमध्ये भाग घेऊ इच्छिणारे, माओवादी आणि मोक्का कायद्याप्रमाणे कारागृहात ठेवलेले अनेक कुख्यात गुन्हेगार हे मुंबई, ठाणे, तळोजा, नाशिक, येरवडा-पुणे, नागपूर किंवा अन्य मध्यवर्ती कारागृहात आहेत. कित्येक खटल्याची वाट पाहात आहेत. त्यामुळे या कारागृहांवर दहशतवादी हल्ला होण्याची नेहमीच भीती असते. या प्रकारच्या कैद्यांना सुरक्षित अन्य कारागृहात ठेवून दृक्श्राव्य पद्धतीचा वापर करण्याने ही भीती कमी होऊ शकते. कारागृहातील व्यक्तींना आज त्यांच्या बॅरेकमध्येच पंखा, ट्यूब, टीव्ही अशाप्रकारे विजेच्या जिवंत जोडण्या सहज उपलब्ध आहेत. त्याचा गैरफायदा घेऊन यातील अनेक व्यक्ती मोबाईल फोन सहज मिळवून ते चार्ज करतात व त्याच्या माध्यमातून कारागृहाच्या बाहेरील व्यक्तींच्या बरोबर संपर्कात आहेत? अनेक व्यक्तींच्या खुनाचे कारस्थान करतात आणि पळून जाण्याचे प्रयत्न करतात. कारागृहाच्या बहुतेक सर्व इमारती या शंभर वर्षांहून अधिक जुन्या असल्याने त्यात अनेक ठिकाणी मोबाईल सुरक्षितपणे लपवून ठेवणे आज या व्यक्तींना सहज शक्य होत आहे. बहुतेक ठिकाणी कारागृहाचा आजुबाजूचा परिसर हा पूर्णपणे निर्मनुष्य असतो. अशा ठिकाणी पोलिस क्वचितच फिरकतात. कारागृहातील सुरक्षा कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य फारसे चांगले नाही, संख्या अपुरी आहे, त्यांना प्रशिक्षण पुरेसे नाही. त्यांच्याकडे आधुनिक पद्धतीची उपकरणेही नाहीत. याशिवाय कारागृहातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हेगार दडपण आणून किंवा भ्रष्टाचाराने अनेक सवलती मिळविण्यात यशस्वी होतात. कारागृहाची सुरक्षा कशी वाढवावी यासंबंधी कुख्यात गुन्हेगार पळून गेल्यानंतर नेमलेल्या चौकशी समितींनी वेळोवेळी अहवाल दिलेले आहेत. परंतु त्यात केलेल्या सूचनांची अंमलबजावणी होत आहे, असे दिसत नाही. प्रामुख्याने कारागृहातून रुग्णालयात किंवा न्यायालयात जाण्यासाठी बाहेर जाणे यावर कडक निर्बंध लावून दृक्श्राव्य पद्धतीचा वापर करून रुग्णालय, न्यायालये किंवा विधि सल्लागार यांना व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमाने जोडणे आज तांत्रिकदृष्ट्या सहज शक्य आहे व आवश्यकही आहे. कारागृहात मोबाईल फोन्स कोणत्याही प्रकारे चार्ज करता येणार नाही यासाठी बरॅकमध्ये विजेची कोणतीही जिवंत जोडणी राहणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. कारागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ कमीत कमी सहा सशस्त्र पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहतील व त्यांच्याजवळ वाहन व वॉकीटॉकी उपलब्ध राहील, याची खात्री करणे आवश्यक आहे. कारागृह परिसर व बाहेरील भाग हा सीसीटीव्हीच्या माध्यमातून निगराणीखाली आणण्याची आवश्यकता आहे. यामध्ये अंधारातही दिसू शकेल अशा प्रकारच्या इन्फ्रा रेड सोयींनी युक्त असे सीसीटीव्ही बसवणे गरजेचे आहे. तुरुंगातील व बाहेरील भाग येथे सोडियम व्हेपरचे प्रखर दिवे लावणे आवश्यक आहे. याशिवाय कारागृहातील भिंतींच्या वर कॉन्सर्टिना वायर व त्यात भोंगे बसविण्याची गरज आहे. कारागृहाच्या प्रवेशद्वारावर विशेष कंट्रोलरूम निर्मिती करून त्यातून जवळच्या पोलिस अधिकाऱ्यांना संपर्काची व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारागृहातील भिंतीच्या जवळील निर्मनुष्य भागाजवळ सेन्सॉर्स लावून तेथील हालचाल कंट्रोलरूममध्ये कळेल, अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारागृहाच्या आत प्रत्येक ठिकाणी कमीत कमी दोन ते तीन सशस्त्र सुरक्षा कर्मचारी ठेवणे आणि त्यांच्याकडे वॉकीटॉकी देणे गरजेचे आहे. कारागृहाच्या बाहेरून सशस्त्र पोलिसांची दर १५ मिनिटांनी गस्त ठेवण्याची आवश्यकता आहे; ज्यामुळे कोणतीही अनुचित गोष्ट नजरेला येऊन कारवाई करता येऊ शकेल. एखाद्या व्यक्तीस कारागृहात ठेवले म्हणजे आपल्याला त्याच्यापासून होणारा त्रास नाहीसा झाला, असे न समजता स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांनी त्याच्यावर दैनंदिन लक्ष ठेवणे व कारागृह अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा देशांतर्गत सुरक्षा मोठ्या प्रमाणावर धोक्यात येण्याची शक्यता आहे.

(लेखक निवृत्त पोलिस महासंचालक आहेत)

## वेध

### प्रफुल्ल क. व्यास

# कापूस, सोयाबीनला योग्य भाव मिळावा

हिंदू पंचांगानुसार श्रावण महिना अतिशय पवित्र महिना मानला जातो. याच महिन्यात ‘जीवती’ हा सण साजरा केला जातो. या दिवशी दिव्यांची पूजा केली जाते. गेल्या काही दिवसात या दिवसाला ‘गटारी’ म्हणून एक नवीन पायंडा पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या दिवशी खान्देश, मराठवाड्यात दारू ढोसून चिखलात लोळवल्या जाते. आता गटारीला दारूड्यांमध्ये हळूहळू मान्यता मिळू लागली आहे. हिंदू सणांना अशी जोड लावून बदनाम करण्याची एक नवीन विकृत मानसिकता जन्माला आलेली आहे. ‘पिने वालो को पिने का बहाना चाहीये.’ ही झाली एक गटारी वर्षातून येणारी! दुसऱ्या गटारीचा यावेळी नव्याने जन्म झाला आहे तो महाराष्ट्रातील विधानसभा दिवडणुकांच्या निमित्ताने! महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचे वेध लागले आणि गावखेड्यात असलेले विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सत्तेत असलेले महायुती सरकार नियोजित वेळी निवडणुका घेणार नाहीत इथपासून भविष्य वर्तविणे सुरू केले. (राज्यातील महानगर पालिका, जि.प., पं.स. आणि न.प.च्या लांबलेल्या निवडणुका हे त्याचे दाखले होते.) परंतु, सर्व भविष्यवेत्त्यांचा अंदाज चुकीचा ठरवत निवडणूक आयोगाने परंपरागत ठरलेल्या वेळेवर निवडणुका जाहीर केल्या आणि राज्य सरकारचा कार्यकाळ संपण्यापूर्वी दुसरे सरकार स्थापन होईल, असे नियोजन केले. काल २० नोव्हेंबर रोजी राज्यात नवीन सरकारसाठी ६५.११ टक्के मतदारांनी मतदान केले आणि हीच २० तारीख महाराष्ट्रात दुसरी ‘गटारी’ घेऊन आली. राज्यातील कोणत्याही निवडणुकांमध्ये ज्या वादग्रस्त घडामोडी घडल्या नाहीत त्या सर्वांची भर या निवडणुकीने भरून काढली. राज्यातील या विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदाच दोन राष्ट्रवादी आणि दोन शिवसेना एकमेकांविरुद्ध लढल्या. भारतीय जनता पार्टी (महायुती) आणि काँग्रेस (महाविकास आघाडी) या दोन आघाड्यांमध्ये लढत होती. आचारसंहिता लागल्यापासून ते मतदानाच्या पूर्वसंध्येपर्यंत मैत्रीपूर्ण लढतीचे चित्र रंगवले गेले. परंतु, ते लपून राहिलेले नाही. मैत्रीपूर्ण लढतीतही विरोधी तर काही ठिकाणी अपक्ष उमेदवारही लढवल्या गेले. आरोप-प्रत्यारोपातही या निवडणुकीने नीचांक गाठला. महाराष्ट्र धर्म आणि स्वाभिमान सांगणारे संजय राऊत यांनी तर स्वतःच्या शिवसेनेसोबत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची वकिली करण्याचा ठेकाच घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचे नवल नव्हते! मात्र, १७ ते १९ नोव्हेंबर या दोन दिवसात राज्यातील सर्वच राजकीय पक्षाचे बुरखे फाटले. खरे चेहरे मतदारांपुढे आले. राजकारणी आपले संबंध जोपासून ठेवतात आणि कार्यकर्ते तेच संबंध अंगावर घेतात. निवडणूक काळात भांडणंही करतात. अगदी वैयक्तिक द्वेषापर्यंत पोहोचतात. राज्यात यावेळी निवडणूक आयोगाने आपली भूमिका अतिशय निःपक्षपणे पार पाडली. तेव्हाच राज्यात कोट्यवधी रुपयांची रक्कम दररोज पकडल्या जात होती. ही रक्कम निश्चितच विधानसभा निवडणुकांमध्ये वाटण्यासाठी जात होती, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. यावेळची निवडणूक पुन्हा एका विषयाने गाजली ती म्हणजे हल्ले! अमरावतीत नवनीत राणा, धामणगाव येथे प्रताप अडसड यांच्या भगिनीवर चाकू हल्ला तर नाशकात ‘आज तुझा मर्डर नक्की’ अशी धमकी दिली. परळीत शरद पवार गटाच्या नेत्याला मारहाण करण्यात आली. ईव्हीएम फोडल्या. बल्लारपूर मतदार संघातही दोन गटात राडा झाला. बुलढाणा जिल्ह्यातील वरवट बकाल येथे एका उमेदवारावर हल्ला करण्यात आला. काटोल येथे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या वाहनावर दगडफेक झाली. मात्र, देशमुखांच्या वाहनाच्या बोनेटवर असलेला दगड बघून एवढा मोठा दगड उचलून तो मारून फेकला जाईल, असे अजिबात वाटत नाही. त्यांचे भाचे खा. अमर काळे यांच्या आर्वीत भाजपाच्या एका कार्यकर्त्याच्या शेतात दारू सापडली. विशेष म्हणजे ही दारू पकडण्यात खा. अमर काळे आघाडीवर होते आणि पोलिस नंतर पोहोचले. विशेष म्हणजे दारू सापडल्यानंतर खा. काळे यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ‘झाला रे बा आपला विजय!’ असे सांगणारा होता. मामा-भाच्याचा बनाव या निमित्ताने उघडकीस आले. नागपुरात मतदानाच्या दिवशी दिवसभर तणाव होता. रात्री काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कारवर हल्ला केला. राज्यात विधानसभेच्या निवडणुकांमध्ये भांडणं होत नव्हती अशातला भाग नाही. परंतु, एवढा स्तर घसरलेला नव्हता. राज्याचा बिहार होऊ न देण्यासाठी एकगठ्ठा मतदान करण्याचे आवाहन निवडणूक प्रचार काळात समाजमाध्यमातून होत होते. परंतु, त्याची चाहूल यावेळी लागली. या घटना निपटण्याची जबाबदारी आगामी सरकारची आहे. त्यापूर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या सोयाबीन आणि कापसाला योग्य भाव देण्याचा पहिला धडाकेबाज निर्णय घ्यावा... गटारी वगैरे शेतकरी राजा तसेच तुडवून टाकतात...

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

### मोरेश्वर बडगे

# निकाल लागला; महायुतीच येणार!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक संपली. आता चर्चा आहे, कोणाची सत्ता येणार? महायुती सत्ता कायम राखणार की महाविकास आघाडी डल्ला मारणार? मग मुख्यमंत्री कोण होणार? २३ नोव्हेंबरला निकाल आहे. आजच्या वाढलेल्या मतदानाने निकालाचा बराचसा अंदाज येतो. विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्या आधी कुठल्याही परिस्थितीत सत्ताधाऱ्यांना नवी विधानसभा, नवे सरकार बसवावे लागेल. कोण आणणार सत्तेचा मंगलकलश? पुन्हा महायुती की महाआघाडी धक्का देणार? महायुतीचे चान्सेस जास्त दिसत आहेत. मात्र, नेमके उत्तर शोधताना सामान्य मतदारांचा गोंधळ उडतो. त्याला कारणही तसेच आहे. यंदाची निवडणूक आतापर्यंत झालेल्या निवडणुकांपेक्षा वेगळी आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे राज्यातले प्रमुख पक्ष फुटल्यानंतरची ही पहिली निवडणूक आहे. दिसायला दोन शक्तींमधला सामना आहे. मात्र सहा प्रमुख पक्ष मैदानात आहेत. महाविकास आघाडीच्या बाजूला काँग्रेस, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे तर महायुतीच्या बाजूने भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी उभे ठाकले आहेत. विषय इथे संपत नाही. राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना, प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी, संभाजीराजे, परिवर्तन महाशक्ती... भरपूर पक्ष मैदानात उतरले आहेत. प्रत्येक निवडणुकीत बंडखोर असतात. मात्र यावेळी बंडखोरांचे मोठे पीक आहे. पैशाचा पाऊसही सपाटून पडला आहे. का नाही पडणार? राजकीय पक्षांनी दिलेले उमेदवार करोडपती आहेत. शरद पवारांनी उभ्या केलेल्या ८४ उमेदवारांपैकी ८० करोडपती आहेत. काँग्रेसने दिलेल्या १०१ उमेदवारांपैकी ९४ करोडपती तर उद्धव ठाकरे यांनी उतरवलेल्या ९५ पैकी ९४ करोडपती आहेत. भाजपा १४९ जागा लढवत आहे. यातले १४४ उमेदवार करोडपती आहेत. अजितदादा पवार यांच्या ५० उमेदवारांपैकी ४८ करोडपती आहेत. फक्त ४० लाख खर्चायला परवानगी आहे, असे निवडणूक आयोग सांगतो. मात्र, ४० लाखात निवडणूक होते का? होत नाही म्हणून मग बाकी गोष्टी होतात. निवडणुका सामान्य माणसाच्या हातून निसटत चालल्या आहेत. निवडणुकीतून सामान्य माणसांचे मुद्दे गायब होत चालले आहेत, त्याचे हेही एक कारण आहे. यावेळी तर विरोधकांनी खूप शिमगा खेळला. विकासाच्या मुद्याची फार चर्चाच झाली नाही. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यात प्रचार संपला.



सत्तेचा हायवे विदर्भातून जातो. विदर्भ जिंकणाऱ्याला सत्ता जिंकणे सोपे जाते. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत विदर्भात भाजपाला तडाखा बसला. त्यामुळे मोदींना ४०० चा आकडा गाठता आला नाही. मित्रपक्षांना सोबत घेऊन नरेंद्र मोदींनी तिसऱ्यांदा सरकार बनवले तो भाग वेगळा. मात्र, ही निवडणूक भाजपामध्ये सर्वांनीच गंभीरपणे घेतली होती. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार नाकेबंदी केली. नितीन गडकरी जोरदार फिरले. नरेंद्र मोदी-अमित शाह जोडीने जंगी सभा केल्या. त्यामुळे विदर्भातून महायुतीला मोठी ताकद मिळेल. तसाही, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या एक टक्क्यापेक्षा कमी मतांचा फरक आहे. मात्र आघाडीला ३१ जागा मिळाल्या तर महायुतीला १७ जागा. आकड्यांची ही जादू आहे. जिता वह सिकंदर. विधानसभा निवडणुकीत मतदारसंघ लहान लहान असतात. स्थानिक मुद्यांवर निवडणूक लढली जाते. दोन-पाच हजारात निकाल लागतो. फार चुरस झाली तर शे-पाचशेमध्येही फैसला होतो. यावेळी उमेदवारांची गर्दी असल्याने मतविभाजन मोठ्या प्रमाणावर होणार आहे. त्याचा महायुतीला फायदाच आहे. लोकसभा १५० विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीला लीड होता. मात्र लोकसभा निवडणूक आणि आता झालेली निवडणूक यात जमीन-अस्मानाचा फरक सांगता येईल. पाच महिन्यात वारे खूप बदलले आहे. मनोज जरांगे पाटील या मराठा आंदोलकाने मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण मिळावे या मागणीच्या आडून आंदोलन केले. आरक्षण मिळतंय या हवेतून मराठा समाज त्यांच्यामागे गेला, पण जरांगे नावाचा फुगा फुटला. शरद पवार यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी उभे केलेले हे पिल्लू होते, ही गोष्ट आता मराठ्यांच्याही लक्षात येते आहे. त्यामुळे जरांगे फॅक्टर आता फार चालणार नाही. मोदींना संविधान बदलण्यासाठी ४०० जागा पाहिजेत, असा खोटा प्रचार विरोधकांनी चालवला. त्यामुळे मुस्लिम, दलित वर्ग तिकडे गेला. मात्र आज विरोधक उघडे पडले आहेत. भाजपाला रोखण्यासाठी विरोधकांकडे कुठला ठोस मुद्दाच नाही. ‘बटेंगे तो कटेंगे’ असा नारा या निवडणुकीच्या रणधुमाळीत उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिला. ‘एक है तो सेफ है’ असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. या दोन नाऱ्यांनी महाविकास आघाडीला ‘उघडं’ केलं आहे. यावेळी या मतांमध्ये विभाजन आहे. मुस्लिम मतं मोठ्या प्रमाणावर ओवेसी आणि अबू आझमी खातील. संभाजी राजेंची आघाडी मैदानात आहे. दलित मतंही विखुरलेली दिसतील. वंचित आघाडी आहे, राज ठाकरे यांची मनसे आहे. हे सारे महाविकास आघाडीचीच मतं खाल्लेले दिसतील. हिंदू मतं विभाजित होतात. मात्र हिंदू मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. लोकसभा निवडणुकीत ६६ टक्के मतदान झाले होते. गेल्या विधानसभेत ६४ टक्के मतदान झाले होते. यावेळी मतदानाचा टक्का वाढलेला दिसतो. त्यामुळे कसेही फासे पडले तरी महायुतीचा विजयरथ थांबणे नाही. लिहून ठेवा.

एकटी ‘लाडकी बहीण’ योजनाच महाआघाडीला लंबी करणार आहे. लोकसभा निवडणुकीत ‘लाडकी बहीण’ या योजनेने अडीच कोटी ‘बहिणीं’ना लाभ झाला आहे. यातल्या निम्म्याही ‘बहिणी’ची मतं मिळाली तरी बल्ले बल्ले! सर्वात मोठी गोष्ट म्हणजे यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सैन्य भाजपाच्या मदतीला मैदानात उतरले होते. अंदाज आहे की, महाविकास आघाडी शंभराच्या आत गुंडाळली जाईल. लोकसभा निवडणुकीत भाजपाला पटकणी देणारी महाविकास आघाडी राज्याच्या एवढा मार खाईल, हे अनेकांना पचनी पडणार नाही. पण ते होणार आहे. लोकसभा निवडणूक लागली तेव्हा शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटले होते. त्या सहानुभूतीचा लाभ त्यांना मिळाला. महाआघाडीला ३१ म्हणजे सर्वाधिक जागा मिळाल्या. जागा जास्त मिळाल्या तरी आघाडी आणि महायुती यांना मिळालेल्या मतांचा फरक नगण्य होता. लोकसभेतील यशाची आघाडीच्या नेत्यांना मस्ती चढली. आता तिन्ही घटक पक्ष एकमेकांच्या तंगड्या ओढू लागले. मुख्यमंत्री कोण होणार? यावरून उद्धव ठाकरे यांनी गोंधळ घातला. त्यानंतर शरद पवार, नाना पटोले सावध झाले. महाआघाडी हरली तर त्याचे श्रेय उद्धव ठाकरे आणि त्यांचे हनुमान संजय राऊत यांना दिले पाहिजे. या दोघांनी ज्या पद्धतीने आग ओकली ते मतदारांना आवडले नाही. ताजा किस्सा सांगतो, हेलिकॉप्टर तपासायला निवडणूक आयोगाचे अधिकारी आले तेव्हा उद्धव ठाकरे त्यांच्याशी ज्या उद्दामपणे वागले ते कोणालाही पसंत पडले नाही. मुख्यमंत्री पदावर दावा सांगायचा तर जास्त आमदार निवडून आणावे लागतील. त्या स्पर्धेतून एकमेकांचे उमेदवार पडण्याची जणू शर्यतीच लागली होती. त्या शर्यतीचा निकाल तुम्हीही सांगू शकता.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे


### हवामान बदल आणि लहान मुलं

सध्या भारतामध्ये लहान मुलांची संख्या ४४ कोटी एवढी आहे. २०५० पर्यंत ही संख्या ३५ कोटींपर्यंत खाली येऊ शकते. त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हे मोठे आव्हान असणार आहे. युनिसेफने जागतिक पातळीवर मुलांच्या एकूण स्थितीबाबत एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. सध्या लोकसंख्येत काही बदल होत आहेत. दिवसेंदिवस पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. हवामान बदलाचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्नसुद्धा अवघड होत चालला आहे. तंत्रज्ञानामध्ये सतत बदल होत आहेत. या सर्वांचे परिणाम लहान मुलांवर होणार. युनिसेफने म्हटले आहे की, २००० च्या तुलनेत आठ पट जास्त उष्णतेच्या लाटांना लहान मुलांना सामोरे जावे लागेल. २०२४ हे वर्ष जगात अनेक दृष्टीने महत्त्वाचे होते. त्यामध्ये तापमानाची प्रचंड वाढ दिसून आली होती. कमी उत्पन्न असलेल्या काही देशात विशेषतः आफ्रिका इत्यादी. दारिद्र्य कमी, शिक्षण-आरोग्याची हेळसांड अशा अनेक समस्या जाणवू लागतील. शिवाय काही देशात सतत युद्धाचे वातावरण आहे. त्याचाही परिणाम लहान मुलांवर होऊ शकतो. त्यांच्या विकासात अडथळे निर्माण होऊ शकतात. एकूणच येणारा काळ हा लहान मुलांच्या दृष्टीने सध्या तरी कठीण आहे. युद्धसदृश स्थिती हा एक उपाय होऊ शकतो.

**शांताराम वाघ**/पुणे

### मतदानाची टक्केवारी इतकी कमी?

२० तारखेला महाराष्ट्राची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली. किती लोकांनी आपले मत टाकले, त्याची नोंदणी, जिल्हावार आकडेवारी आली. जवळपास सरासरी ६० टक्के लोकांनी मत टाकले आणि ४० टक्के लोकांनी आपले मत टाकले नाही. या लोकांनी मतदान का केले नाही, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. मतदान हा आपला हक्क आहे. आपले सरकार आपल्या मताप्रमाणे निवडून देण्याचा आपल्याला अधिकार मिळाला आहे. त्यामुळे प्रत्येकाची जबाबदारी आहे की आपल्या



पसंतीचा, राज्याचे कर्तव्य निभावणारा, देशाची जबाबदारी सांभाळणारा राष्ट्रनिष्ठ अशा उमेदवाराला आपण मत द्यायला हवे. चांगल्या उमेदवारांना निवडून आणायला हवे. एक मत फार महत्त्वाचं असतं. नगरपालिकेची निवडणूक होती. ह्यांचा मित्र निवडणुकीत उभा होता. दुसऱ्या दिवशी मंगळागौरीचे उद्यापन असल्यामुळे माझ्याकडे पाहुणे आले होते. परंतु मला हे म्हणाले की, तुला आता मतदान केलेच पाहिजे. लवकर चल. मी यांच्याबरोबर गेले. मतदान केलं. माझं शेवटचं मत होतं. त्यानंतर मतदानाची वेळ संपली. त्यांचा मित्र फक्त एका मताने जिंकून आला. एक मत किती महत्त्वाचं असतं. आपलं मत अत्यंत महत्त्वाचं आहे हे त्यादिवशी मला कळलं. प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. मतदानाची टक्केवारी वाढावी. यापुढे निवडणुकांमध्ये ९० टक्के मतदानाची नोंद दिसायला हवी. निवडणुकांमध्ये लोकांनी मतदान करावंच करावं, अशी अपेक्षा आहे.

**मीना खोंड**/७७९९५६४२१२

### मतटक्का अपेक्षानुरूप वाढला?

मतदान पार पडल्यानंतर राज्यातील महासंग्राम आता थांबला आहे. राज्यात काही ठिकाणी काही प्रमाणात मतदानाची टक्केवारी वाढली आहे. किमान ७० टक्के मतदान राज्यात होईल, अशी अपेक्षा सर्वांनाच होती. गडचिरोली जिल्ह्याने मतदानाच्या बाबतीत पहिला क्रमांक पटकावला आहे. कोल्हापूर, भंडारा आणि गोंदिया जिल्हे आहेत. १५ जिल्ह्यांत प्रथम श्रेणीचे (६० टक्क्यांपेक्षा जास्त) मतदान झाले. मुंबई शहर आणि ठाणे याठिकाणी मतदान टक्केवारीला पन्नाशीसुद्धा गाठता आली नाही. विद्येच्या माहेरघरी आणि संत्रानगरीत ही टक्केवारी जेमतेम ५४ आणि ५६ एवढीच आहे. सुशिक्षित मतदार जर मतदानाकडे पाठ फिरवत असेल तर याला काय म्हणावं? झोपड्यांमध्ये राहणाऱ्या तुलनात्मक अशिक्षित मतदाराने भरघोस मतदान केले. निवडणूक आयोगाने मतदान वाढवण्यासाठी जाहिराती दिल्या, पण म्हणावी तशी तयारी केली नाही. मतदान केंद्रावर ज्येष्ठांसाठी किमान बसण्याची व्यवस्था असणं गरजेचं नाही का? मतदान यंत्रांची मतदानपूर्व तपासणी केल्यानंतर इतकी मतदान यंत्र बंद का पडतात? मतदान कक्षामध्ये पुरेसा प्रकाश आवश्यक नाही का? मतदार यादीत नाव नसण्यासाठी प्रशासन आणि राजकीय पक्ष हे दोघेही जबाबदार आहेत. राज्यातील लाखो मुलं-मुली परदेशांत जॉब करतात. केवळ मतदानासाठी मायदेशात काही जण येतात. सर्वांना ते शक्य होत नाही. या भारतीय नागरिकांसाठी काहीतरी उपाय शोधावेच लागतील. गेल्या काही वर्षांत राज्यात घडलेला सत्तासंघर्षाचा आणि निवडणूकपूर्व प्रचाराने गाठलेली नीचांकी पातळी मतदाराला उदासीन करते का?

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### पंतप्रधान मोदींकडून भारतीय महिला हॉकी संघाचे कौतुक

**नवी दिल्ली :** भारतीय महिला हॉकी संघाने राजगीर, बिहार येथे आश्चर्यकारक कामगिरी केली आणि त्यांनी महिला आशियाई चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात चीन संघाचा पराभव केला. भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत पूर्ण वर्चस्व दाखवले आणि विजेतेपद पटकावले. भारतीय महिला हॉकी संघाच्या या कामगिरीबद्दल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला हॉकी संघाचे कौतुक केले आहे. पंतप्रधानांनी विजयी संघाचे अभिनंदन व कामगिरीबद्दल कौतुक करणारे ट्विट पाठवले. एक अभूतपूर्व कामगिरी! महिला आशियाई चॅम्पियन्स चषक जिंकल्याबद्दल आमच्या हॉकी संघाचे अभिनंदन. त्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट खेळ केला. त्यांचे यश अनेक नवीन खेळाडूंना प्रेरित करेल, असे पंतप्रधान मोदी यांनी 'द एक्स' वर ट्विट केले. अंतिम सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाने ऑलिम्पिक रौप्यपदक विजेत्या चीनचा १-० असा पराभव करत आपल्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतेपदाचे यशस्वीपणे रक्षण केले. ११ गोलांसह, युवा आक्रमक खेळाडू दीपिकाने स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारी खेळाडू म्हणून मान मिळवला. तिने ३१ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरवर भारताचा विजयी गोल केला.



# बॉर्डर-गावस्कर चषक मालिका आजपासून

**पर्थ, २१ नोव्हेंबर**

मायभूमीवर झालेल्या पराभवाच्या धक्क्यातून सावरत भारतीय क्रिकेट संघ शुक्रवारपासून येथे यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत प्रतिस्पर्धी संघाला तोंड देण्यास सज्ज झाला आहे.

भारताच्या फॉर्ममध्ये नसलेल्या फलंदाजी विभागाला ऑस्ट्रेलीयाचा सामना तितक्याच सावधगिरीने खेळावे लागणार आहे. एकंदरीतच ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत खेळताना भारतीय संघावर प्रचंड दबाव असेल.

भारताने २०१८-१९ आणि २०२०-२१ मध्ये आम्ही लागोपाठ दोन वेळा बॉर्डर-गावस्कर चषक जिंकू शकतो, हे दाखवून दिले, परंतु अलिकडे ज्या पद्धतीने न्यूझीलंडने भारत भूमीवर भारतीय संघाचा पराभव केला, त्यामुळे निश्चितच भारतीय संघाच्या जागतिक दर्जाच्या मानसिकतेला धक्का बसला आहे. त्यामुळे या मालिकेत पॅट कमिन्स आणि त्याच्या चमूचा भारतीय संघ कसा सामना करतो, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

सध्या भारतीय संघाला विक्रमी तिसऱ्यांदा जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करणे दूरच्या स्वप्नासारखे दिसत आहे. इतर संघांवर विसंबून राहू नये म्हणून आता भारतीय संघाला पाच सामन्यांची ही कसोटी मालिका ४-० ने जिंकण्याची नितांत गरज झाली आहे.



बॉर्डर-गावस्कर चषकासह पॅट कमिन्स व जसप्रित बुमराह

नियमित कर्णधा रोहित शर्मा, वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, शुभमन गिलच्या अनुपस्थितीत भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाचा सामना करावा लागणार आहे. रोहित पितृत्वाच्या रजेवर आहे, शमी शंभर टक्के तंदुरुस्त होत आहे, तर गिल दुखातपतग्रस्त झाला आहे. रोहित ॲडलेडमधील दुसऱ्या कसोटीपूर्वी पोहोचेल.

पाच सामन्यांची कसोटी मालिका ही कर्णधार जसप्रीत बुमराहसह गोलंदाजांनी ठरवलेली मालिका असेल. बुमराहवर प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजांना रोखण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मोहम्मद सिराज व आकाश दीप हे बुमराहचे भागीदार असण्याची शक्यता आहे.

याचदरम्यान प्रसिध कृष्णा व हर्षित राणासुद्धा प्रभावी कौशल्य दाखवण्यास उत्सुक आहे, परंतु ऑस्ट्रेलियन फलंदाजांना कमी लेखणे महागात पडू शकते. सध्या स्टीव्ह स्मिथची डब्ल्यूटीसी सायकलमध्ये (२०२३-२५) सरासरी केवळ ३६ आहे, तर १०० हून अधिक कसोटींमध्ये त्याची कारकीर्दीची सरासरी ५६ पेक्षा अधिक आहे. मार्नस लॅबुशेनची कारकीर्दीची सरासरी सुमारे ५० आहे, परंतु गत दोन वर्षांत ती ३० पेक्षा अधिक झाली आहे. ट्रॅव्हिस हेडची सरासरी २८ प्लसने कमी आहे. उस्मान ख्वाजा आपल्या कारकिर्दीच्या अखेरीस सातत्य दाखवित आहे. यष्टिरक्षक ॲलेक्स कॅरी व कर्णधार पॅट कमिन्स आपले कौशल्य दाखवण्यास उत्सुक आहे.

भारताच्या पहिल्या सहा फलंदाजांपैकी तीन फलंदाज ऑस्ट्रेलियात कधीही खेळलेले नाही व त्यापैकी दोघांना चार सामन्यांचा एकत्रित कसोटी अनुभव आहे. मात्र यशस्वी जयस्वाल, देवदत्त पडिक्कल व ध्रुव जुरेल हे प्रतिभावान असून ते निश्चितच आत्मविश्वासपूर्वक उत्तम कामगिरी करतील अशी अपेक्षा आहे. ऋषभ पंत, केएल राहुल एकजुटीने खेळले, तर भारतीय संघाची ताकद वाढेल. (वृत्तसंस्था)

**भारत-ऑस्ट्रेलिया पहिला कसोटी सामना**

**स्थळ :** पर्थ स्टेडियम, पर्थ
**वेळ :** सकाळी ७.२० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

### कर्णधारपदाकडे जबाबदारी म्हणून पाहतो : बुमराह

जसप्रीत बुमराहला नेहमीच जबाबदारी आवडते व खडतर काम करणे आवडते, त्यामुळेच तो बहुप्रतीक्षित बॉर्ड-गावस्कर चषक कसोटी मालिकेतील सलामीच्या सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारतीय संघाचे नेतृत्व करण्याची आशा बाळगत आहे. २०२२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या एजबॅस्टन कसोटीनंतर रोहित शर्माच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व करण्याची ही दुसरी वेळ आहे. ३० वर्षीय बुमराह आपल्या पद्धतीने मालिकेत दमदार कामगिरी करण्यास उत्सुक असेल.

मी कर्णधारपदाकडे पद म्हणून पाहत नाही, परंतु मला नेहमीच जबाबदारी आवडते. त्या पदाकडे जबाबदारी म्हणून बघण्यास आवडेल. मला लहानपणापासूनच कठीण काम करायचे होते. आता कठीण परिस्थितीत काम करण्याची वेळ आली आहे, हे माझ्यासाठी एक नवीन आव्हान आहे, असे बुमराह पहिल्या कसोटीपूर्वी पत्रकार परिषदेत म्हणाला. बुमराह केवळ एका कसोटी सामन्यासाठी कर्णधार आहे आणि त्याला भविष्यात नेतृत्वाची भूमिका करावी लागेल, ही शक्यताही नाकारता येणार नाही.

विराट आणि रोहित खूप यशस्वी झाले आहेत व त्यांचे परिणामही मिळाले आहेत, पण माझा मार्ग वेगळा आहे. मी कधीही कॉपीबुक योजनेचे पालन केले नाही. मी माझ्या प्रवृत्तीनुसार खेळतो. मी नेहमीच माझे क्रिकेट खेळलो असन मला माझ्या धैर्यावर व प्रवृत्तीवर खूप विश्वास आहे, असे बुमराह म्हणाला.

# फिरकीपटू कुलदीपच्या पाठीवर जर्मनीमध्ये शस्त्रक्रिया



**नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर**

भारताचा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवच्या पाठीवर जर्मनीमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. पाठीच्या दुखापतीने तो त्रस्त होता. चायनामन गोलंदाजाने समाजमाध्यमात एक छायाचित्र पोस्ट केले. या छायाचित्रात तो रुग्णालयामध्ये असल्याचे दिसत आहे. कुलदीपने या पोस्टवर लिहिले- 'बरे होण्यासाठी म्युनिकमध्ये काही दिवस.'

२९ वर्षीय कुलदीपला काही दिवसांपूर्वी दिल्ली कॅपिटल्स संघात कायम ठेवण्यात आले होते. दिल्लीने त्याला १.२५ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवले आहे. कुलदीपने शेवटची कसोटी न्यूझीलंडविरुद्ध बंगळुरू येथे खेळली होती, त्यानंतर दुखापतीमुळे त्याची ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड झाली नाही.

२२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर चषकासाठी संघ सोडताना बीसीसीआयच्या निवडकर्त्यांनी कुलदीपच्या दुखापतीचा उल्लेख केला होता. बंगळुरू कसोटीनंतर त्याला नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पाठवण्यात आले, जिथे वैद्यकीय तज्ज्ञांनी त्याला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला.

**फेब्रुवारीमध्ये पुनरागमनाची शक्यता**

कुलदीप यादव फेब्रुवारी महिन्यापर्यंत मैदानात परतू शकतो. संघाला या महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सहभागी व्हायचे आहे. या वन-डे स्पर्धेच्या दृष्टिकोनातून कुलदीपचे पुनरागमन संघासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. तसे झाले नाही, तर भारतीय संघासाठी हा धक्काच ठरेल. (वृत्तसंस्था)

### विश्व बुद्धिबळ स्पर्धेपूर्वी गुकेशला अर्जुनचा सल्ला

**नवी दिल्ली :** आगामी २५ नोव्हेंबरपासून सिंगापूर येथे जागतिक बुद्धिबळ विजेतेपदासाठी भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश आणि विद्यमान विश्वविजेता चीनच्या डिंग लिरेन यांच्यादरम्यान लढत होणार आहे. या लढतीपूर्वी भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगायसीने गुकेशला सल्ला दिला आहे. डिंग लिरेनच्या अलीकडच्या सुस्त कामगिरीमुळे तू स्वतःला विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानू नको. जर मी गुकेश असतो तर मला असे वाटले नसते. मी केवळ माझ्या तयारीवर व सर्व गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करेन. मला खात्री आहे की, गुकेशसुद्धा तेच करत आहे, असे अर्जुन म्हणाला. अर्जुनने या वर्षी सप्टेंबरमध्ये २७९९ पीक रेटिंग मिळवले आणि तो इतिहासातील १५ वा-सर्वोच्च रेट करणारा खेळाडू झाला. गुकेश व लिरेन या दोघांचीही ताकद आणि कमकुवतता सारखीच आहे, पण गुकेश जिंकेल असे मला वाटते, असे अर्जुन म्हणाला. गुकेशने नुकतेच प्रशंसनीय मानसिक कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अप्टन यांच्याकडे घेतले.

### केएल राहुलमध्ये ऑस्ट्रेलियात यशस्वी होण्याची क्षमता : गावस्कर

**नवी दिल्ली :** केएल राहुलमध्ये ऑस्ट्रेलियात ऑस्ट्रेलियाविरुद्ध दमदार कामगिरी करण्याची भरपूर क्षमता आहे. आता त्याला केवळ नवशिबाची साथ मिळायला हवी, असे मत महान भारतीय फलंदाज सुनील गावस्करने व्यक्त केले. केएल राहुल हा वरिष्ठ भारतीय फलंदाजांपैकी एक आहे. अलीकडच्या अपयशाचे ओझे राहुलवर जास्त असू शकते व त्यामुळे आगामी बॉर्डर-गावस्कर चषकात भारताच्या फलंदाजासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी सर्वोपरि आहे. शैलीदार फलंदाज के. एल. राहुल गत वर्षी दक्षिण आफ्रिकेप्रमाणेच ऑस्ट्रेलियन खेळपट्टीवर उत्कृष्ट कामगिरी करू शकतो, असा विश्वास गावस्करने व्यक्त केला. रोहित शर्मा पितृत्त्व रजेवर असल्यामुळे शुक्रवारपासून पर्थ येथे सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यात यशस्वी जयस्वालसोबत भागीदारी करण्यासाठी राखीव सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन् व अनुभवी राहुल यांच्यापैकी एक भारताला पर्याय आहे. आतापर्यंत, संघ राहुलसाठी उत्सुक असून त्याने कसोटी सामन्यांमध्ये भारतासाठी चांगली सलामी दिली आणि गत वर्षी सेंच्युरियनमध्ये संस्मरणीय शतक झळकावले.

# रोहित शर्मा रविवारी पर्थमध्ये भारतीय संघात सहभागी होणार

**पर्थ, २१ नोव्हेंबर**

कर्णधार रोहित शर्मा ऑप्टस स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी रविवारी भारतीय संघात सहभागी होणार आहे.



रोहित पहिल्या कसोटीसाठी अनुपलब्ध असून तो आपल्या दुसऱ्या मुलाच्या जन्मासाठी आपल्या कुटुंबासह भारतात परतला होता. रोहित व त्याची पत्नी रीतिका यांना १५ नोव्हेंबर रोजी मुलगा झाला.

त्याच्या जागी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पर्थ येथे बॉर्डर-गावस्कर चषकातील पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे.

रोहित कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी पर्थला पोहोचेल, अशी पुष्टी बीसीसीआयच्या सूत्राने केली. त्यामुळे ६ डिसेंबरपासून ॲडलेड येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी ३७ वर्षीय खेळाडू उपलब्ध असेल. रोहित ऑस्ट्रेलियातील संघाच्या संपर्कात आहे आणि मी रोहितशी आधी बोललो. पण येथे आल्यानंतर मला संघाचे नेतृत्व करण्याबाबत थोडी स्पष्टता आली, असे बुमराहने गुरुवारी पत्रकार परिषदेत सांगितले. (वृत्तसंस्था)

# वेदांत दिघडेचे शतक, विदर्भ सर्वबाद ३६३

**कूचबिहार करंडक क्रिकेट**

**मध्यप्रदेश ४ बाद १२५**



**नागपूर, २१ नोव्हेंबर**

पहिल्या दिवशीच्या ५ गडी बाद २०६ धावांवरून दुसऱ्या दिवशीचा खेळ सुरू करीत विदर्भने वेदांत दिघडेच्या ११३ धावांच्या मदतीने ३६३ धावांचा डोंगर रचला. वेदांतने १३ चौकार व ३ षटकार खेचले. ८७ धावांवर खेळत असताना सरदानाच्या गोलंदाजीत कुमार आर्यने श्री चौधरीचा झेल घेतला. संस्कार चव्हाटे २९ धावा, सार्थक ४ धावांवर नाबाद राहिले. तुषार सूर्यवंशी याने ४० धावा काढल्या.

१९ वर्षांखालील मुलांच्या कुचबिहार करंडक क्रिकेट स्पर्धेतील तिसरा साखळी सामना बलाढ्य मध्यप्रदेशविरुद्ध कळमना येथील व्हीसीए मैदानावर सुरू आहे. मध्यप्रदेश संघाने पहिल्या डावात ४ बाद १२५ धावा काढू केल्या. सोहम पटवर्धनने १५, यशवर्धन ३७, अंश बागडियाने १ धाव काढली. रुद्रसिंग ११ धावांवर व मनल चव्हाण २५ धावांवर खेळत आहे. मध्यप्रदेश संघाने ४ गडी बाद १२५ धावा केल्या. संस्कार, देवांश व यश यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. (तभा वृत्तसेवा)

# स्वरा करंडे विदर्भ क्रिकेट चमूत

**वणी, २१ नोव्हेंबर**

गेल्या ५५ वर्षांपासून क्रिकेट खेळाडूंना उत्कृष्ट प्रशिक्षण देऊन क्रिकेट क्षेत्रात विविध संधी उपलब्ध करून देणाऱ्या येथील इलेव्हन स्टार क्रिकेट संघाची महिला खेळाडू स्वरा मंगेश करंडे हिची अंडर १५ विदर्भ महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. तिने वणीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

ही क्रिकेट स्पर्धा बीसीसीआय द्वारा आयोजित केली जात असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू घडविण्यासाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

बालपणापासून क्रिकेटचे वेड असणाऱ्या स्वराला घरातच क्रिकेटचे नैसर्गिक वातावरण मिळाले. स्थानिक क्रिकेटमध्ये अष्टपैलू खेळाडू म्हणून सर्वांना परिचित तिचे काका मंगेश करंडे यांनी इलेव्हन स्टारचे कर्णधार म्हणून अनेक वर्षे यशस्वी जबाबदारी सांभाळली आहे. इलेव्हन स्टारचा सराव तालुका क्रीडा संकुल मैदानावर नियमित शिस्तीत होत असून विदर्भ महिला संघात निवड होणारी स्वरा ही चवथी महिला खेळाडू आहे. स्वरा अष्टपैलू खेळाडू असून तिने आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केले आहे. एक वर्षापासून विदर्भ क्रिकेट असोसिएशन नागपूर येथे तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तिला मिळत आहे. प्रशिक्षण आणि सराव सामन्यांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केल्यामुळे स्वराची विदर्भ महिला संघात निवड झाली आहे. या स्पर्धा छत्तीसगड (रायपूर) येथे २१ ते २९ नोव्हेंबरदरम्यान होत आहेत.



स्वरा आपल्या यशाचे श्रेय इलेव्हन स्टारचे अध्यक्ष राजेंद्र मदान, सचिव नदीम शेख, सदस्य राजू डवरे, विनोद निमकर, शैलेश ढोके, सचिन देशपांडे, संतोष चिल्कावार, धवल पटेल, संतोष पिल्लेवार, बंटी ठाकूर, मुख्य प्रशिक्षक अनिरुद्ध पाथ्रडकर, सचिन पांडे, राजेंद्र खोंडे, काका मिलिंद करंडे यांना देते. (तभा वृत्तसेवा)

# लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत

**चायना मास्टर्स बॅडमिंटन**

**सिंधूचे आव्हान संपुष्टात**

**शेनझेन, २१ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या चायना मास्टर्स सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी स्टार भारतीय बडमिंटनपटू लक्ष्य सेनने सरळ गेममध्ये विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, परंतु दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूची मोहीम दुसऱ्या फेरीतच संपुष्टात आली.

पॅरिस कांस्यपदक गमावलेल्या लक्ष्यने पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीच्या ४६ मिनिटांच्या लढतीत डेन्मार्कच्या रॅस्मस गेमकेला २१-६, २१-१८ असे पराभूत करताना आपले सर्वोत्तम प्रदर्शन केले. आता



लक्ष्य सेनचा सामना जपानचा ताकुमा ओबायाशी आणि तिसरा मानांकित डेन्मार्कचा ॲण्डर ॲन्टोनसेन यांच्यातील विजेयी खेळाडूशी होईल.

परंतु, सिंधूसाठी ही आणखी एक निराशाजनक खेळी ठरली. तिला सिंगापूरच्या येओ मिन हिच्याकडून चुरशीत झालेल्या महिला एकेरी लढतीत पराभव पत्करावा लागला.

जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूने पहिल्या फेरीत बुसानन ओंगबामरुंगफानला २१-१७, २१-१९ असे पराभूत केले, मात्र तिने एक तास नऊ मिनिटे चाललेल्या या लढतीत १६-२१, २१-१७, २१-२३ अशी हार पत्करली.

अनुपमा उपाध्याय व नागपूरची मालविका बनसोड दुसऱ्या फेरीत पराभूत झाल्या. अनुपमाला जपानच्या नात्सुकी निदायराकडून ७-२१, १४-२१ असा, तर मालविकाला थायलंडच्या आठ मानांकित सुपानिडा कातेथोंगकडून ९-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

ट्रिसा जॉली व गायत्री गोपीचंद या महिला दुहेरीच्या भारतीय जोडीला दुसऱ्या फेरीच्या सामन्यात लिऊ शेंग शू आणि निंग या चीनच्या द्वितीय मानांकित जोडीकडून १६-११, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला.

पॅरिस ऑलिम्पिकनंतर विश्रांती घेतल्यानंतर गतविजेते सात्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या जोडीने पुनरागमन करताना पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत रॅस्मस कजाएर आणि फ्रेडरिक सॉग्गार्ड या डॅनिश जोडीवर २१-१९, २१-१५ असा विजय मिळवला. आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय जोडीची पुढील फेरीत दुसरी सीडेड असलेल्या किम अस्ट्रप आणि ॲंडर्स स्कारुप रासमुसेन या डॅनिश जोडीशी गाठ पडेल. (वृत्तसंस्था)

# ईडन गार्डन्स स्टेडियमच्या एका स्टॅण्डला झूलन गोस्वामीचे नाव

**बंगाल क्रिकेट संघटनेकडून महिला क्रिकेटपटूचा गौरव**

**कोलकाता, २१ नोव्हेंबर**

भारतीय महिला क्रिकेट संघाची वेगवान गोलंदाज झूलन गोस्वामी हिच्यासाठी ईडन गार्डन्स हा मोठा सन्मान असेल. लवकरच ईडन गार्डन्सच्या एका स्टॅण्डला या दिग्गज भारतीय गोलंदाजाचे नाव देण्यात यणार आहे.



झूलन गोस्वामी ही भारतीय संघातील सर्वात प्रभावान क्रिकेटपटूंपैकी एक आहे. एकेकाळी भारतीय महिला संघाचे नेतृत्व करणाऱ्या या क्रिकेटपटूच्या नावावर अनेक विक्रम असून ते तिच्या निवृत्तीनंतरही अबाधित आहेत. या खेळातील तिच्या वारशाचे स्मरण करण्यासाठी ईडन गार्डन्सवर लवकरच भारतीय महिला क्रिकेट संघाच्या प्रतिष्ठित वेगवान गोलंदाजाच्या नावावर एक स्टॅण्ड असणार आहे. ईडन गार्डनवरील एका स्टॅण्डला 'झूलन गोस्वामी स्टॅण्ड' असे नाव देण्यात येणार आहे. लवकरच कोलकाता स्टेडियमवर तिच्या नावाचा स्टॅण्ड असेल, असे बंगाल क्रिकेट असोसिएशनने अधिकृतपणे घोषित केले आहे.

महिला वन-डे क्रिकेटमध्ये २५५ बळी आणि २०१८ मध्ये ३०० आंतरराष्ट्रीय बळींचा विक्रम तिच्या नावावर आहे. भारतीय संघासाठी तिने १२ कसोटी, २०४ वन-डे व ६८ टी-२० सामने खेळले आहेत. महिलांच्या वन-डे सामन्यांमध्ये २०० हून अधिक बळी टिपणारी ती एकमेव गोलंदाज आहे. तिच्या निवृत्तीनंतरही, झूलनचा उत्कृष्ट विक्रम अजूनही तिच्या नावार अबाधित आहे. ४१ वर्षीय क्रिकेटपटू झूलन गोस्वामी सध्या मुंबई इंडियन्ससाठी मार्गदर्शक व गोलंदाजी प्रशिक्षक आहे. तिच्या मार्गदर्शनाखाली मुंबई इंडियन्सने पहिल्या महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद जिंकले. ती बंगालच्या वरिष्ठ महिला संघाची मार्गदर्शक सुद्धा आहे. अलीकडेच महिला कॅरिबियन प्रीमियर फ्रॅन्चायझी त्रिनबागो नाइट रायडर्समध्ये संघाची मार्गदर्शक म्हणून सहभागी झाली आहे.

ईडन गार्डन्स स्टेडियममधील ब्लॉक बी गॅलरीला भारतीय संघाची माजी कर्णधार झूलन गोस्वामी हिचे नाव देण्यात येईल. भारतीय क्रिकेट संघ २२ जानेवारी २०२५ रोजी ईडन गार्डन्सवर इंग्लंड विरुद्ध टी-२० सामना खेळेल, त्यावेळी या स्टॅण्डचे अनावरण केले जाईल, असे अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया अमेरिकेविरुद्ध १-० ने आघाडीवर

**डेव्हिस चषक टेनिस**

**मालागा, २१ नोव्हेंबर**

येथे सुरू असलेल्या डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रेलियाने अमेरिकाविरुद्ध १-० अशी आघाडी मिळवली.

गुरुवारी दक्षिण स्पेनमधील पॅलासिओ डी डेपोर्टेस जोस मारिया मार्टिना कार्पेना येथील इनडोअर हार्ड कोर्टवर टायब्रेकरपर्यंत रंगलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात ७७ व्या क्रमांकावर असलेल्या थानासी कोक्वीनाकिसने चार मॅच पॉइंट वाचवून व अखेरीस सातव्या गुणात रुपांतर करून २१ व्या क्रमांकावर असलेल्या बेन शेल्टनचा ६-१, ४-६, ७-६ (१४) असा पराभव केला आणि आपल्या ऑस्ट्रेलिया संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.



विजयाचा आनंद साजरा करताना थानासी कोक्वीनाकिस

दुसरा एकेरी अमेरिकन ओपनचा उपविजेता टेलर फ्रिट्झचा ऑस्ट्रेलियाच्या ९व्या क्रमांकाच्या ॲलेक्स मिनौरविरुद्ध होणार होता. जर फ्रिट्झने तो जिंकला तर, सामना दुहेरीने ठरवला जाईल. अमेरिकेच्या ऑस्टिन क्रॅजिसेक व राजीव राम यांचा दुहेरीचा सामना ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू एबडेन व जॉर्डन थॉम्पसन यांच्याशी होईल.

विजय नोंदवताच थानासी कोक्वीनाकिसने कर्णधार लेटन हेविटला मिठी मारली. माझ्या आयुष्यात मी इतके उत्कंठावर्धक झालो आहे की नाही हे मला माहीत नाही, पण आज मला अत्यानंद झाला, असे निक किर्गिओससह २०२२ ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरीचे विजेतेपद जिंकणाऱ्या थानासी कोक्वीनाकिसने सांगितले. अमेरिकेने आतापर्यंत विक्रमी ३२ वेळा डेव्हिस चषक जिंकले, परंतु २०१८ पासून ते उपांत्य फेरीत पोहोचलेले नाहीत. २८ वेळा विजेता असलेला ऑस्ट्रेलिया गत दोन वर्षात उपविजेता होता. शनिवारी उपांत्य फेरीत पोहोचणारा कोणताही देश गतविजेत्या इटली किंवा अर्जेंटिनाशी सामना करेल. दुसरी उपांत्य फेरीचा सामना शुक्रवारी जर्मनी व नेदरलॅण्ड यांच्यादरम्यान होणार आहे (वृत्तसंस्था)

# लॉस एंजेलिस ऑलिम्पिक पात्रता प्रवासाची ही सुरुवात : हरेंद्र सिंह

**राजगीर, २१ नोव्हेंबर**

नवीन लूक असलेल्या व अधिक तंदुरुस्त असलेल्या भारतीय महिला हॉकी संघाने ज्या पद्धतीने अपराजित राहून आशियाई चॅम्पियन्स चषक स्पर्धेचे विजेतेपद कायम राखले, ते बघता भारतीय संघाने ही २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकच्या पात्रता प्रवासाची अत्यंत दमदार सुरुवात केली, असे मनोगत भारतीय महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक हरेंद्र सिंह यांनी व्यक्त केली.

या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवण्यात अपयशी ठरलेल्या संघाचे पुनरुत्थान झाले. संघ व त्याचे अनुभवी प्रशिक्षक हरेंद्र सिंह यांच्यासाठी ही एक नवीन सुरुवात आहे.

एप्रिलमध्ये पदभार स्वीकारल्यापासून, २०२८ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी पात्र होण्यासाठी हरेंद्र सिंह यांची दृष्टी स्पष्ट आहे.

२०२६ विश्वचषक व २०२८ ऑलिम्पिकच्या दिशेने संघाच्या यशस्वी आशियाई चॅम्पियन्स चषक मोहीम ही योग्य सुरुवात असेल यावर त्यांचा नेहमी विश्वास होता व त्यावर हरेंद्र सिंह यांनी भर दिला.



विजयाचा आनंद साजरा करताना प्रशिक्षक हरेंद्र सिंह व भारतीय महिला हॉकीपटू

हा विजय अधिक तरुण मुलींना हॉकी खेळण्यासाठी व देशातील हॉकी खेळाला आणखी उंच करण्यासाठी प्रेरणा देईल. आमच्या या विजयामुळे चाहत्यांना आनंद झाला आहे, असे कर्णधार सलीमा टेटे म्हणाली.

आम्ही संघाची तंदुरुस्ती व धैर्य सुधारण्यावर काम केले, याचा या स्पर्धेतील भारतीय खेळाडूंची कामगिरी या गोष्टीचा पुरावा आहे. आम्ही मुख्य क्षेत्रांवर जबरदस्त काम केले व प्रशिक्षकांच्या सूचनेचे पालन केले, असेही ती म्हणाली.

भारतीय खेळाडूंनी खेळाच्या बहुतांश विभागात प्रभावी कामगिरी केली आणि उपांत्य आणि अंतिम फेरीसह सात सामन्यांमध्ये ते अपराजित राहिले. भारतीय संघाच्या कामगिरीचे वैशिष्ट्य म्हणजे भारताने सात सामन्यांत केवळ दोन गोल स्वीकारले, तर स्वतः तब्बल २९ गोल केलेत. या २९ गोलांपैकी १५ गोल मैदानी प्रयत्नांतून आले व १२ पेनॉल्टी कॉर्नर आणि दोन गोल पेनॉल्टी स्ट्रोकमधून आले.

२० वर्षीय तरुण आक्रमक खेळाडू दीपिका भारताच्या विजयाची शिल्पकार ठरली असून ती प्रमुख खेळाडूंपैकी होती, जिने मैदानी खेळातून ४, पेनॉल्टी कॉर्नरमधून ६ व पेनॉल्टी स्ट्रोकवरील एका गोलसह ११ गोल केले. दीपिका या स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारी खेळाडू होती. सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत पाच भारतीय होते. दीपिकाशिवाय संगीता कुमारी (४ गोल), प्रीती दुबे (३), नवनीत कौर (३) आणि लालरमसियामी (३) यांनीही प्रभावी कामगिरी केली. भारतीय संघाचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे, कारण खेळाडू १२ जानेवारीपासून रांची येथे सुरू होणाऱ्या पहिल्या चार संघांच्या महिला हॉकी इंडिया लीगमध्ये जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंच्या खांद्याला खांदा लावून खेळणार आहे. ही स्पर्धा २६ जानेवारीपर्यंत खेळली जाणार आहे. (वृत्तसंस्था)



# कार्तिकी वारीसाठी रेल्वेचे आदर्श व्यवस्थापन

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कार्तिकी वारीसाठी पंढरपूर येथे येणाऱ्या वारकऱ्यांसाठी प्रवासाचे उत्तम नियोजन केले होते. कार्तिकी वारी पंढरपूर येथे ८ ते १६ नोव्हेंबर दरम्यान पार पडली. ज्यामध्ये लाखो भाविकांनी सहभाग घेतला. मुख्य दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबरला सर्वाधिक गर्दी झाली. या गर्दी व्यवस्थापनाच्या आव्हानाला सोलापूर रेल्वे विभागाच्या टीमने कुशलतेने सामोरे जाऊन आव्हान यशस्वीरीत्या पार पाडले.

सोलापूर विभागाच्या अधिकाऱ्यांसह ५० वाणिज्य कर्मचारी, ६० आरपीएफ व जीआरपी कर्मचारी, १० वैद्यकीय कर्मचारी आणि इतर विभागातील कर्मचाऱ्यांनी मिळून हे आयोजन शून्य अपघात आणि कोणत्याही अनुचित घटनेशिवाय यशस्वीरित्या पूर्ण केले.

संगठनबद्ध रणनीती आणि अंमलबजावणी करणाऱ्या सोलापूर रेल्वे विभागाच्या सर्व विभागांपैकी वाणिज्य विभागाने कार्तिकी वारीच्या नियोजनासाठी विशेष मेहनत घेतली. ज्यामध्ये सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील हे कार्तिकी एकादशीच्या काळात पंढरपूर येथे तळ ठोकून कोणत्याही रेल्वे प्रवासी वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली.

### स्वच्छतेसाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त

शौचालयांच्या सुविधा विस्तारित करण्यात आल्या.त्यामध्ये प्रामुख्याने प्लॅटफॉर्म क्रमांक १ येथे १० शौचालये (त्यापैकी २ दिव्यांगांसाठी), सामान्य बुकिंग हॉल येथे ८ शौचालये,सर्क्युलेटिंग एरिया मध्ये २० मोबाइल शौचालय, सुलभ शौचालय येथे ६० शौचालय आणि १८ स्नानगृहे उपलब्ध करण्यात आली होती.

### नियोजनातील ठळक बाबी

● पंढरपूरसाठी विशेष आणि नियमित अश्या गाड्यांच्या १५५ फेऱ्यांचे नियोजन. ● वारीच्या काळात पंढरपूर रेल्वे स्थानकांवर होणाऱ्या गर्दी वर लक्ष ठेवण्यासाठी २० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह विशेष नियंत्रण कक्षाची स्थापना. ● वारीच्या काळात १,०९,२१० प्रवाशांना सुरक्षित सेवा दिली आणि या आयोजनातून ४९ लाख रुपयांचा महसूल. ● भाविकांना आरामदायक आसरा देण्यासाठी २ वॉटरप्रूफ शेल्टर ( मंडप). ● तिकिट विक्री सुलभ करण्यासाठी ७ साधारण तिकीट खिडक्या, १ आरक्षण तिकीट खिडकी (२ शिफ्टमध्ये) आणि ४ एटीव्हीएम. ● प्रवाशांना मार्गदर्शनासाठी '' मे आय हेल्प यू '' बूथ स्थापन केले. जिथे मराठी, हिंदी, आणि इंग्रजी अशा ३ भाषांमध्ये मदत. ● प्राथमिक उपचारांसाठी १ हेल्प डेस्क उभारले, जिथे २ डॉक्टर, २ परिचारिका, २ औषध निर्माता आणि ४ सहाय्यक कर्मचारी २४७ सेवा देत होते. ● १ रुग्णवाहिका २४७ तैनात होती. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळवली जाऊ शकत होती.

# २६ लाख मे. टन गळीताचे उद्दिष्ट

**व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे : विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २१ नोव्हेंबर-**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि.युनिट नं.१ पिंपळनेर येथील सन २०२४-२५ गळीत हंगामाचा २४ व्या.ऊस गाळप हंगामा शुभारंभ गुरूवारी सकाळी व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे यांच्या शुभहस्ते गव्हाणीत मोळी टाकून संपन्न झाला. तसेच युनिट नं.२ करकंब येथील ६ व्या ऊस गाळप हंगामाचा शुभारंभ संचालक पोपट चव्हाण यांच्या शुभहस्ते कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

या कार्यक्रमा दरम्यान संचालक लाला मोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी सुगंधाताई मोरे यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापुजा कारखाना कार्यस्थळावर पार पडली.या कार्यक्रमास सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे उपस्थित होते. यावेळी बोलताना व्हा.चेअरमन वामनराव उबाळे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही कारखान्याची यशस्वी घौडदौड वेगाने सुरू आहे. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने सन २०२३-२४ या गळीत हंगामात युनिट नं.१ कडे १८ लाख ९२ हजार ९४९ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११ टक्के साखर उता-याने १९ लाख २८ हजार ८५० क्विंटल साखर पोती उत्पादन झाले आहे.तसेच युनिट नं.२ कडे ६ लाख २५ हजार ८८८ मे.टन ऊसाचे गाळप होवून ११.१४ टक्के साखर उता-याने ६ लाख ६३ हजार ९०० क्विं.साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे.दोन्ही युनिट चे मिळून २५ लाख १८ हजार ८३७ मे.टन गाळप होवून २५ लाख ९२ हजार ७५० क्विं. साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे.



### ऊस तोडणी, पुरवठा यंत्रणा सज्ज

हंगाम २०२४-२५ मध्ये ऊस पुरवठा होण्यासाठी ऊस तोडणी वाहतूकीसाठी बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर व टायर बैलगाडीचे करार करण्यात आलेले असून प्रत्यक्ष यंत्रणा कामावर रुजू झालेली आहे.सन २०२४-२५ गाळप हंगाम यशस्वी करण्यासाठी सभासद, ऊस पुरवठादार, ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदार, अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

चालू २०२४-२५ हंगामासाठी ऑफ सिझनमधील कामे वेळेत पूर्ण होवून गाळपासाठी दोन्ही कारखाने सज्ज झालेले आहेत. युनिट नं.१ पिंपळनेर येथे २५ हजार हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे.युनिट नं.२ करकंब येथे ७ हजार ३०० हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे.या हंगामामध्ये युनिट नं.१ कडे २० लाख व युनिट नं.२ कडे ६ लाख मे.टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ठ संचालक मंडळाने निश्चित केले आहे. यावेळी संचालक रमेश येवले-पाटील,शिवाजी डोके,लक्ष्मण खुपसे,लाला मोरे, सचिन देशमुख, पांडूरंग घाडगे, पोपट चव्हाण, सुरेश बागल, प्रतापराव नलवडे,अशोक मिस्कीन,शिवाजी पाटील,राहूल पुरवत,अजित देशमुख, जोतीराम मदने, समाधान नरसाळे, हरिनाना कानगुडे, मारूती कोरके, नवनाथ पवार, गजानन पाटील, रविंद्र नरसाळे, बंडूनाना लांडे, कार्यकारी संचालक एस.एन. डिग्रजे, युनिट नं.२ चे जनरल मॅनेजर एस.आर.यादव,चिफ इंजिनिअर एस.एस.म हामुनी,चिफ केमिस्ट बी.जे.साळुंखे,शेती अधिकारी आर.जे.पाटील सर्व जिप. व पं.स. सदस्य,मार्केट कमिटी सदस्य,आजी माजी पदाधिकारी,कार्यकर्ते,सभासद शेतकरी,ऊस पुरवठादार,कारखाना अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंढरपुरात प्रतिबंधक आदेश, वाहतूक नियोजन आदेश जारी

**पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ नोव्हेंबर-**



२५२ पंढरपुर विधानसभा मतदार संघ मतमोजणी प्रक्रिया दि. २३/११/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. पासुन शासकिय गोडावुन, कराड रोड, पंचायत समिती कार्यालय समोर पंढरपुर येथे सुरू होणार आहे. याबाबतचे आदेश सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन लंगोटे यांनी जारी केली असून, नागरिकांनी तसेच वाहनधारकांनी निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केले आहे.

या अनुषंगाने पंढरपुर शहरात भारत निवडणुक आयोग यांचेकडील सुचनांनुसार मतमोजणी ठिकाणच्या भोवतालीचा परिसर (झशवर्शीीळरप नेपश) केवळ पादचारी परिसर घोषीत करणे आवश्यक असल्याने, मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पंढरपुर यांनी १. मतमोजणीच्या ठिकाणाच्या समोरील कराड रोड वर नवीन कराड नाका ते एसडीपीओ कॉर्नर, २. मतमोजणी ठिकाणच्या मागील बाजूस मार्केट यार्ड गेट समोरील रस्त्यावर साबळे ॲटोमोबाइल्स ते शिवशंकर बेंद्रेकर एसटी डी रस्ता ते भीमरत्न वार्ताफलक कसबेसदन पर्यंतचा पादचारी साठी घोषीत करण्यात आलेला आहे. तसेच उपविभागीय दंडाधिकारी पंढरपुर विभाग पंढरपुर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे क. १६३ नुसार शासकीय धान्य गोदाम पंढरपुर येथील परिसरात तसेच गोदाम भोवतीच्या सर्व रस्त्यांवर निवडणुक कामा व्यतिरीक्त अनावश्यकपणे या परिसरा मध्ये वादय वाजवणे, गोंगाट निर्माण करणे, घोषणा बाजी करणे, गर्दि अथवा जमाव करून कामकाजात अडथळा निर्माण करणे, शासकीय अधिकारी कर्मचारी यांचे कामकाजात अडथळा निर्माण करणे अथवा कामकाजापासुन परावृत्त करणे यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.



### पोलिंग एजंटांनी वेळेत उपस्थित रहावे

शनिवारी मतमोजणी करीता उपस्थित राहणारे पोलींग एजंट हे वेळेवर ओळखपत्र घेवुन शासकीय गोडावुन येथे उपस्थीत राहतील. तसेच निकाल ऐकण्याकरीता येणारे राजकीय पक्ष, अपक्ष नेतेमंडळी, कार्यकर्ते यांनी उपरोक्त तालुका दंडाधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपुर यांनी लागु केलेल्या आदेशाचे अवलोकन करून आपआपली वाहने मार्केटयार्डच्या आतील बाजुस व श्रेयस पॅलेस, कराड रोड शेजारील गौतम विदयालयाच्या जागेमध्ये रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेवून पार्क करावीत व कोठेही रस्त्यावर उभे न राहता रेल्वे ग्राउंडच्या आत उभे राहुन निकाल ऐकण्यास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केले आहे.

### चोख बंदोबस्त

केंद्रीय सुरक्षा बल, एस आर पी एफ याशिवाय सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यात आले आहेत.

# सामूहिक आमरण उपोषणाच्या तयारीला लागा

**मनोज जरांगे यांचे मराठा समाजाला आवाहन; सरकार स्थापन झाले की तारीख घोषित करणार**

**तभा वृत्तसेवा,**
**जालना, दि. २१ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणूक संपल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला आरक्षणासाठी मैदानात उतरण्याचे आवाहन केले आहे. विधानसभा निवडणूक कालच संपली. आता हा मुद्दा आमच्यासाठी संपला आहे. मराठा समाजाने आता आपल्या सामूहिक आमरण उपोषणाच्या तयारीला लागावे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी आपल्या समाजाला निवडणूक डोक्यातून काढून टाकण्याचाही सल्ला दिला.



महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी एका टप्प्यात निवडणूक झाली. आता शनिवारी मतमोजणी होऊन राज्यात कुणाचे सरकार येणार? हे स्पष्ट होणार आहे. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला आरक्षणासाठी मैदानात उतरण्याचे आवाहन केले आहे. मनोज जरांगे गुरुवारी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात पत्रकाराने त्यांना विधानसभा निवडणुकीच्या निकालाविषयी अंदाज व्यक्त करण्याची विनंती केली. त्यावर ते म्हणाले, आम्ही निवडणुकीच्या मैदानात नाही. माझा समाजही नाही. त्यामुळे मी कसा अंदाज सांगू शकतो? आम्ही मैदानात असतो तर हा अंदाज सांगता आला असता. शेवटी या राज्यात मराठा समाजाच्या मतांशिवाय कोणताही उमेदवार निवडून येऊ शकत नाही हे अंतिम सत्य आहे. त्यामुळे आता येथून पुढची जबाबदारी मराठ्यांची आहे. आता आमच्यासाठी निवडणूक व प्रचाराचा मुद्दा संपला आहे. आता त्याला पुन्हा पुन्हा गिरवण्यात मजा नाही. मराठ्यांनी आता आपल्या डोक्यातून राजकारणाचा विषय काढून टाकला आहे. पुढे होईल ते होईल. पण आता आमच्या डोक्यात आमच्या आयुष्याचा, भविष्याचा व लेकराबाळांचा विषय आहे. मतदान संपल्यानंतर आता पुन्हा एकदा आमच्या आरक्षणाची लढाई सुरू झाली आहे.

आम्ही आरक्षणासाठी सामूहिक आमरण उपोषणाची घोषणा केली आहे. त्याची तयारी करायची आहे. सर्वांनी आपापल्या शेतातील कामे उरकून इकडे आंतरवाली सराटीत यावे. सरकार स्थापन झाले की या उपोषणाची तारीख घोषित केली जाईल, असे मनोज जरांगे म्हणाले. मनोज जरांगे यांनी २ दिवसांपूर्वी प्रसार माध्यमाशी बोलताना राज्यात सरकार स्थापन झाल्यानंतर ८ दिवसांनी आंतरवाली सराटीत सामूहिक उपोषण सुरू करणार असल्याचे सांगितले होते. विधानसभा निवडणुकीत सत्ता कुणाचीही आली तरी आरक्षणासाठी मला लढा द्यावाच लागेल. नवे मंत्री झालेल्यांना ८ दिवस आनंद घेऊ देणार. त्यानंतर उपोषणाची तारीख जाहीर करणार. आंतरवाली सराटीमध्ये जिकडे जागा मिळेल तिकडे उपोषण करण्यात येईल. जागा नसेल तर प्रसंगी आंदोलक रस्त्यावर बसतील. एका उपोषणकर्त्याची तब्येत बिघडली तर दोन डॉक्टरची गरज असते, जर १ लाख उपोषणकर्त्यांची तब्येत बिघडली तर? इतक्या मोठ्या प्रमाणावर डॉक्टर आहेत काय? कोण कुठे उपोषणाला बसणार हेही प्रशासनाला कळणार नाही, असे जरांगे यांनी सांगितले होते.

# मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक व स्थायी देखरेख पथकाची कार्यवाही सुरू राहणार

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सुचनेनसार मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक व देखरेख पथकाकडून कार्यवाही सुरू ठेवण्यात यावी ,असे आचार संहिता कक्ष प्रमुख सार्वत्रिक निवडणूक २०२४ तथा अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर मनिषा कुंभार यांनी आदेशित केले आहे.

# जुळे सोलापूरातील पाखर संकुल बालगृहात बालदिन सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

भारत देशाचे पाहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिवस ''बालदिन'' म्हणून पाखर संकुल बालगृह, जुळे सोलापूर येथे बालदिन सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

लहान बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी, सर्वगुण संपन्न होण्यासाठी, बालके किशोरवयीन वयात रमण्यासाठी बालदिन सप्ताहात विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. या सप्ताहात मुलांना वृक्षांचे महत्व सांगण्यात आले. निसर्गातील विविध झाडे व झाडांची लागवड, त्यांचे संजीवांशी असणारे नाते हे त्यांना उपक्रमातून दाखविण्यात आले. पेपर कप तयार करून त्यांचा मनोरा करून तो चेंडूने नेम धरून पाडणे हाही मनोरंजनात्मक उपक्रम घेण्यात आला. लिंबू चमचा धावणे स्पर्धा, बेडूक उडी, असे विविध मनोरंजनात्मक उपक्रमाने मुले खेळली, बागडली. मुलांच्या शारिरीक विकासासाठी मैदानी खेळ घेण्यात आले. योगासने, विविध गीतांचा उपक्रमही घेण्यात आला.

संस्थेतील बालकांची दंत तपासणी ही करण्यात आली. आरोग्याचे महत्व त्यांच्या बालमनावर बिंबवले गेले. चित्र काढणे व ते रंगविणे या उपक्रमात तर मुले पूर्णपणे गुंतून गेली. निसर्गाचा आनंद या लहान मुलांना लुटता यावा, निसर्गाचे देखणे रूप त्यांनी आपल्या डोळ्यात साठवावे यासाठी मुलांची एक दिवसीय सहल नळदुर्ग किल्ला येथे काढण्यात आली. अशा रमणीय स्थळी फिरताना, बागडताना या लहान मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

याचे नियोजन बालगृहाच्या अधिक्षिका निकिता एकबोटे यांनी केले. पाखर संकुलचे सचिव विक्रम कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. पाखर संकुलच्या संस्थापिका शुभांगी बुवा यांनी बालदिन सप्ताहास शुभेच्छा दिल्या.

## निधन वृत्त...

### श्रीनिवास सुरवसे

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



जुळे सोलापूर बॉम्बे पार्क येथील श्रीनिवास (भैय्या) रामचंद्र सुरवसे (वय ५१) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, आई, एक मलुगा, एक मुलगी, २ बहिणी असा परिवार आहे. अक्कलकोट नगरपालिका शाळेतील निवृत्त शिक्षिका कुसुम रामचंद्र सुरवसे यांचा तो मुलगा आहे.

### हिराबाई जाधव

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



डोणगाव रोडवरील सेटलमेंट फ्री कॉलनीतील हिराबाई रामलाल जाधव (वय ८२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे ४ मुले, १ मुलगी, जावई, सूना व नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर टकारी समाजाचे अध्यक्ष तसेच निवृत्त गटविकास अधिकारी मंगळवेढेचे राजेंद्र रामलाल जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

### अंबादास शिंदे

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



विजापूर रोडवरील आरटीओ ऑफिसजवळील सिटीझन पार्क येथील अंबादास नारायण शिंदे (वय ७२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे २ मुले, ३ मुली, सूना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. विजापूर रोड येथील साक्षेप ज्येष्ठ नागरिक संघाचे ते सचिव होते.

### महादेवी येळीकर

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



येथील महादेवी रामलिंग येळीकर ( वय ९०) यांचे गुरुवारी वृद्धापकाळाने निधन झाले. सिद्धेश्वर देवस्थानचे विश्वस्त राजशेखर येळीकर यांच्या त्या मातोश्री तर स्वातंत्र्य सैनिक रामलिंग येळीकर यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्यावर रूपाभवानी जवळील रुद्रभूमी मध्ये अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे मुले, मुली, नातवंडे व पणतू असा परिवार आहे.

# शहीद अशोक कामटे संघटनेतर्फे रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२१ नोव्हेंबर-**



सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने मंगळवार दि.२६ नोव्हेंबर रोजी शहीद दिन, संघटनेचा १५ वा वर्धापन दिन तसेच ७५ व्या संविधान दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव प्रा. प्रसाद खडतरे यांनी दिली.

स्टेशन रोड येथे विटा बँकेसमोर मंगळवारी सकाळी या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. सकाळी ९ ते ६ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान, वीर माता, पिता व माजी सैनिक यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर दु.४ वा. भव्य किल्ले स्पर्धा २०२४ बक्षीस वितरण, २६/११ तील शहिदांना आदरांजली वाहने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. नोंदणीकरिता कार्याध्यक्ष चारुदत्त खडतरे (७८८७५२२९२९) यांच्याशी संपर्क साधावा.

### विनिताताई कामटे यांचे आवाहन

वीर पत्नी विनिताताई कामटे यांनीही रक्तदानाने शहिदांना श्रद्धांजली अर्पण करावी असा संदेश दिलेला आहे, म्हणून अशा सामाजिक कार्यास आपण शहिदांना श्रद्धांजली रक्तदानाने अर्पण करावी असे आवाहन शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केले आहे.



# ऊस उत्पादक शेतकरी अर्थिकदृष्ट्या प्रबळ झाला पाहिजे

**चेअरमन संजय आवताडे : नंदूरला आवताडे शुगर अँड डिस्टीलरीजचा गाळप हंगाम शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ नोव्हेंबर-**

नंदुर येथील आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा.लि. या साखर कारखान्याचा तृतीय गळीत हंगाम २०२४-२५ प्रसंगी श्री.संत मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ मार्गदर्शक बापूंच्या हस्ते व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये मोळी पूजन, काटा पूजन व वाहन पूजन करुन हंगाम प्रारंभ करण्यात आला.

उसासारख्या नगदी प्रमाणित शेतीच्या उत्पादनाला अर्थकारणाच्या मुख्य प्रवाहात आणून ऊस उत्पादक शेतकरी अर्थिकदृष्ट्या प्रबळ झाला पाहिजे या उद्देश डोळ्यासमोर ठेवून कारखान्याचे मार्गदर्शक व आपले आ. समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पहिले दोन हंगाम यशस्वीपणे गाळप करुन तिसऱ्या हंगामासाठी सर्व तयारीनिशी कारखाना सज्ज झाला आहे.

नियोजित चालू हंगामामध्ये जास्तीत-जास्त गाळप करुन जिल्ह्यातील कारखानदारीमध्ये आवताडे शुगरचे आस्तित्व आणखी बळकट करू असा विश्वास चेअरमन साहेबांनी यावेळी व्यक्त करुन सर्वांना शुभेच्छा प्रदान केल्या.

सदरप्रसंगी आ. आवाताडे यांचा कारखाना प्रशासन, सर्व खातेप्रमुख, कर्मचारी यांच्यावतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये प्रातिनिधिक रूपात वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी कारखाना मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, माजी संचालक निकम, एच.आर. मॅनेंजर डी. बळवंतराव, डिस्टीलरीज मॅनेंजर एस. शिनगारे, फाळके, पवार, शेतकी अधिकारी नागणे, उपशेतकी अधिकारीशेख, माजी उपसरपंच सुहास पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी रवी पवार झाले रूजू

## विविध ९ विभागाची दिली जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -** सोलापूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी रवी पवार हे रुजू झाले आहेत.त्यांच्याकडे एकूण ९ विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.



महापालिकेतील तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांची बदली झाली होती. या जागी काही महिन्यानंतर शासनाने अजय चारठाणकर यांच्या नियुक्तीचे आदेश काढले होते मात्र ते रुजू झाले नाहीत.

त्यामुळे महापालिकेत शासन स्तरावरील एका रिक्त अतिरिक्त आयुक्त पदी कोण येणार? याची प्रतीक्षा लागली होती. दरम्यान, अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले (मुख्याधिकारी गट-अ) रवी पवार यांच्या नियुक्तीचे आदेश शासनाने काढले होते. त्यानुसार अखेर रवी पवार हे रुजू झाले आहेत.

पवार यांच्याकडे विविध विभागांची जबाबदारी महापालिका आयुक्तांनी सोपवली आहे.

यामध्ये १) अग्निशमन आणि आणीबाणी सेवा विभाग, २) विद्युत विभाग, ३) शिक्षण व महानगरपालिका १ ते ६ प्रशाला, ४) क्रीडा विभाग, ५) नगर सचिव कार्यालय,६) अभिलेखापाल कार्यालय, ७) सुरक्षा विभाग, ८) संगणक विभाग, ९)विभागीय कार्यालय क्र.२, ४, ७ व ८ आदी विभागांचा समावेश आहे.

# शहरात अनधिकृत होर्डींग्स, फ्लेक्स लावल्यास निष्कासन करुन गुन्हे दाखल होणार

## निवडणूक निकालाच्या अनुषंगाने करणार कार्यवाही

## महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिले आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-** मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाचे अनधिकृत होर्डींग्स, फ्लेक्स, बॅनर्स किंवा पोस्टर्स लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे व लावल्यास त्यांचे तात्काळ निष्कासन करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी सर्व विभागीय अधिकारी यांना दिले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ (अनधिकृत बॅनर्स, होर्डिंग व इतर) च्या सुनावणी



दरम्यान दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, होडींग्स, राज्यातील सर्व महानगरपालिका व पोलिस प्रशासन यांना निष्कासन, कारवाई व गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सोलापूर महानगरपालिका दि.२२ ते दि.३० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत विशेष मोहिम राबवून सर्व अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, कटआऊटस निष्कासनाची कार्यवाही संबंधित विभागीय कार्यालयामार्फत पोलिस विभागाच्या सहकार्याने करणार आहे.

याशिवाय उच्च न्यायालय मुंबई यांनी अनधिकृत फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर यांच्या निष्कासनाची कार्यवाही करताना आढळणाऱ्या अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, होडिंग्स लावणाऱ्या व्यक्ती संस्था / राजकीय पक्ष यांचीही माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र विधान सभा सार्वत्रिक निवडणूकीच्या निकालाच्या अनुषंगाने अनधिकृतपणे होर्डिंग्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी लागण्याची शक्यता गृहित धरुन उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र शासन, पोलिस प्रशासन व इतर प्राधिकरणांना दक्ष राहण्याचे निर्देश दिले आहेत. निकालानंतर कोणत्याही परिस्थितीत अनधिकृत बॅनर्स, पोस्टर्स वा होर्डिंग लागणार नाहीत यासाठी पोलिस प्रशासनासही आवश्यक सहाय्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाचे अनधिकृत होर्डींग्स, फ्लेक्स, बॅनर्स किंवा पोस्टर्स लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे व लावल्यास त्यांचे तात्काळ निष्कासन करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश सर्व विभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

### परवानगी घेऊनच फ्लेक्स, बॅनर्स लावण्याचे आवाहन

सर्व राजकीय पक्ष, कार्यकर्ते व सोलापूर शहर वासियांना सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर परवानगीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून महापालिकेच्या संकेतस्थळावरुन परवानगी प्राप्त करुनच फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स लावण्यात यावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी केले आहे.

# महापालिका सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक दोंतूल यांचा स्वेच्छानिवृत्ती अर्ज मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -** महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल यांचा स्वेच्छा निवृत्ती अर्ज महापालिका आयुक्तांनी मंजूर केला आहे. तब्बल ३६ वर्ष प्रदीर्घ सेवेनंतर ते येत्या ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत.



महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालयीन अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्याकडे स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज सादर केला होता. अखेर या अर्जास महापालिका आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. महापालिकेत दोंतूल यांनी प्रदीर्घ अशी ३६ वर्ष ७ महिने सेवा बजावली आहे. गेल्या दोन वर्षापासून त्यांच्याकडे

महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यालयीन अधीक्षकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी या विभागाची जबाबदारी नियोजनपूर्वक आणि नेटक्या पद्धतीने सांभाळली. सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत विविध प्रलंबित प्रकरणे त्यांनी मार्गी लावली. महापालिकेतील ५१ संवर्गाचे रोस्टर पुणे मागासवर्गीय कक्षा कडून मंजूर करून घेण्यात आले. अ ते ड वर्गातील १५६ कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रक्रिया यशस्वी पार पडली पाडली. महापालिकेतील विविध ३०२ पदांची मेगा भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. शासन निर्णयानुसार लाड - पागे कमिटी अंतर्गत महापालिकेत २८६ जणांना नियुक्तीसाठीची प्रक्रिया करण्यात आली. महापालिकेतील प्रलंबित इतर प्रकरणेही मार्गी लावण्यात आली. महापालिकेच्या वतीने गुणवंत अधिकारी म्हणूनही त्यांचा गौरव करण्यात आला. येत्या ३० नोव्हेंबर रोजी ते स्वेच्छा निवृत्त होत आहेत.

# निकालाआधीच राडा सुरू!

## काँग्रेसचे कार्यकर्ते झाले आक्रमक; काळा गाढव आणला, शरद कोळीचा पुतळा बसविला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -** विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या आधी सोलापूर दक्षिण मतदारसंघातून शिवसेना आणि काँग्रेस नेत्यांमधील राडा समोर आला आहे. खासदार प्रणिती शिंदेंच्या समर्थकांनी गाढवावर शरद कोळींचा पुतळा बसवला आणि निषेध केला.



दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून शिवसेना आणि काँग्रेस नेत्यांमध्ये सुरू असलेली जुगलबंदी अद्याप सुरूच आहे. शिवसेनेचे उपनेते शरद कोळी यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवारी वरून खासदार प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदेवर टीका केली होती. शेवटच्या क्षणी प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार अमर पाटील यांना पाठिंबा न देता, अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी याना पाठिंबा दिला होता. त्यामुळे शिवसेनेच्या नेत्यांनी निषेध व्यक्त करत, काँग्रेसच्या प्रणिती शिंदे व सुशीलकुमार शिंदेच्या बॅनरला जोडेमारून आंदोलन केले होते. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करत, गुरुवारी सकाळपासून शरद कोळीचा निषेध सुरू केला आहे. काँग्रेसचे कार्यकर्ते व प्रणिती शिंदेंचे कट्टर समर्थक शोएब महागामी यांनी स्वतःच्या कार्यलयासमोर काळ्या रंगाचा गाढव आणून त्यावर शरद कोळीचा पुतळा बसविला आणि शिवसेना नेत्याचा निषेध केला.

### काँग्रेस आणि शिवसेनेत जुगलबंदी...

शरद कोळी सह शिवसैनिकांनी शिवसेनेच्या कार्यालयाबाहेर खासदार प्रणिती शिंदे व सुशीलकुमार शिंदेच्या कार्यालयाबाहेर जोडेमारून निषेध व्यक्त केला. शरद कोळी यांनी प्रणिती शिंदेंची गाडी फोडण्याचा इशारा दिला. गुरुवारी सकाळी युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी शरद कोळी यांच्या कार्यालया समोर थांबून माध्यमांना प्रतिक्रिया दिली आणि शरद कोळीची गाडी फोडण्यासाठी आलोय अशी प्रतिक्रिया दिली. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारा वरून शिवसेना (उबाठा)आणि काँग्रेसमध्ये जुगलबंदी सुरू झाली आहे.

### काळ्या गाढवावरून शरद कोळीची मिरवणूक...

खासदार प्रणिती शिंदेंचे कट्टर समर्थक शोएब महागामी यांनी गुरुवारी २१ नोव्हेंबर रोजी दुपारी कार्यालयासमोर काळा गाढव आणला. माध्यमांना प्रतिक्रिया देताना,संताप व्यक्त केला. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खा.प्रणिती शिंदेंच्या निर्णयाचा समर्थन केला.शरद कोळी यांच्या सारखा काळा गाढव आणून शरद कोळी असे संबोधित केले. खासदार प्रणिती शिंदे आणि माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदेवर बोलण्याची हिम्मत कशी काय झाली, अशा शब्दांत संतप्त प्रतिक्रिया दिली.

# संगीत मानापमान चित्रपटातील 'वंदन हो' गाणं भेटीला

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-** अभिनेता सुबोध भावे यांनी दिग्दर्शित केलेला 'संगीत मानापमान' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. संगीत मानापमान ह्या चित्रपटावरूनच यात संगीताची मजेशीर मेजवानी असल्याचं लक्षात येत.आणि याचीच सुरुवात चित्रपटाच्या पहिल्या वंदन हो गाण्याने झाली असून,हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.




कट्यार काळजात घुसली नंतर पुन्हा एकदा प्रेक्षकांना संगीत विश्वातील दिग्गज संगीतकार शंकर महादेवन,गायक महेश काळे आणि राहुल देशपांडे यांचा आवाजातील तिहेरी संगम प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. हा चित्रपट १० जानेवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले. संगीत मानापमान या चित्रपटात एकूण १४ गाणी आहेत,तर ह्या गाण्यांना १७ दिग्गज गायकांनी गायले आहे.

# जयहिंद फूड बँक छोटे किल्लेदार स्पर्धेत व्हॅलेंटाईन स्कूल द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -** अन्नपूर्णा फाउंडेशन संचलित जयहिंद फूड बँकतर्फे दिवाळीनिमित्त झालेल्या किल्ले बनवण्याच्या स्पर्धेत व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलने द्वितीय क्रमांक पटकाविला.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची त्यांनी निर्माण केलेल्या किल्ल्यांची माहिती मुलांना व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत स्कूलच्या इयत्ता ७ वी व ८ वीचे विद्यार्थी चैतन्य गिडवीर, रोहित शिवगुंडे, आयुष क्षिरसागर, चैतन्य लाकडे, ईश्वर सज्जनम, साक्षी आडोळी समीक्षा मंद्रुपकर, भाविका राजगिरी, जीविका पोरे, तनुश्री आलदी यांनी पुण्यातील लाल महालाची प्रतिकृती तयार केली होते.

यांना कला शिक्षक इंद्रजीत चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. लालमहाल आजुबाजुचा परिसर मावळे सोन्याचा नांगर बाल शिवाजी जिजामाता शाहिस्तेखानाचा वध इ. दृष्ये दाखविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा आदींनी कौतुक केले

# शिवदारे महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनाला सुरुवात

## २३ नोव्हेंबरपर्यंत प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -** येथील दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ व मराठी विज्ञान परिषद सोलापूर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युनिक इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. मागील दहा वर्ष मराठी विज्ञान परिषद हा उपक्रम राबवित आहोत. विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या नव्या कल्पना, नवे प्रयोग, विविध उपक्रमासाठीचे प्रयत्न आदीसाठी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी केलेली धडपड प्रकर्षाने दिसून येते.

यावर्षी विज्ञान प्रदर्शनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सन २०२३-२४ मधील इन्स्पायर अवॉर्ड विजेता विद्यार्थी सिद्धार्थ मधुकर भंडारी यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, सरस्वती विद्या मंदिर प्रशालेचे अध्यक्ष अँड. रघुनाथ दामले, मराठी विज्ञान परीषदेचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश गंभीर, संस्थेचे विश्वस्त प्रा. भीमाशंकर शेटे, शाळेच्या शैक्षणिक सल्लागार सौ. अंजली तिवारी मॅडम, प्राचार्य आर. वाय. पाटील प्राचार्य डॉ.सुत्रावे सौ. धायगुडे मॅडम, श्रुती. गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते .

या प्रदर्शनात सोलापूर शहरातील ३५ शाळांमधील २७१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन १५० पेक्षा अधिक प्रयोगांची मांडणी केली आहे. हे प्रदर्शन दि. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते ५ व २३ नोव्हेंबर रोजी ११ ते ३ वाजेपर्यंत चालू राहणार आहे. जुळे सोलापूर परिसरातील इतर शाळेचे विद्यार्थी या प्रदर्शनास भेट देणार आहेत.

सोलापूर शहरातील इतर शाळेतील विद्यार्थी व पालकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा बाजपाई यांनी केले आहे. हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शाळेच्या समन्वयक अश्विनी बिराजदार व मानसी झळकीकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.





श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आजपासुन ॲक्शन हंगामा
श्री मुरलीचे फुल ॲक्शन मास सेंटिमेंट तेलगु चित्र
१२॥,०३॥,०६॥ वा.




भागवत उमामंदिर
एअर कुल्ड
आजपासुन ऑल टाईम हिट चित्रपटाचा हंगामा













10.00 AM 12.30 PM 03.30 PM 06.30 PM 09.30 PM
Book The Ticket At BookMyShow तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रा.अंबादास खिलारे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मुळचे सोलापूरचे व सध्या औसा येथील श्री कुमारस्वामी महाविद्यालयात ग्रंथपाल पदावर कार्यरत असलेले अंबादास वसंत खिलारे यांना नवी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठाकडून पीएच् डी. पदवी जाहीर करण्यात आली आहे.

याच विद्यापीठाचे ग्रंथपाल प्रा. डॉ. दिलीप मेस्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागातून डॉ. एस. आर. रंगनाथन् यांच्या ग्रंथालयशास्त्राच्या पाचव्या सिध्दांतानुसार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयांची झालेली वाढ आणि विकास : एक चिकित्सक अभ्यास हा शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांना प्राप्त झालेल्या या यशाबद्दल श्री विठ्ठल रूक्मिणी मंदीरे समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, संस्थेचे सचिव गिरीश पाटील, श्री शुभराय महाराज मठाच्या मठाधीश शुभांगी बुवा, प्राचार्या डॉ. कुसुम



ढोणे, प्रा. विजयकुमार मिश्रा, डॉ. बाळकृष्ण भावे, लोकसेवा हायस्कूलचे मुख्याध्यापक अनिल धोत्रे, डॉ. महादेव खराडे, डॉ. गणेश मनगिरे, डॉ. प्रसाद कदम, श्रीनिवास कुरापाटी, डॉ. शिवाजीराव पवार, सतीश डोके, प्रा. नवनाथ माळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. लोकसेवा हायस्कूलचे संस्थापक अध्यक्ष स्व. अंबादास धोत्रे यांच्या प्रेरणेने हे यश मिळाल्याचे खिलारे यांनी सांगितले.



दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# उद्या मतमोजणी; जिल्ह्यात तबब्ल ६७ टक्के मतदान

- दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्ह्याचे नवीन कारभारी ठरणार
- प्रत्येक मतदारसंघात १७ ते २१ पर्यंत मतमोजणी फेऱ्या
- जिल्हा प्रशासनाकडून मतमोजणीची जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २० नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात १८४ उमेदवारांनी विधानसभेची निवडणूक लढविली असून, या उमेवारांचे भवितव्य सीलबंद झाले आहे. तर या निवडणुकीची मतमोजणी उद्या दि. २३ नोव्हेंबर रोजी होणार असून, याच दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व निकाल अपेक्षित असून, निकाल आल्यानंतर जिल्ह्याचे नवीन कारभारी जनतेला कळणार आहेत. प्रत्येक मतदारसंघात ज्या-त्या मतदानावर आधारित राऊंड होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

दरम्यान, रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली असून, या दिवशी ६७.७२ टक्के इतक्या फायनल मतदानाची नोंद झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात एकुण मतदान केंद्रांची संख्या ३ हजार ७३८ इतकी आहेत. या सर्व मतदारसंघात पुरूष मतदार १९ लाख ७१ हजार ८३१, महिला- १८ लाख ७६ हजार ७२८, तृतीयपंथीय -३१०, असे एकुण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार आहेत. यापैकी जवळपास ६८ टक्के नागरिकांनी बुधवारी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येवून लोकशाहीच्या उत्सवात आपला सहभाग नोंदविला. जिल्ह्यातील ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदारांपैकी १३ लाख ६६ हजार ५८८ पुरूषांनी तर १२ लाख ३९ हजार ८६८ महिलांनी व इतर ११५ जण अशा २६ लाख ०६ हजार ५७१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळी ७ वाजता पोस्टल मतमोजणीनंतर मतदारसंघनिहाय मतमोजणीमध्ये सकाळी ८ वाजेपासून सुरूवात होणार आहे. सकाळी ११ वाजेपासूनच एकेका उमेदवारांचे कल समजतील तर दुपारी १ वाजेपासून हळूहळू निकालही हाती येण्यास सुरूवात होण्याची शक्यता आहे. दुपारी ३ ते ४ पर्यंत सर्व निकाल अपेक्षित असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

### ११ मतदारसंघात असे झाले मतदान

करमाळा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २९ हजार ३७५ मतदारांनी मतदान केले (६९.७२%). २४५ माढा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ६७ हजार ६९१ मतदारांनी मतदान केले, (७५.९०%), २४६ बार्शी विधानसभा मतदारसंघात २ लाख ४६ हजार ७१३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला तर मतदानाची टक्केवारी ७३.१०%. २४७ मोहोळ अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघात २ लाख ३० हजार ८५० मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ६९.६५% आहे. २४८ सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात एकूण १ लाख ९१ हजार ३९४ मतदारांनी मतदान केले असून, ५८.२५ टक्के मतदान झालेले आहे. २४९ सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ०० हजार २९१ मतदारांनी मतदान केले असून, मतदानाची सरासरी ५७.७७% आहे. २५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५५ हजार २६ मतदारांनी मतदान केले असून, टक्केवारी ६६.५०% आहे. २५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २३ हजार ६२४ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५८.४२ टक्के आहे. २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५९ हजार ७४४ मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची टक्केवारी ६९.५१ टक्के. २५३ सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ६१ हजार ०१३ मतदारांनी मतदान केले असून, मतदानाची टक्केवारी ७८.२७% आहे. किरकोळ ४ ते ५ तक्रारी आज प्राप्त झाल्या असून, त्याचा निपटारा पोलिस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन करीत आहे.

### ३ प्रकारची होणार मतमोजणी

जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघात ३ प्रकारचे मतदान झाले असून, यामध्ये जिल्ह्यात एकूण झालेले स्त्री-पुरूष मतदान २६ लाख ६ हजार ५७१, १६ हजार २६८ कर्मचारी पोस्टल मतदान झाले. तर ३ हजार ९५७ गृहमतदान आणि शासकीय कर्मचाऱ्यांचे ४२६ मतदान प्राप्त झाले आहे. यामुळे प्रत्येक मतदारसंघात ३ प्रकारची मतमोजणी होणार आहे. यामध्ये व्हिव्हिपॅट मशीन मोजणीसाठी प्रत्येक मतदारसंघात किमान १४ टेबल लागणार आहेत. तर पोस्टल मतदानासाठी २ टेबल आणि शासकीय मतदान मोजणीसाठी १ टेबल लागणार आहे.

### यादीत नाव नसल्याच्या एक-दोनच तक्रारी

ज्यांचे लोकसभा निवडणुकीत नाव मतदार यादीत नव्हते. त्यांना मतदान करता आले नाही. यामुळे शेकडो लोकांना मतदान केंद्रातून आल्या पावली माघारी जावे लागले होते. याबाबतच्या अनेक तक्रारी आल्याने विधानसभा निवडणुकीत जिल्हा प्रशासनाकडून यादीत नाव नसणाऱ्यांना वारंवार आवाहन करून नाव यादीत नोंदले. यामुळे अवघ्या एक-दोन तक्रारीच प्राप्त झाल्याचा दावा जिल्हाधिकाऱ्यांनी केला.

### महिलांच्या मताचा वाढलेला टक्का कोणाला तारणार

महिला मतदारांच्या बाबतीत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी विशेष मोहीम राबविण्यात आल्यामुळे महिलांचा टक्का या निवडणुकीत वाढला आहे. इतकेच नाहीतर महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना नेटाने चालविल्याने हा महिलांचा मताचा वाढलेला टक्का कोणाला तारणार? याबाबतही जनतेतून तर्कवितर्क चालू आहेत.

### ३ लाख ८८ हजार ३४७ वाढले मतदान

२०१९ साली विधानसभा निवडणुकीत जिल्हाभरातील ११ मतदारसंघात २२ लाख १८ हजार २२४ इतके मतदान झाले होते तर यावर्षी यामध्ये ३ लाख ८८ हजार ३४७ ची वाढ झाली असून, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २६ लाख ०६ हजार ५७१ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

**जिल्ह्यातील मतदानाची तालुकानिहाय अंतिम टक्केवारी**

| तालुका | स्त्री | पुरूष | एकूण मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| करमाळा | १२३५१७ | १०५८५३ | २२९३७५ | ६२.७२ |
| माढा | १४२६८० | १२५००९ | २६७६९१ | ७५.९० |
| बार्शी | १२९३०८ | १०७१२७ | २४६७१२ | ७३.१० |
| मोहोळ | १२३७२१ | १०७१२७ | २३०८५० | ६९.६५ |
| सोलापूर उत्तर | ९७३४७ | ९४०२८ | १९१३९४ | ५८.२५ |
| सोलापूर मध्य | १००५०७ | ९९७६१ | २००२९१ | ५७.७७ |
| अक्कलकोट | १३३९४१ | १२१०७३ | २५५०२६ | ६६.५० |
| सोलापूर दक्षिण | ११५८४२ | १०७७७२ | २२३६२४ | ५८.४२ |
| पंढरपूर | १३५२३८ | १२४४९७ | २५९७४४ | ६९.५१ |
| सांगोला | १३६५४८ | १२४४६४ | २६१०१३ | ७८.२७ |
| माळशिरस | १२७९३९ | ११२८९७ | २४०८५१ | ६८.९० |
| **एकूण** | **१३६६५८८** | **१२३९८६८** | **२६०६५७१** | **६७.७२** |

### मतदारसंघनिहाय या ठिकाणी होणार मतमोजणी

**जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या मतमोजणीची जय्यत तयारी करण्यात आली असून, प्रत्येक मतदारसंघात किमान ३०० ते ३५० अधिकारी-कर्मचारी काम पाहत आहेत. ज्या-त्या मतदानाच्या आकडेवारीनुसार राऊंड होणार आहेत.**

▸ सोलापूर उत्तरची मतमोजणी सिंहगड इंजि. कॉलेज, पुणे रोड, सोलापूर ▸ शहर मध्यसाठी नुमवि शाळा, डफरीन चौक ▸ सोलापूर दक्षिणची मतमोजणी एसआरपीएफ कॅम्प, सोरेगाव ▸ करमाळा : शासकीय अन्न धान्य गोदाम ▸ करमाळा, माढा: महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम, अकुलगाव, ▸ बार्शी: शासकीय अन्नधान्य गोदाम, ▸ बार्शी, मोहोळ: शासकीय अन्नधान्य गोदाम ▸ मोहोळ, अक्कलकोट: नवीन तहसील कार्यालय, अक्कलकोट ▸ पंढरपूर: शासकीय अन्नधान्य गोदाम, पंढरपूर, ▸ सांगोला: पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन (टाऊन हॉल) सांगोला ▸ माळशिरस: महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, गोदाम, अकलूज याठिकाणी मतमोजणी होणार आहे. पोस्टल मतदान मोजणी प्रथम होणार असून, यानंतर ईव्हीएम मशीनमध्ये असलेले मतदान मोजण्यात येणार आहे.

### गुलाल कोण उधळणार?

▸ सोलापूर शहर उत्तर मतदारसंघात शरद पवार गटाचे माजी महापौर महेश कोठे यांची ४ वेळा निवडून आलेल्या भाजपा आ. विजयकुमार देशमुख यांच्याशी लढत आहे.

▸ अक्कलकोटमध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी विरूध्द माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे हे निवडणूक लढवित आहेत.

▸ मोहोळ मतदारसंघात अपक्ष उमेदवार संजय क्षीरसागर यांनी शरद पवार गटाचे राजू खरे यांना पाठिंबा दिला. यामुळे विद्यमान आ. यशवंत माने यांचे राजकीय भवितव्य आता राजन मालकांच्याच हाती आहे.

▸ माळशिरस मतदारसंघात आ. राम सातपुते यांची लढत शरद पवार गटाचे उत्तम जानकर यांच्याशी आहे. जानकर यांना मोहिते पाटील यांचे बळ मिळाले आहे.

▸ बार्शीत महायुतीकडून राजा राऊत आणि मविआकडून दिलीप सोपल अशी लढत आहे.

▸ पंढरपूर मतदारसंघात आघाडीत बिघाडी झाल्याने आ. समाधान आवताडे विरोधात शरद पवार गटाकडून अनिल सावंत यांना उमेदवारी दिली आणि भगीरथ भालके यांनी काँग्रेसकडून अर्ज दाखल केला. यामुळे आवताडे यांना या दोघांबरोबर सामना करावा लागत आहे.

▸ सांगोला मतदारसंघात शिवसेनेचे आ. शहाजीबापू पवार विरोधात माजी आ. दीपक आबा साळुंके हे रणांगणात उतरले आहेत तर शेकापकडून बाबासाहेब देशमुख अशी तिरंगी लढत होत आहे.

▸ माढा मतदारसंघातून शरद पवार गटातून अभिजित पाटील यांची आमदार बबनदादांचे पुत्र रणजितसिंह पाटील आणि मीनल साठे अशी तिरंगी लढत आहे.

▸ करमाळा येथे विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांच्या विरोधात माजी आ. नारायण आबा पाटील आणि दिग्विजय बागल लढा देत आहेत.

▸ दक्षिण सोलापूर मतदारसंघात आ. सुभाष देशमुख यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी आणि महाविकास आघाडीचे अमर पाटील उभे ठाकले आहेत. तर याच मतदारसंघात बाबा मिस्त्री, संतोष पवार, सोमनाथ वैद्य हेही आपले नशीब अजमावित आहेत.

▸ सोलापूर शहर मध्य मध्ये मात्र सोलापूर शहर-जिल्हाच नाही तर अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. या ठिकाणी मोठमोठ्या नेत्यांनी उमेदवारांच्या प्रचारासाठी हजेरी लावली होती. यामुळे या मतदारसंघात भाजपाचे देवेंद्र कोठे बाजी मारणार की एमआयएमचे फारूक शाब्दी. या दोघांचीच चर्चा शहरात सध्या रंगू लागली आहे. याच मतदारसंघात माकपाचे जेष्ठ नेते नरसय्या आडममास्तर आणि काँग्रेसचे चेतन नरोटे लढा देत आहेत. या सर्व उमेदवारांपैकी कोण गुलाल उधळणार हे उद्या मतमोजणी दिवशीच कळणार आहे.

## ▸▸ क्राईम वृत्त...

### जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या ७ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत लागू असलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून फटाके फोडणाऱ्या ७ जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस नाईक धनाजी बाबर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कैफ आरिफ अलमेलकर, हुसेन मुश्ताकअहमद मैंदर्गी व त्यांच्या ५ साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत १३ नोव्हेंबरपासून जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास बेगमपेठ ते विजापूर वेस या रस्त्यावरील शॉपर स्क्वेअर अपार्टमेंटजवळील इराणी हॉटेलसमोर कैफ आलमेलकर व त्याच्या साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमवून जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून फटाके फोडले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गंगावणे पुढील तपास करीत आहेत.

### शेतीच्या कारणावरून वृध्दाचा कुऱ्हाडीने मारून खून

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

शेतीच्या कारणावरून घोळसगाव (ता. अक्कलकोट) येथे वृध्दाचा कुऱ्हाडीने मारून खून करण्यात आला. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात तिघांविरुध्द खूनाचा गुन्हा दाखल झाला आहे. शशिकांत पांडुरंग कोळेकर (वय ६०, रा. किरनळ्ळी, ता. अक्कलकोट) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत नागनाथ पांडुरंग कोळेकर (य ५३, रा. किरनळ्ळी, ता. अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुरेश सिध्दाराम कोतले (वय ५०), सिध्दाराम सुरेश कोतले (वय ४८) आणि संगीता सिध्दाराम कोतले (वय ३५, सर्व रा. घोळसगाव, ता. अक्कलकोट) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास नागनाथ कोळेकर हे किरनळ्ळी गावाच्य शिवारातील शेतात त्यांच्या शेजारील शेतकरी सुरेश कोतले व इतरांनी संगनमत करून शेतीच्या कारणावरून नागनाथ यांचा भाऊ शशिकांत यास कुऱ्हाडीने त्याच्या उजव्या हाताच्या मनगटाखाली, डाव्या हाताच्या अंगठ्याजवळ, छातीवर, डोक्यात वार करून त्यांचा खून केला. म्हणून अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक करपे तपास करीत आहेत.



### उबाठाच्या शरद कोळी, उत्तमप्रकाश खंदारेंवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याबद्दल अपशब्द काढणे शिवसेना उबाठा गटाचे उपनेते व माजी आमदाराला चांगलेच भोवले आहे. या दोघांसह अनेकांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विधानसभा निवडणुकीत सोलापूर दक्षिण मतदारसंघातील अपक्ष उमेदवारांस पाठिंबा दिल्याचे वक्तव्य खासदार प्रणिती शिंदे व माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी २० नोव्हेंबर रोजी प्रसारमाध्यमांना दिलेल्या मुलाखतीमध्ये केले होते. त्याच्या निषेधार्थ २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी पत्रकार भवन चौकाजवळील वॉटरफ्रंट इमारतीमध्ये असलेल्या शिवसेना उबाठा गटाचे उपनेते शरद कोळी यांच्या कार्यालयासमोर कोळी, उत्तमप्रकश खंदारे व इतर शिवसैनिकांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेस जोडे मार आंदोलन करून त्यांच्याबद्दल अपशब्द काढले होते. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक लकडे पुढील तपास करीत आहेत.



# शहर मध्यमध्ये वाढीव मतांचा कोणाला लाभ

**● चौरंगी लढतीमुळे काटे की टक्कर; नूतन मराठी विद्यालयात उद्या मतमोजणी**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण ५७:७७ टक्के इतके मतदान झाले. एकूण मतदारांची संख्या सुमारे ३ लाख ४६ हजार ६७७ असून, त्यापैकी २ लाख २९१ इतक्या मतदारांनी मतदान केले. त्याची सरासरी टक्केवारी ही ५७:७७ इतकी राहिली.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदारांची संख्या ही सुमारे १ लाख ७० हजार ५०९ इतकी असून त्यापैकी १ लाख ५०७ पुरुषांनी मतदानचा हक्क बजावला. त्याच पद्धतीने स्त्री मतदारांची संख्या ही सुमारे १ लाख ७६ हजार ११५ इतकी असून, त्यापैकी ९९ हजार ७६१ इतक्या स्त्रियांनी मतदान केले. तुलनात्मक दृष्ट्या पाहता पुरुष मतदारांची टक्केवारी सुमारे ५८:९५ इतकी राहिली तर स्त्री मतदारांची टक्केवारी ५६:६२ इतकी झाल्याची माहिती सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी मुंडे यांनी दिली.



### ज्याच्या पारड्यात निर्णायक मते तोच विजेता

मध्य विधानसभा मतदारसंघात मोची, लोधी, मुस्लिम, आणि थोडा बहुत असलेला ख्रिश्चन समाजाचा समावेश असून या मतांच्या गोळा बेरजेवरून उमेदवार निवडणुकीत आपला कस पणाला लावत आसल्याचे दिसून आले आहे. मोची समाज भाजपकडे वळाल्याने सुमारे ५० ते ६० हजार मतं विजयासाठी समाधानकारक आहेत. परंतु मोची समाजातील काही नेतेमंडळी काँग्रेसला आपला पाठींबा कायम ठेवला असल्याने तेथे मतांची विभागणी होणार आहे. त्याचप्रमाणे लोधी, दलीत, रामवडी, सेटलमेंट आदीं परिसरातील निर्णय मत ज्याच्या पारड्यात पडतील, तो विजयी होईल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी (दि.१८) थंडावल्यानंतर एक दिवसाच्या विश्रांतीनंतर गुरुवार (दि.२०) नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजल्यापासून सोलापूर शहर जिल्ह्यात विविध केंद्रांवर मतदान प्रक्रिया राबवण्यात आली होती. दरम्यान नूतन मराठी विद्यालय



येथे सोलापूर शहर मध्य विधानसभा निवडणूक कार्यालय उभारण्यात आले असून, मंगळवार (दि.१९) नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून येथे अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना ईव्हीएम मशीन तसेच मतदानाचे विविध साहित्य वाटप करण्यात आले होते. शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णयाधिकारी, तसेच निवडणूक प्रमुख, निवडणूक नोडल अधिकारी, यांच्या उपस्थितीत मध्य विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मशीन, फर्स्ट एड बॉक्स, तसेच बॅलेट पेपर, आदींसह मतदानासाठी लागणारे विविध साहित्य सुपूर्द करण्यात आले होते. मतदानाची प्रक्रिया संपुष्टात आल्यानंतर आता मतमोजणी प्रक्रिया शनिवार ( दि.२३ ) नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ निवडणूक कार्यालय नूतन मराठी विद्यालय (नू.म.वि) येथे संपन्न होणार आहे.

# मतदानावेळी उमेदवाराचा प्रचार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**




विधानसभा निवडणुकीच्या मतदानावेळी एमआयएमच्या उमेदवाराचा प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांवर सदर बझार पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पोलिस हवालदार प्रभाकर देडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गौस मशाक शेख, गौस सय्यद शेख, सर्फराज कय्युम पटेल, इरफान इक्बाल शेख (सर्व रा. कुर्बान हुसेन नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलिस हवालदार किशोर पवार यांच्या फिर्यादीवरुन दस्तगीर नबीलाल शेख, एजाज अहमद लालसाब पिरजादे, जावेद खाजामियाँ सय्यद, तौसिफ अब्दुलगनी शेख (सर्व रा. मौलाली चौक, सोलापूर) यांच्याविरुध्द दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. मतदानाच्या ४८ तास अगोदर उमेदवाराचा प्रचार करण्यास, चित्रफिती लावण्यास, उमेदवाराचे फोटो व चिन्ह असलेले साहित्य वाटप करण्यास निवडणुक आयोगाकडून मनाई करण्यात आलेली आहे. तरीही मतदानादिवशी दुपारी एकच्या सुमारास कुर्बान हुसेन नगर येथील सार्वजनिक रोडवर गौस शेख व त्याचे साथीदार हे एमआयएम पक्षाचे उमेदवार फारूख शाब्दी यांचा फोटो व पक्षाचे चिन्ह असलेल्या स्लिपा मतदारांना देत होते. तर सायंकाळी चारच्या सुमारास लष्कर परिसरातील कॅम्प शाळा येथील १०० मीटर क्षेत्राच्या बाहेरी दि प्रोग्रेसिव शाळेसमोरील रस्त्यावर दस्तगीर शेख व त्याचे साथीदार हे एमआयएम पक्षाचे उमेदवार फारूख शाब्दी यांचा फोटो व पक्षाचे चिन्ह असलेल्या स्लिपा मतदारांना देत होते. निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनीकडून दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून उमेदवाराचा प्रचार करीत असल्याचे दिसून आल्याने त्यांच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक जगताप आणि पोलिस उपनिरीक्षक साखरे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५१

**मज माझें कांही दिसे पाहतां ।**
**तें तुज अनंता समर्पावें ।।**

मी, माझा, माझी आणि माझे या चौकटीत सापडला नाही असा माणूस सापडणे कठीण आहे. सुदैवाने असा माणूस सापडलाच तर तो निश्चितच संत, महात्माच असेल यात शंकाच नाही. संसारात अडकलेल्या जीवाला मीतून सहजासहजी बाहेर पडता येत नाही. मी ला सोडून वागायचे म्हटले तर सांसारीक जीवाला ते पटतही नाही. जे कांही करायचे ते मी साठीच करायचे असा भ्रम करून बसलेल्या जीवाला खरा मीच कळत नाही. पण खरा मी जर कळला तर हा जीव संसाराच्या पिंजऱ्यात अडकत नाही. अर्थात, मी, माझा, माझी, माझे ही वृत्ती त्याच्या मनाला स्पर्श करीत नाही. मी चा खरा परियच झालेला माणूस हे मी केले, हे माझे, ते माझे असे म्हणत नाही. संत महात्म्यांच्या सहवासात आल्याने आई-वडीलांच्या व संत महात्म्यांच्या कृपेने आपणाला स्वत:चा खरा परिचय झाला. या परिचयामुळे माझे म्हणण्यासारखे किंवा हक्क गाजविण्यासारखे आपल्याकडे कांही शिल्लक राहिले नाही. जे कांही आपल्याजवळ आहे ते सर्व त्या सर्वेश्वराचे आहे. त्यामुळे त्याला अर्पण करण्यासारखे, माझ्या मालकीचे माझ्याजवळ कांही नाही. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, मज माझें कांही न दिसे पाहतां। तें तुज अनंता समर्पावे।।



संत महात्मे आणि संसारात अडकलेला जीव यांच्यात खूप फरक असतो. संत कशालाच माझे म्हणत नाहीत आणि हा जीव कशालाही माझे म्हटल्याशिवाय राहात नाही. प्रत्येक गोष्टीत मी-मी म्हणणारा हा जीव भगवंताला पान, फुल, पत्र, धन धान्य कांहीही अर्पण करीत असेल तरी हे माझे आहे, हे मी तुला देत आहे किंवा माझ्या वतीने अर्पण करीत आहे असे म्हणतो. भगवंताला देतांना जर तो माझे आहे म्हणतो तर सामान्यांना गोर-गरिबांना देताना तो माझे आहे, असे म्हटल्याशिवाय राहिलच कसा? गोर गरिबांना चार आण्याची मदत दिली तरी ....यांनी मदत दिली असे जाहिर केले जाते. मंदिरामध्ये पाच-पन्नास रुपयाचे एखादे घड्याळ किंवा देव देवतांचे छायाचित्र दिले तरी..... यांच्यातर्फे मंदिराला सप्रेम भेट असे स्पष्ट अक्षरात त्या घड्याळावर, छायाचित्रावर लिहिले जाते. मंदिराच्या पायऱ्याला, गाभाऱ्याला दगड देवून त्याच्यावरही श्री चरणी.... यांच्यातर्फे अर्पण असे लिहिले जाते. अनेक मंदिरात अभंग, श्लोक, सुभाषिताच्या पाट्यांपेक्षा देणगीदारांच्या नांवाच्याच पाट्या, फलक मोठ्या अक्षरात लिहिलेल्या पाहायला मिळतात. साक्षात भगवंताशी मीचा व्यवहार करणारा हा माणूस दैनंदिन जीवनात मीचा किती व कसा व्यवहार करीत असेल याचा विचार आपण निश्चितपणे करायलाच हवा. मी आहे तेथे ईर्षा, द्वेष, मोह, मत्सर, अहंकार, स्वार्थ, काम, क्रोध हे असतातच. याची आठवण ठेवून जर आपण वागू लागलो तर कदाचित मी तून बाहेर पडण्याचा मार्ग दिसू लागेल. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# एसटी बसेसची कमतरता; प्रवाशांना फटका

**निवडणूक कर्तव्यवामुळे प्रवाशांची झाली गैरसोय; बसेसची वाट पाहत उभे राहावे लागले ताटकळत**

### बसेस उपलब्ध नसल्याने सोलापूर एसटी स्टँडवर प्रवाशांची अलोट गर्दी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या सुमारे ४७० एसटी बसेस निवडणूक कर्तव्यावर सोडण्यात आल्याने प्रवाशांना मतदान दि.२० आणि २१ नोव्हेंबर रोजी मनस्ताप सहन करावा लागला. एसटी महामंडळाकडे बसेसची कमतरता झाल्याने सोलापूर बस स्थानकावर दोन दिवस प्रवाशांची मोठी गर्दी होती. इच्छित स्थळी जाण्यासाठी बसेस उपलब्ध नसल्याने प्रवाशांना ताटकळत उभा रहावे लागले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक कार्यालयाच्या वतीने एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयास पत्रव्यवहार करून सुमारे ४७० एसटी बसेस निवडणूक कर्तव्यावर सोडण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम जाणवला. एसटी बसेसने निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर नेण्याचे आणि आणून सोडण्याचे काम केले. त्यामुळे शहर जिल्ह्यातील एसटी बसेस प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध नव्हत्या. त्याचा फटका प्रवाशांना सहन करावा लागला. बसेस ठराविक कालावधीनंतर आल्यानंतर बसमध्ये जाण्यासाठी देखील प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती.

> **बसेस फेऱ्या कमी झाल्याने त्रास**
>
> गावातून शहरी भागात येणाऱ्या चाकरमान्यांना तसेच विद्यार्थ्यांना आणि इतर प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका सहन करावा लागला. एसटी बसेसच्या फेऱ्या कमी झाल्याने तासंतास एसटी बसची वाट पाहत उभे राहावे लागले. **- अशोक नलावडे, प्रवासी**

# तेज ज्ञान फाउंडेशनच्या वतीने रविवारी रजत जयंती ध्यान महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२१ नोव्हेंबर-**

'हॅपी थॉट्स' नावाने ओळखली जाणारी तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्यमहोत्सवी वर्षा निमित्त रविवार दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी हुतात्मा स्मृति मंदिर, पार्क चौक, सोलापूर येथे 'रजत जयंती ध्यान महोत्सव' आयोजित करण्यात आला असल्याची माहिती गणेश इराबत्ती यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाचे प्र कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, उद्योगपती किशोर चंडक आणि ज्येष्ठ नाट्य कलावंत शोभा बोल्ली यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरु सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे. तेजज्ञान फाउंडेशनतर्फे आयोजित हा महोत्सव ध्यानाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरवण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देईल.रविवारी सकाळी ९.३० ते दुपारी १२ वाजेदरम्यान हा कार्यक्रम होइल. याचा सर्वांनी लाभ घेण्याचे आवाहन गणेश इराबत्ती यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेस परशुराम रापेली, विकास भांगे, स्मिता दंडी, सुजाता गुडपल्ली, रमेश कांबळे, इरेश लातूर आदी हजर होते.

# श्री मज्जीनेंद्र १००८ आदिनाथ जिनबिम्ब पंचकल्याणक महामहोत्सव २५ नोव्हेंबरपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२१ नोव्हेंबर-**

श्री मज्जीनेंद्र १००८ आदिनाथ जिनबिम्ब पंचकल्याणक प्रतिष्ठा महा महोत्सव समिती, श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन ट्रस्ट आणि सकल जैन समाज सोलापूर यांच्या विद्यमाने श्री मज्जिनेंद्र १००८ आदिनाथ जिनबिंब पंचकल्याणक महा महोत्सवानिमित्त दि.२५ ते २९ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत होणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान (जैन बोर्डिंग), बुधवार पेठ येथे हा पंचकल्याणक महोत्सव होणार आहे. परमपूज्य पट्टाचार्य १०८ श्री विशुद्ध सागरजी महाराज, १०८ श्री विभवसागरजी महाराज यांच्या प्रेरणेने, १०८ मुनीश्री विभास्वरसागर महाराज, १०८ मुनिश्री सौम्य सागर महाराज, १०८ मुनिश्री सारस्वत सागर महाराज, १०८ मुनिश्री शुद्धोपयोग सागर, १०८ मुनिश्री जयंत सागरजी महाराज, क्षुल्लक १०५ श्रुतसागरजी महाराज यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

कार्यक्रमात बाल ब्रम्हचारी पियुष भैयाजी (सतना) हे प्रतिष्ठाचार्य म्हणून लाभणार आहेत. संगीतकार संजय रंगीला अँन्ड पार्टी (भोपाळ) उपस्थित राहणार आहेत. श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर शिखरस्थित १००८ आदिनाथ भगवान जिनबिम्ब पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव यामध्ये मुलनायक १००८ श्री आदिनाथ भगवान, मल्लिनाथ भगवान, वासुपुज्य भगवान, नेमिनाथ भगवान, पारसनाथ भगवान, महावीर भगवान मुर्तीचे विधीवत पंचकल्याणक होणार आहे.

२५ नोव्हेंबरला गर्भकल्याणक, २६ ला जन्म कल्याणक, २७ ला तप कल्याणक, २८ ला ज्ञान कल्याणक, २९ ला मोक्ष कल्याणक असे पाच दिवस पंचकल्याणक कार्यक्रमात विधीवत पुजा पाठ होणार असून सकाळी ६ ते दुपारी १२.३० आणि दुपारी ३.३० ते रात्री ११ पर्यंत धार्मिक कार्यक्रम होतील. महाराजांचे प्रवचन, सायंकाळी आरती, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष सुनिल गांधी, डॉ. रणजित गांधी, अजित शहा, संजय शहा आणि पंचकल्याणक अध्यक्ष संजय गांधी यांनी केले आहे.

पत्रकार परिषदेस पदमकुमार मेहता, शाम पाटील, धनंजय शहा, संजीव गांधी, नुतन गांधी आणि समाजबांधव उपस्थित होते.

# मुद्रासनसिटी नागरी आरोग्य केंद्रातील कॅन्सर तपासणी शिबिराला महिलांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२१ नोव्हेंबर-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभाग व सोलापूर कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्पेशल सर्विस सेशन अंतर्गत अक्कलकोट रोड येथील सो. म. पा. मुद्रासनसिटी नागरी आरोग्य केंद्र येथे घेण्यात आलेल्या महिलांच्या गर्भाशयाच्या मुखाचा व स्तनाचा कॅन्सर तपासणी शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिराचे उद्घाटन मुद्रासनसिटी नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसन्नजीत वाघचौरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड हे होते.

डॉ. वाघचवरे म्हणाले, महिलांनी कॅन्सर विषयी सखोल माहिती घेतली पाहिजे. आपल्या कुटुंबात जर कॅन्सर पेशंटचा इतिहास असेल तर त्या कुटुंबातील महिलांनी व पुरुषांनी स्वच्छेने कॅन्सर तपासणी करून घेतली पाहिजे. त्यामुळे भविष्यात होणाऱ्या परिणामांना आटोक्यात आणणे शक्य होते.

यावेळी सोलापूर शाखेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, सोलापूर कॅन्सर सोसायटीच्या अधिकारी पियुशा देशपांडे, पी.एच. एन. प्रियांका पवार, परिचारिका अशालता मस्के, पुष्पा जाडकर, सुरेखा भागानवर, पूजा कळमेळवार, पल्लवी महाडिक, वंदना टोणपे, आकाश गायकवाड, करण खानापुरे आदीं उपस्थित होते. या शिबिरात ३५ महिलांनी स्तनाची व गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरची तपासणी करून घेतली. स्वागत आकाश गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक आशालता मस्के यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार पियूशा देशपांडे यांनी मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - भारतीय |
| दि. २२ नोव्हेंबर २०२४ | अग्रहायण मासारंभ |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. सप्तमी (१८.०६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आश्लेषा (१७.०८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्मा (११.३२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (अहोरात्र) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या काम ावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओोळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :**जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल. धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

## क्रीडा

# महाराष्ट्र पहिला डाव ४८८ वर घोषित

**१९ वर्षांखालील कुचबिहार क्रिकेट : दुसऱ्या दिवस अखेर आसाम पहिला डाव २ बाद ५२**



निशांत सिंघानिया १०९/५ बळी



साहिल नलगे १७९



ओम भाबड १०५

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियवर सुरू असलेल्या महाराष्ट्र विरुद्ध आसाम ह्या १९ वर्षांखालील कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात दुसऱ्या दिवशी चहापानाला महाराष्ट्राने पहिला डाव ८ बाद ४८८ धावांवर (१५०.२ षटके) घोषित केला. कालच्या ४ बाद १९७ वरून महाराष्ट्राने आज डाव पुढे सुरू केला असता कालचा नाबाद फलंदाज साहिल नलगेने त्याचे सोलापुरातील सलग दुसरे शतक साजरे केले. त्याला सोबतीला असलेला यष्टीरक्षक फलंदाज अनुराग कवडेने संयमी अर्धशतकीय खेळी (५५ धावा ९५ चेंडू ६ चौकार) साजरी करत दोघांमध्ये ९३ धावांची भागीदारी केली.

अनुराग बाद झाल्यानंतर ओम भाबड हा साहिलच्या साथीला आला व त्याने दीडशतक पार केले. त्याच सोबत ओम भाबड ने ताबडतोब फलंदाजी करत प्रथम त्याचे अर्धशतक साजरे केले. लंच साठी खेळ थांबला तेंव्हा महाराष्ट्राने ५ बाद ३३९ धावा केल्या तेंव्हा साहिल १४३ धावांवर तर ओम वर ७९ वर नाबाद होते. लंच नंतर साहिल त्याचे संयमी द्विशतक पूर्ण करेल असे वाटत असताना आसामच्या निशांत सिंघानिया ने त्याला १७९ धावांवर स्वतच्या गोलंदाजीवर झेलबाद केले. दुसऱ्या बाजूला ओम ने पुन्हा एकदा धमाकेदार खेळ करत आपले शतक साजरे केले. साहिल बाद झाल्यावर निखिल लुनावत (नाबाद १५) सोबत ४७५ पर्यंत धावसंख्या नेली पण शेवटच्या १० धावा मध्ये ओम आणि योगेश चव्हाण (७) बाद झाले आणि चहापानाच्या वेळी खेळ थांबला महाराष्ट्राने डाव घोषित केला. आसाम कडून निशांत सिंघानिया ने १०९/५ बळी घेतले. त्याच्या सोबत आयुष्मान मालकर ८०/२, दिपांकर पॉल १७/१ बळी घेतला. चहापान नंतर आसाम संघाचा पहिला डाव सुरू झाला आणि ५ व्याच षटकात योगेश चव्हाण ने सलामीवीर बरूनजोती मालकर (२) याला त्रिफळाचित करत पहिला धक्का दिला. त्याच्यानंतर आलेला अभिजीत भद्रा (२) हा देखील नीरज जोशी कडून त्रिफळाचीत झाला. २ बाद १६ वरून आसामने ऋषिकेश दास (९नाबाद ) व सलामीवीर राजवीर सिंग (३३ नाबाद ) यांच्या दुसऱ्या दिवशीचा खेळ थांबला तेव्हा २९ षटकात ५१ धावा केल्या. अद्यापी आसाम संघ ४३७ धावांनी पिछाडीवर असून तिसऱ्या दिवशी आसामचा पहिला डाव लवकरात लवकर गुंडाळण्याचा महाराष्ट्राचा प्रयत्न असेल जेणेकरून हा सामना एका डावाने जिंकता येईल.

## सोलापूर जिल्हा डॉजबॉल निवड चाचणी स्पर्धा २५ नोव्हेंबरला

**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

जालना येथे ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या १४व्या सब ज्युनिअर राज्यस्तरीय डॉजबॉल (मुले व मुली) स्पर्धे करिता निवडला जाणाऱ्या सोलापूर जिल्हा संघाचे निवड चाचणी स्पर्धा २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता राजीव गांधी इनडोअर स्टेडियम, अश्विन हॉस्पिटलशेजारी आयोजित केली आहे. या स्पर्धे तील पात्र खेळाडूंची जन्मतारीख ही १ जानेवारी २००८ नंतरची असावी. निवड चाचणी स्पर्धेकरिता प्रत्येक खेळाडूस १०० रु प्रवेश फी आकारण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील खेळाडूंनी शरण वांगी (मो. ९१४६०३२४७३) यांच्याकडे नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा संघटनेचे सचिव सुदेश मालप यांनी केले आहे.



## ज.रा.चंडकच्या श्रावणी सूर्यवंशीची राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

बाळे येथील ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रावणी सूर्यवंशी हिची राजकोट (गुजरात) येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक दशरथ गुरव व नफिसा शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

श्रावणीने राज्य शालेय डायव्हिंग स्पर्धेत हायबोर्डमध्ये प्रथम, ३ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये प्रथम व १ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

या कामगिरीवर तिची निवड झाली. तिचे महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापिका निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ व मुख्याध्यापक मोहनराव घोडके यांनी अभिनंदन केले.

## मरवडे येथे रविवारी जिल्हा किशोर गट खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

मरवडे (ता. मंगळवेढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर रविवारी २४ नोव्हेंबर रोजी १४ वर्षाखालील किशोर गटाची जिल्हा खो-खो स्पर्धा आयोजित केली आहे.

सोलापूर अॅम्युचर खो खो असोसिएशन यांच्या मान्यतेने व मरवडे येथील छत्रपती खो-खो क्लब यांच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. २४ नोव्हेंबर रोजी किशोर खेळाडू १४ वर्षांखालील असावेत.

या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक ११ हजार एक रुपये, द्वितीय ७ हजार एक रुपये, तृतीय ५ हजार एक रुपये व चतुर्थ पारितोषिक ३ हजार एक रुपये तसेच उत्कृष्ट खेळाडूंसाठीही एक हजार एक रुपयांची सहा वैयक्तिक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. जिल्ह्यातील संघानी या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन छत्रपती खो-खो क्लबच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुक संघानी २३ नोव्हेंबरपर्यंत मिनाज इनामदार (मो ९११२११०३४०) अथवा सुदर्शन घुले (मो- ९०९६९२७७९६) यांच्याकडे नोंदणी करावी.

स्पर्धेचे उद्घाटन रविवारी (दि.२४) सकाळी ८.३० वाजता मंगळवेढा पालिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक विजय पिसे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी, सभापती सोमनाथ अवताडे, मरवडेचे सरपंच हरिदास चौधरी, हनुमान विद्यामंदीर मरवडेचे मुख्याध्यापक हनमंत वगरे, रेल्वे पोलिस दामोदर घुले, जि.प. शाळा मरवडेचे मुख्याध्यापक निवृत्ती सुर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.



## व्हॅलेंटाईन स्कूलच्या विराज अरकालची राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

विराज मुंबई येथे झालेल्या ३४व्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत मुलांच्या ५ ते ७ वर्ष वयोगटात व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विराज अरकाल थर्ड लॅब या स्केटिंग प्रकारात सुवर्णपदक व वन लॅब या स्केटिंग प्रकारात कांस्यपदक पटकावले आहे. या कामगिरीवर त्याची राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी महाराष्ट्र स्केटिंग संघाकडून निवड झाली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक शिवाजी अवताडे, संतोष पाटील व लावण्या दुस्सा यांचे मार्गदर्शन लाभले. विराजचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा आदींनी अभिनंदन केले.

# पंढरपूर विधानसभेसाठी १४ टेबलवर होणार मतमोजणी

**● निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे : २१५ कर्मचारी, १३७ पोलीस अधिकारी, कर्मचारी नियुक्त**




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर -**

पंढरपूर विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता सुरू होणार आहे. यासाठी १४ टेबलवरुन पंचवीस फेऱ्यात मतमोजणी होणार आहे.याकरिता प्रशासनाने आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे.

मतमोजणीसाठी सुमारे २१५ अधिकारी कर्मचारी तर सुरक्षेसाठी १३७ पोलीस अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. पंढरपूर विधानसभा मतदार संघाची



मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी शासकीय धान्य गोदाम, रेल्वे मैदान समोर, कराड रोड पंढरपूर येथे होणार आहे. मतमोजणीसाठी १४ टेबल ची संख्या आहे. तर २५ फेऱ्यांतून मतमोजणी पूर्ण होणार आहे. एका टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, एक मतमोजणी सहाय्यक, एक शिपाई व एक सूक्ष्म निरीक्षक राहणार आहे. तसेच मतमोजणी कक्षात मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निरीक्षक, उमेदवार व निवडणूक मतमोजणी प्रतिनिधी यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मतमोजणी कक्षात पुरेसा वीजपुरवठा व जनरेटर बॅकअप, सीसीटीव्ही यंत्रणा आदी सुविधा असणार आहे. संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेसह आग प्रतिबंधक सुविधा, स्वच्छतागृह, प्राथमिक वैद्यकीय सेवा असणार आहेत.

मतमोजणी केंद्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या अधिकृत पासधारकांसह मतमोजणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. मतमोजणी कक्षात मोबाईल तसेच आक्षेपार्ह वस्तू नेता येणार नाहीत. तसेच स्वतंत्र माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे माध्यम प्रतिनिधींपर्यंत माहिती पोहोचवली जाणार आहे. सुरक्षा व गोपनियतेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मतमोजणीच्या वेळी राजकीय कार्यकर्ते, मतमोजणी प्रतिनिधी यांनी शांतता राखून सहकार्य करावे, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मतमोजणी कक्षात सुरक्षेसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यामध्ये १२ पोलीस अधिकारी, १२५ ठाणे अंमलदार याशिवाय केंद्रीय सुरक्षा बल, एसआरपीएफ यांची सुरक्षा राहणार आहे. मतमोजणी केंद्रासह मतमोजणी परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक निकालानंतर नागरिकांनी शांतता राखून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे. असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी केले आहे.

### मतदारांची संख्या अन् मतदान

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख ७३ हजार ६८४ इतके मतदार होते. त्या पैकी एक लाख ३५ हजार २३८ पुरुष आणि एक लाख २४ हजार ४९७ महिलांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला. पंढरपूर विधानसभा मतदार संघात पुरुष,महिला आणि इतर असे मिळून एकूण दोन लाख ५९ हजार ७४४ इतके मतदान झाले. या मतदार संघात ६९.५१ टक्के मतदान झाले.



## राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनचे सदस्य बनले अनाथांचे नाथ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर-**

बालदिनाचे औचित्य साधून राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन तर्फे अनाथ आश्रममधील मुलांसाठी धान्य वाटप, जीवन उपयोगी वस्तू तसेच शालोपयोगी वस्तू याचे वाटप करण्यात आले.

देव त्यालाच मदत करतो जो लोकांची मदत करण्यास तयार असतो, या वाक्याप्रमाणे अनाथ आश्रममध्ये चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करण्यासाठी राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनची टीम या ठिकाणी गेली. सर्वांना फुगे फुगवून खेळायला दिल्यानंतर प्रत्येक चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरच हास्य टिपण्यासारखं होतं. अवघ्या दोनच दिवसात नियोजन ठरवल्यानंतर अनेक मदतीचे हात पुढे आले. संस्थेच्या अध्यक्षा प्रांजली मोहीकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरचे निरागस भाव बघितल्यानंतर चाचा नेहरूंना लहान मुलं का आवडायची याचे उत्तर इथच मिळतं. या मुलांचे आई-वडील नातेवाईक सर्व काही बनलेले तेथील संस्थापक हे एकटे मुलांची जबाबदारी घेऊन करत असलेल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले. संस्थेतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. या चिमुकल्यांच्या भविष्याकरिता शुभेच्छा देऊन त्यांच्या भावी आयुष्यासाठी राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन नेहमी तत्पर असेल असेही अध्यक्षा त्यांच्या मनोगतात म्हणाल्या. या उपक्रमासाठी, मन मोठं करून ज्यांनी ज्यांनी मदतीचा हात दिला ते म्हणजे, अध्यक्ष प्रांजली मोहीकर, उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने, ज्योती मेने, शैलेश मोहीकर, वेदांत मोहीकर, तसेच एकत्व सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष दीपक करकी, शाहबाज मकानदार, चेतन झाडे, ऋषिकेश हलसुरे, राम हुंडारे, डॉ. मनोज देवकर, हेमलता नारायणकर, प्रमोद तम्मनवार, अपर्णा पाठक, आशीर्वाद पाठक, सुवर्णा कांबळे, मंजिरी सवळे, मनोहर नारायणकर, रवी खानचंदानी, डॉ. भोजने, अनुराधा निकम, सुहास भोसले, राजेश्वर पाटील, तुषार शिंदे या सर्वांनी मदतीचा हात पुढे करून उत्तम सामाजिक कार्य केले. याप्रसंगी इकोनेचर क्लबतर्फे मुलांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. धान्यवाटप करून सर्वांना खाऊ देण्यात आला. सूत्रसंचालन सुहास भोसले यांनी केले आणि कार्यक्रमाचे आभार अपर्णा पाठक यांनी मांनले.

## माढ्यात होणार २५ फेऱ्या; प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात

**● सकाळी आठपासून मतमोजणी; मतमोजणीच्या २५ फेऱ्या होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २१ नोहेंबर-**

२४५ माढा विधानसभा मतदारसंघात ७०.३६ टक्के मतदान झाले असून माढा विधानसभा मतदारसंघाचे एकूण मतदारसंख्या ३ लाख ५२ हजार ६९१ आहे. त्यापैकी २ लाख ४८हजार १६७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. यापैकी १ लाख ३१हजार ६८३ पुरुष, १ लाख१६ हजार ४८२ महिला व २ तृतीयपंथीयांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यामुळे माढा मतदारसंघात मतदार संख्येच्या सरासरीने ७०.३६ टक्के मतदान झाले आहे. मतमोजणी १४ टेबलांवर २५ फेऱ्यांमध्ये पूर्ण होणार आहे.

शनिवारी २३ नोव्हेंबर सकाळी आठ वाजता कुर्डूवाडी येथील वखार महामंडळाच्या गोदाममध्ये मतमोजणीला सुरुवात होणार आहे. यासाठी प्रशासनाकडून तयारी झाली असून मतमोजणीच्या एकूण २५ फेऱ्या होणार असून मतदारसंघाचा संपूर्ण निकाल दुपारी ४ वाजेपर्यंत लागणार असल्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी प्रियंका आंबेकर यांनी सांगितले. मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर कुर्डवाडी येथील औद्योगिक वसाहत व शहरात पोलीस प्रशासनाकडून कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात योग्य खबरदारी घेऊन जागोजागी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.

माढा विधानसभा मतदारसंघासाठी एकूण १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. परंतु प्रामुख्याने माढ्यात तिरंगी लढत झाली. महाविकास आघाडीचे अभिजीत पाटील, महायुतीच्या ॲड. मीनलताई साठे व अपक्ष उमेदवार रणजितसिंह शिंदे यांच्यात मुख्य लढत असून या तिघांचेही राजकीय भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले आहे. माढा विधानसभा मतदारसंघासाठी या तिघांमध्ये चुरशीची लढत असून महिला व तरुणांचा मतदाना मधील उत्स्फूर्त प्रतिसाद कोणाच्या पारड्यात पडणार हे २३ नोव्हेंबर शनिवारी मतमोजणी झाल्यानंतर कळणार आहे.

### हे आहेत उमेदवार

अभिजित धनंजय पाटील-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, ॲड. मीनल दादासाहेब साठे-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार, रणजितसिंह बबनराव शिंदे-अपक्ष, अभिजित धनंजय पाटील-बहुजन समाज पार्टी, राहुल गौतम चव्हाण-वंचित बहुजन आघाडी, अभिजित आण्णासाहेब पाटील-अपक्ष, अभिजित तुळशीराम पाटील-अपक्ष, ॲड. तुकाराम बळीराम पाटील-अपक्ष, मयूर अजिनाथ काळे-अपक्ष, महेश बाळू बिस्किटे-अपक्ष, रणजितभैय्या शिंदे-अपक्ष, राजेश तानाजी खरे-अपक्ष, सीताराम विठ्ठल रणदिवे-अपक्ष या उमेदवारांचे भवितव्य इव्हीएममध्ये सीलबंद झाले आहे.




## वृद्धेचा खून; आरोपीला जन्मठेप

**▸ बार्शी न्यायालयाचा निकाल**
**▸ २०१८ मध्ये सुरली येथे घडली होती घटना**





**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी/टेंभुर्णी,दि.२१ नोव्हेंबर-**

माढा तालुक्यातील सुरली येथील फिर्यादी मुकुंद चव्हाण यांच्या शेतालगतच असणारे समाधान सरडे यांच्या शेतात आरोपी कृष्णा दादासाहेब कांबळे हा शेतमजूर म्हणून कामास होता. त्याने मोबाईलच्या वादात वृद्धेचा खून केला होता. या प्रकरणी त्याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

ही घटना २१ जून २०१८ रोजी दुपारी चारच्या सुमारास फिर्यादीची आई द्वारकाबाई चव्हाण ही शेतात भुईमुगाच्या शेंगा वेचत असता लाईट आल्याने ती विहिरीवरील मोटर चालू करण्यास गेली. मोटर चालू करून तिने उसाला पाणी दिले. त्यादरम्यान तिने ठेवलेल्या ठिकाणी मोबाईल मिळून आला नाही, म्हणून बाजूच्या शेतात काम करणाऱ्या आरोपी कृष्णा यास मोबाईलबाबत विचारले असता त्या दोघांमध्ये भांडण झाले. तेव्हा तिचा पुतण्या योगेश चव्हाण यांनी भांडण सोडवले. त्यानंतर द्वारकाबाई कृष्णाने केलेल्या भांडणाबाबत त्याला घेऊन त्याच्या मालकाकडे जात असताना आरोपीने आपली बदनामी होईल या कारणाने रागाच्या भरात लोखंडी खोऱ्याचा तुंबा तिच्या डोक्यात मारून तिचा खून केला व तिचे शरीर फरपटात नेऊन उसामध्ये लपून ठेवले. याबाबत फिर्यादीनी आरोपी कृष्णा दादासाहेब कांबळे (रा. देवदैठण, ता. जामखेड) याच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पुढील तपास राजेंद्र मगदूम यांनी करुन आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करूनन्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकार पक्षाच्या वतीने सदर गुन्हा शाबितीसाठी १२ साक्षीदार तपासण्यात आले. यातील साक्षीदार व डॉक्टरांची साक्ष तसेच तपासी अंमलदारांनी तपासा दरम्यान गोळा केलेले परिस्थितीजन्य पुरावे हे सरकारी वकिल राजश्री कदम यांनी मा न्यायालयासमोर मांडले. सरकारी पक्षाचा पुराव्याचा विचार करुन बार्शीचे न्या. एल. एस. चव्हाण यांनी आरोपी कृष्णा दादासाहेब कांबळे यास भादविक ३०२ अन्वये दोषी ठरवून जन्मठेप व १५ हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली.

सरकार पक्षातर्फे राजश्री कदम यांनी कायदेशीर बाबीवर जोरदार युक्तिवाद केला व काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार अमृत खेडकर यांनी वेळोवेळी साक्षीदार, पुरावे हजर ठेवण्याचे काम पाहिले. सदर केसमध्ये करमाळ्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील व पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांनी फिर्यादी व साक्षीदारांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

## अक्कलकोटमध्ये होणार २५ फेऱ्या

**एका फेरीला लागणार अर्धा तास; २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक**






**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तहसील कार्यालयात शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता मतमोजणीस सुरवात होणार असून साधारणतः सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्व निकाल हाती येणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांनी दिली.

अक्कलकोट विधानसभेसाठी बुधवारी शांततेत, चुरशीने ६६.५० टक्के इतके मतदान झाले आहे. तहसील कार्यालयात शनिवारी एकूण २५ फेरी होणार असून एका फेरीस सुमारे अर्धा तास लागणार आहे. साधारणतः सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्व निकाल हाती येणार आहे. मतमोजणीसाठी सुमारे दोनशे कर्मचारीची नेमणूक केली असल्याची माहिती तहसीलदार विनायक मगर यांनी यावेळी दिली. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ८३ हजार ४७९ मतदारांपैकी २ लाख ५५ हजार २६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष १ लाख ९६ हजार ५७७ मतदारांपैकी १ लाख ३३ हजार ९४१ पुरुष मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. १ लाख ८६ हजार ८५९ महिला मतदारांपैकी १ लाख २१ हजार ०७३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ४३ तृतीयपंथी मतदारांपैकी १२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची एकूण सरासरी ६६.५० टक्केवारी आहे.

## सांगोला विधानसभा मतमोजणीची तयारी पूर्ण

**निवडणूक निर्णय अधिकारी बी. आर. माळी यांची माहिती**






**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ नोव्हेंबर-**

सांगोला विधानसभासाठी मतमोजणी दि.२३ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता सुरू होणार असून सदर मतमोजणीची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली.

सदरची मतमोजणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन,सांगोला या ठिकाणी होणार असून मतमोजणीसाठी अधिकारी व कर्मचारी मिळुन सुमारे १०० जणांची टीम कार्यरत केली आहे. मतमोजणीची तयारी पूर्ण झालेली असून एकूण २३ फेऱ्या होणार असून त्यासाठी १४ टेबल ठेवण्यात आले असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी सांगितले. मतमोजणी सुलभ होण्यासाठी विविध अधिकारी व कर्मचारी यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत. संपूर्ण मतमोजणीसाठी नियंत्रण अधिकारी, स्लिप मोजण्यासाठी अधिकारी, स्ट्राँग रूमसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संदीप भंडारे आणि ९ कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. भोजन व्यवस्था, हजेरी घेणे, स्क्रीन डिस्प्ले, व्हिडिओ चित्रीकरण, रिपोर्टिंग आणि मीडियासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला असल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

### सांगोला विधानसभेसाठी हे १३ उमेदवार रिंगणात

दीपकआबा साळुंखे (शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे), शशिकांत गडहिरे (बहुजन समाज पार्टी), शहाजी पाटील (शिवसेना), बाबासाहेब देशमुख (शेकाप), राघू घुटुकडे (न्यू राष्ट्रीय समाज पार्टी), एकनाथ शेंडगे (अपक्ष), परमेश्वर गेजगे (अपक्ष), बाळासाहेब देशमुख (अपक्ष), बाळासाहेब इंगोले (अपक्ष), मोहन राऊत (अपक्ष), रणसिंह देशमुख (अपक्ष), राजाराम काळेबाग (अपक्ष), ज्ञानेश्वर उबाळे (अपक्ष).

**एकूण मतदार**

३ लाख ३३ हजार ४९३ मतदार असून त्यामध्ये १ लाख ७२ हजार ७०४ पुरूष, १ लाख ६० हजार ७८४ स्त्री व ५ इतर मतदार

**झालेले मतदान**

एकूण झालेले मतदान २ लाख ६१ हजार १३ त्यामध्ये १ लाख ३६ हजार ५४८ पुरुष, १ लाख २४ हजार ४६४ स्त्री व १ इतर असे एकूण ७८.२७ % मतदान झाले.

## मतमोजणी कालावधीत असणार निर्बंध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ नोव्हेंबर-**

शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वा. पासून सोलापुरातील तीनही विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी सुरु होणार आहे. लगतचे १०० मीटर परिसरात विविध साहित्य, शस्त्र बाळगण्यास, वाहनांचे आणि व्यक्तींच्या प्रवेशास प्रतिबंध घालण्यात येत आहे.

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाची एन. बी. नवले, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, शहर मध्य नूतन मराठी विद्यालय, हरीभाई देवकरण प्रशालाजवळ, होम मैदानसमोर, दक्षिण सोलापूर मतमोजणी राज्य राखीव पोलीस बल गट क्रं.१०, सोरेगांव येथे होणार आहे.



## प्रियांका येडलवार यांचा महाराष्ट्र खेल २०२४ पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ नोव्हेंबर-**

येथील श्रीशा स्केटिंग क्लबच्या कोच सौ. प्रियांका जितेश येडलवार यांना स्केटिंग या क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी महाराष्ट्र खेळ पुरस्कार समितीच्यावतीने देण्यात येणारा महाराष्ट्र खेल पुरस्कार २०२४ अंतर्गत उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार समाजसेविका सुवर्णाताई जाधव यांच्या हस्ते देण्यात आला.

यावेळी समितीचे अध्यक्ष राजकुमार बागडी, महासचिव विशाल जाधव, पॅराओलंपिक खेळाडू पूजा ओझा, उपाध्यक्ष दिनेश मोरे, खजिनदार नम्रता जाधव इत्यादी मान्यवर उपस्थित होते. ग्रीन पॅराडाईज रिसॉर्ट विरार मुंबई येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला.

तसेच श्रीशा स्केटिंग क्लबच्या सात खेळाडूंचाही महाराष्ट्र खेल पुरस्कार २०२४ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये दिग्विजय धाकपाडे, कृष्णा ढाळे, हर्ष बेणारे, सर्वेश उदबाळे, अर्णव कुलकर्णी, शिवराज साळुंखे व वेद सिंदोल यांचा समावेश आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल कोच सौ. प्रियांका येडलवार व सर्व खेळाडूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अक्कलकोट मतदारसंघाच्या विजयाचे गूढ कायम

**भाजपा की काँग्रेस चर्चेला उधाण**







**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ नोव्हेंबर-**

२५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात भाजपाचे सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी विजयी होणार की माजी गृहराज्य मंत्री सिध्दाराम म्हेत्रे मतदारसंघात पुनश्च राजकीय वर्चस्व सिद्ध करणार या चर्चेला मोठे उधाण आले आहे.

रेल्वे प्रवासात, बसमध्ये, शेजारील कर्नाटक राज्यात, परगावी हॉटेलमध्ये, धाब्यावर, चहा टपरी, पान टपरी, बाजारात, शेतामध्ये, मंदिरात, मश्जिदमध्ये एकच चर्चेला उधाण आले आहे. ही चर्चा २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीनंतर थांबणार आहे. २०२४ विधानसभा निवडणूक भाजपाचे सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांना अत्यंत प्रतिष्ठेची तर माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना अस्तित्वाची लढाई ठरली आहे. २५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात अत्यंत चुरशीने शांततेत ३९० मतदान केंद्रांवर सरासरी ६६.४७ टक्के मतदान झाले. विकासकामांच्या जोरावार कल्याणशेट्टींच्या बाजूने झुकलेली विधानसभा निवडणूक भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, युवा नेते रमेश पाटील, जि. प. माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील यांनी काँग्रेसचे उमेदवार सिध्दाराम म्हेत्रेंचा प्रचार केल्याने तडवळ भागासह संपूर्ण मतदारसंघ प्रभावित करतील का? याबद्दल गूढ कायम आहे.

काँग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या सहकार्याने भाजपाचे सोलापूर पूर्व जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या मतदारसंघातील वर्चस्वाला शह देण्यात यशस्वी होतील का? भाजपाचे मतदार आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या बाजूने भक्कमपणे उभे राहतील का? याचे उत्तर मतपेटीत बंद आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीनंतर याचे उत्तर मिळणार आहे. यामुळे अत्यंत गूढ असलेल्या या घटनेकडे अक्कलकोट मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्याचे नव्हे तर राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### ▸ निवडणूक लढविलेले उमेदवार

भाजपा महायुतीचे सचिन कल्याणशेट्टी, महाविकास आघाडीचे काँग्रेसचे सिद्धाराम म्हेत्रे यांच्यात अत्यंत चुरशीची निवडणूक झाली. याबरोबरच मनसेचे मल्लिनाथ पाटील, राष्ट्रीय समाज पक्षाचे सुनिल बंडगर, वंचित बहुजन आघाडीचे संतोषकुमार इंगळे, बहुजन समाज पार्टीचे इकरार शेख, प्रहार जनशक्ती पार्टीचे जमीर शेख, अपक्ष पूजा पाटील, प्रसाद बाबानगरे, शिवनिंगप्पा वंगे, सिद्धाराम कोळी, ज्ञानोबा साळुंखे हे १२ उमेदवार विधानसभाकरिता भाग्य आजमावित आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांची जाहीर सभा, समाज बांधवांना दिलेला कानमंत्र यामुळे सुनिल बंडगर यांची शिट्टी जोरात वाजली तर कुणाच्या मताधिक्क्यावर किती परिणाम होणार? हे पहावे लागेल. वंचित बहुजन आघाडीनेदेखील यंदा अर्थपूर्ण तगडा उमेदवार संतोषकुमार इंगळे यांना रणांगणात उतरविल्याने मत विभागणीचा प्रभाव भाजपा, काँग्रेस उमेदवाराच्या मताधिक्क्यावर होईल का? याचे उत्तरही मतमोजणीनंतर मिळणार आहे. भाजपा उमेदवार विजयी होणार की काँग्रेसचे उमेदवार विजयी होणार याबद्दल मोठा सस्पेन्स, मोठे गूढ कायम आहे.

### ▸ भाजपाच्या माजी आमदारांचा फायदा काँग्रेसला होणार?

भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील समर्थकांचा तडवळ भागात वरचष्मा असला तरी ते संपूर्ण मतदारसंघात माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या काँग्रेस प्रचाराने भाजपाच्या मताधिक्यावर परिणाम होईल का? राजकीय पुढाऱ्यांच्या सोयीच्या राजकारणाचा मतदारांवर प्रभाव पडणार का? मतदार या घटनेला काँग्रेसचे उमेदवार सिद्धाराम म्हेत्रे यांना मताधिक्य देऊन उत्तर देणार की भाजपाचे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांना मताधिक्य देऊन उत्तर देणार याचे उत्तर मतमोजणीनंतर उमेदवाराच्या मताधिक्यवरच स्पष्ट होणार आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मतमोजणी केंद्राच्या परिसरात पोलिसांचा मनाई आदेश लागू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी, २३ नोव्हेंबर रोजी होणार असून मतमोजणी केंद्राच्या परिसरात पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मनाई आदेश लागू केला आहे.

१५ ऑक्टोबर पासून निवडणुक आयोगाने राज्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू केलेली आहे. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सोलापूर शहरातील तीनही मतदारसंघाची मतमोजणी प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे. सोलापूर शहर उत्तर मतदारसंघाची मतमोजणी केगाव येथील एन बी नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग याठिकाणी, सोलापूर शहर मध्य मतदारसंघाची मतमोजणी डफरीन चौकाजवळील हरिभाई देवकरण प्रशालेच्या नुतन मराठी विद्यालयात आणि सोलापूर दक्षिण मतदारसंघाची मतमोजणी ही सोरेगाव येथील राज्य राखीव पोलिस बल गट क्र. १० मधील बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. या तीनही विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणी ठिकाणाच्या परिसरात व त्यालगतच्या १०० मीटर परिसरात पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मनाई आदेश लागू केलेले आहेत.

मतमोजणी इमारतीच्या आत मोबाईल घेऊन जाण्यास बंदी, तंबाखूजन्य पदार्थ तसेच ज्वालाग्रही पदार्थ नेण्यास बंदी, निवडणुक आयोगाने दिलेल्या ओळखपत्राशिवाय कुणालाही प्रवेश मिळणार नाही, शस्त्र बाळगण्यास बंदी आदी आदेश देण्यात आलेले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे.



# अक्कलकोटमधून स्वामींच्या पालखी परिक्रमेला सुरुवात

## स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा भक्तिभाव; गोवा, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळमधील भाविकांना होणार स्वामी समर्थांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ नोव्हेंबर-**

अवधूत चिंतन, श्री गुरुदेव दत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ महाराज की जय, श्री अन्नपूर्णामाता की जयच्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची पालखी परिक्रमा मोठ्या उत्साहात तीर्थक्षेत्र अक्कलकोटातून गुरुवारी प्रस्थान झाली. सदरचा प्रस्थान सोहळा न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. महाराष्ट्रासह कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळ येथील भाविकांना स्वामी समर्थांचे दर्शन होणार आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली गेल्या २७ वर्षांपासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येत आहे. यंदाचे २८ वे वर्ष आहे. या परिक्रमेचा शुभारंभ श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे पुरोहित मंदार मोहनराव पुजारी, समाधी मठाचे धनंजय पुजारी, प्रसाद कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री स्वामी समर्थ पदुकांच्या पूजनाने करण्यात आला. दरम्यान न्यासाच्या महानैवद्याबरोबर अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांनी श्रींच्या पादुकांसह श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात महानैवद्य पूजा केली. याप्रसंगी श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे उपस्थित होते.

सदरच्या पालखी पूजेनंतर न्यासाच्या परिसरात असलेल्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर व श्री भवानी माता मंदिर येथे पालखी पूजन करून, अन्नछात्रातून राजेफत्तेसिंह चौक, सर्जेराव जाधव पथ, सोन्यामारुती चौक, वीर सावरकर चौक, मेन रोड, कारंजा चौक, बुधवार पेठेतील समाधी मठ येथे आरती, श्री मल्लिकार्जुन मंदिर, शिवाजी महाराज चौक (बसस्थानक) येथील श्री खंडोबा मंदिरातील आरतीनंतर सोलापूरकडे पालखी मार्गस्थ झाली. २१ नोव्हेंबर रोजी मंगळवेढा तालुक्यातील सोहाळे येथे मुक्काम असणार असून २३ नोव्हेंबर रोजी पालखी सांगली जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

या पालखी प्रस्थान कार्यक्रमास न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, खजिनदार लाला राठोड, विश्वस्त भाऊ कापसे, लक्ष्मण पाटील, डॉ. मनोहर मोरे, डॉ. विनायक बुदले, पालखी परिक्रमा मुख्य संयोजक संतोष भोसले, मनोज निकम, अरविंद शिंदे, वैभव नवले, रामदास तांबे, स्वप्निल खवळे, न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, पालखी पुरोहित संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, श्रीकांत झिपरे, मंगेश सूर्यवंशी, गणेश भोसले, पिट्टू साठे, पिंटू दोडमनी, शिवा मंगरुळे, स्वप्निल मोरे, अंकुश चौगुले, योगेश पवार, अतिश पवार, अण्णा सावंत, अनिल गवळी, गोरख माळी, किरण जाधव, श्री गुरव, रोहित पवार, योगेश कटारे, शुभम चव्हाण, ज्ञानेश्वर भोसले, विराग माणिकशेट्टी, संतोष श्रीमान, गणेश पाटील, विनायक भोसले, सिद्धेश्वर माळी, बाबू मसुती, बाळासाहेब कुलकर्णी, रमेश हळसंगी, सिद्धाराम कल्याणी, रामचंद्रराव घाडगे, अप्पा हंचाटे, लखन सुरवसे, केदार तोडकर, मैनुद्दीन कोरबू, फहीम पिरजादे, निखिल पाटील, प्रविण घाटगे, गोटू माने, प्रसाद मोरे, संजय गोंडाळ, रोहित खोबरे, सौरभ मोरे, वैभव मोरे, किरण पाटील, अमित थोरात, स्वामिनाथ बाबर, वासू कडबगावकर, अप्पू म्हेत्रे, विपुल कदम, सूरज सावंत, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर, एस. के. स्वामी, बाळासाहेब पोळ, महादेव अनगले, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, राहुल इंडे, दत्ता माने, बबुशा महिंद्रकर, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, शरदराव भोसले, शावरेप्पा माणकोजी, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, रमेश हेगडे, मल्लिनाथ कोगनुरे, सुमित कल्याणी, गोविंदराव शिंदे, शिवकुमार स्वामी, श्रीनिवास गवंडी, मल्लिकार्जुन बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, अंकुश पवार, दिनेश बंडगर, गणेश पवार, आकाश सूर्यवंशी, मुन्ना कोल्हे, बसवराज क्यार, भीमाशंकर कामशेट्टी, महेश भोसले, आकाश शिंदे, विकास पवार, श्रीशैल कुंभार, संभाजीराव पवार, बालाजी कटारे, पप्पू कोल्हे यांच्यासह भक्तगण सेवेकरी उपस्थित होते. सोलापूर येथील शंकरालिंग महिला भजन मंडळ व अक्कलकोटच्या महिला भजन मंडळाने सेवा रुजू केली.

### सात महिन्यांनी परतणार पालखी

गेल्या २७ वर्षांपासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे मुक्काम तर गोवा राज्यातील २ जिल्ह्यात पालखीचा मुक्काम असतो. याबरोबरच बृहन्मुंबई, ठाणे, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पुणे या महानगराबरोबरच सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, पुणे, रायगड, ठाणे, नाशिक धुळे, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशीम, नांदेड, अहमदनगर, धाराशिव, बीड, लातूर या जिल्ह्यातून परिक्रमा होत असून विशेष म्हणजे कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, केरळ राज्यासह गडचिरोली शहर व परदेशातून देखील मागणी होत आहे. पालखी परिक्रमेच्या अधिक माहितीसाठी मुख्य संयोजक संतोष भोसले ९८२२८१०९६६, ८५५८८५५६७५ यांना संपर्क करण्याचे आवाहन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले आहे. सदर पालखी परिक्रमा ही ७ महिने महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा राज्यातील भाविकांना दर्शन देऊन २६ जून २०२५ रोजी तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत विसावणार आहे.



### गावोगावच्या भक्तांना श्री स्वामींच्या दर्शनाची सोय

श्री सेवा : न्यासाच्या वतीने अनंतकोटी ब्रम्हांड नायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी-पादुकांचे दर्शन व सेवा संबंध महाराष्ट्रातील गावोगावा असलेल्या स्वामी भक्तांना करता यावे यासाठी श्री स्वामींच्या पालखी परिक्रमेचे आयोजन केले आहे. तसेच अन्य कारणास्तव दूरवरच्या अबाल वृद्ध, महिला स्वामी भक्तांना श्रींच्या दर्शनास्तव इच्छा असूनही स्वामींच्या मूळस्थानी अक्कलकोट येथे येता येत नाही. अशांना दर्शन देण्यासाठी व त्यांची सेवा घेण्यासाठी श्री स्वामीच त्यांच्या गावी येत आहेत.

---

## वेगळ्या वाटा...



## करंजे-भालेवाडी शाळेत संगणक कक्षाची निर्मिती

### लोकसहभागातून हातभार; विद्यार्थी बनणार हायटेक

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२१ नोव्हेंबर-**

करमाळा तालुक्यातील करंजे-भालेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत माजी विद्यार्थी व गावातील होतकरू कार्यकर्ते यांच्या लोक सहभाग संकल्पनेतून संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली. हभप श्री नामदेव वासकर,व साकतकर महाराज यांच्या हस्ते फीत कापून संगणक कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले.

शाळेच्या स्वतंत्र दालनात दहा पैकी पाच संगणक संच स्थापित करण्यात आले. मुख्याध्यापक श्री लक्ष्मण लष्कर गुरूजी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.देणगीदार एलबीआर कन्स्ट्रक्शनचे संचालक राजकुमार पवार, डॉ. रविकिरण पवार, पवार जनरल हॉस्पिटल, करमाळा, पुणे व्यापारी संघाचे महासचिव व इंटेरियर डेकोरेटर्स श्री. दत्ताभाऊ लक्ष्मण जाधव, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

हभप नामदेव महाराज म्हणाले की, ज्याची संगणकावर कमांड, त्यालाच जगामध्ये डिमांड, सांगून,प्रासंगिक विचार मांडले. डॉ रविकिरण पवार यांनी अशा उपक्रमांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शाळेसाठी संगणक उपलब्ध करून दिल्याबद्दल शिवशक्ती इरिगेटर्सचे शिवाजी सरडे, राजकुमार पवार, डॉ. रविकिरण पवार, लोकसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ईगल ग्रुपचे रामभाऊ पवार, प्रसिद्ध भूलतज्ज्ञ डॉ. गोरख रोकडे यांचे वडील मच्छिंद्र रोकडे यांचा सन्मान करण्यात आला. पोपट डोलारे, ॲमरॉन बॅटरी इन्व्हर्टर, तसेच प्रिंटर उपलब्ध करून दिल्याबद्दल सरपंच काकासाहेब सरडे व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गणेश सरडे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महात्मा गांधी विद्यालय करमाळा, येथील प्राध्यापक शरद जाधव यांनी घेतली. ई लर्निंग जगभरात किती मोठ्या प्रमाणात प्रगती करीत आहे याची माहिती दिली. शाळेत आणखी प्रशिक्षक उपलब्ध करून देईल असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व भारतीय रिझर्व बँकेचे श्री. पोपट डोलारे, यांनी आपल्या विचारातून संगणकाची महती व स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यासिका असावी असे विचार मांडले. तसेच करंजे-भालेवाडी गावात अध्यात्म व सायन्स हातात हात घालून वाटचाल करीत आहे असे सांगितले व विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्टर देण्याचे मान्य केले. या कार्यक्रमासाठी सरपंच सुभाष सरडे, उपसरपंच पप्पू सरडे, पोपट सरडे, गणेश घाडगे, नगरविकास विभाग, मंत्रालय, प्रा. डॉ. तानाजी जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीकरण्याकामी शिक्षिका विद्या जाधव, माजी विद्यार्थी मुकेश ठोसर, भिवा आरणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सहशिक्षक शिवलाल शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## थंडीमुळे सावळ्या विठोबा, रखुमाईस शाल, रझई, कानपट्टीचा पोशाख

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीच्या श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेचा थाटच काहीसा न्हारा आहे. कारण ज्या त्या ऋतुमानाप्रमाणे सावळ्या विठ्ठल आणि रखुमाईला वेगवेगळे कपडे परिधान करण्याची परंपरा आहे. एवढेच नव्हे तर ऋतुमानाप्रमाणे त्यांच्या खानपानाचीदेखील व्यवस्था असून ज्या त्या ऋतुमानाला योग्य होईल असे पदार्थ नैवेद्यामध्ये त्यांना दाखविले जात असतात. त्यामुळे गरिबांचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठ्ठलाचा खरोखरच थाट खूप मोठा आहे.

सध्या थंडीचा मौसम सुरु असल्यामुळे पहाटेच्या थंडीत विठुरायाला उबदार कपड्यांचा पोषाख करण्यात येत आहे. दोन हात करवती काठाच्या उपरण्याची



कानपट्टी बांधून उबदार शाल पांघरण्यात येत आहे, तर रात्री शेजारतीनंतर रझई पांघरण्यात येत आहे. त्यामुळे थंडीच्या उबदार वातावरणात राजस सुकुमार असलेल्या सावळ्या विठुरायाचे रुप अधिकच लोभस असे भासत आहे. यंदा परतीचा पाऊस खूपच लांबल्याने थंडीची चाहूल थोडी उशिरानेच सुरू झाली. नोव्हेंबरच्या शेवटच्या पंधरवड्यात थंडी पडायला सुरुवात झाली. सावळ्या विठोबा-रखुमाईस प्रक्षाळपूजेपासून म्हणजे बुधवारी २० नोव्हेंबरपासून दररोज रात्री तसेच पहाटे उबदार कपड्यांचा पोषाख करण्यात येत आहे.

पहाटेच्या नित्यपूजा वेळीच देवाला दोन हात करवती काठाच्या उपरण्याची कानपट्टी बांधून उबदार शाल पांघरण्यात येत आहे, तर रात्री शेजारती नंतर रझई पांघरण्यात येत आहे. रुक्मिणी मातेलाही उबदार शाल पांघरण्यात येत आहे. हा पोशाख थंडी संपेपर्यंत राहणार आहे अशी माहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक तथा नायब तहसीलदार मनोज श्रोत्री यांनी दिली.

### उन्हाळ्यात देखील पांढऱ्या रंगाचा पोशाख

थंडीप्रमाणेच उन्हाळ्यातदेखील विठुरायाचा पोशाख वेगळा असतो. पांढऱ्या शुभ्र रंगाचा संपूर्ण पोशाख उन्हाळ्यात त्यांना परिधान करण्यात येत असतो. खानपानाच्या बाबतीतदेखील विठ्ठल-रुखुमाईची विशेष काळजी घेतली जाते. ज्या त्या ऋतुमानाप्रमाणे योग्य त्या पदार्थाचा समावेश असलेला नैवेद्य त्यांना दाखविण्यात येत असतो. विठ्ठलास उन्हाळ्याचा त्रास जाणवू नये त्याला शितलता मिळावी म्हणून दररोज दुपारी चंदनउटीनंतर लिंबू सरबत तसेच शिरा किंवा पोह्यांचा नैवेद्य दाखविण्यात येत असतो. काही वेळेस कैरीचे पन्हे आणि डाळीचा देखील नैवेद्य दाखविला जातो. याबरोबरच ऋतुमानाप्रमाणे उन्हाळ्यात आंब्याचा रस, बासुंदी, श्रीखंड आदी वेगवेगळ्या पदार्थांची नैवेद्यामध्ये रेलचेल असते.

---

## पिलीव परिसरात शांततेच्या वातावरणात ६७ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ नोव्हेंबर-**

माळशिरस विधानसभा मतदारसंघात पिलीव परिसरात अतिशय शांततेच्या मार्गाने मतदान सुरळीत पार पडले.

यामध्ये भाजपाचे आ. रामभाऊ सातपुतेंविरुद्ध राष्ट्रवादीचे उत्तमराव जानकर यांच्यातच मुख्य लढत झाली असून इतर १२ उमेदवारांचे भवितव्य इव्हीएम मशिनमध्ये बंद झाले आहे. पिलीव परिसरात किरकोळ वादाचे प्रसंग टाळता सर्व मतदान शांततेत पार पडले. सुरुवातीला एकतर्फी वाटणारी निवडणूक शेवटच्या टप्प्यात चांगलीच रंगतदार झाली. यामध्ये पिलीव येथे ७६९८ पैकी ५१०१ एवढे मतदान होऊन टक्केवारी ६६.५९एवढे झाले आहे.

सुळेवाडी येथे २८७० पैकी १७२९ पोलिंग झाले. यामध्ये ६० टक्के एवढे मतदान झाले. काळमवाडी येथे १४३९ पैकी १०९२ एवढे म्हणजे ७५ टक्के मतदान झाले. झिंजेवस्ती २२१० पैकी १७६७ मतदान होत ८० टक्के मतदान झाले. बचेरी येथे २३१५ पैकी १७४५ पोल टक्केवारी ७५ टक्के, शिंगोर्णी २५०६ पैकी १७०५, ६८ टक्के, कुसमोड १९६७ पैकी १४३३ पोलिंग होऊन ७२.८५ टक्के, चांदापुरी येथे ७७ टक्के तर कोळेगाव येथे ७० टक्के मतदान झाले.

एकूण पिलीव परिसरात मोहिते-पाटील गट व जानकर गट हे लोकसभेपासून एकत्र आल्याचा परिणाम या विधानसभा निवडणुकीत दिसून आला.

---

# विठ्ठल कारखान्याकडे ४० हजार एकर उसाची नोंद

## कार्यकारी संचालक रविंद्र पाटील : ४३ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ नोव्हेंबर-**

तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ गळीत हंगामाचा ४३ वा गळीत हंगाम शुभारंभ गुरुवारी (ता.२१) श्री संत माणकोजी महाराजांचे वंशज, श्री क्षेत्र पंढरपूर येथील हभप किरण महाराज बोधले महाराज यांच्या हस्ते, डीव्हीपी उद्योग समुहाचे कार्यकारी संचालक अमर पाटील, स्वेरी कॉलेज संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे व कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलताताई रोंगे यांच्या उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

या कार्यक्रमाप्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक रविंद्र पाटील हे प्रास्ताविकपर भाषणात बोलताना म्हणाले की, या गळीत हंगामात कारखान्याकडे ४०,१४५ एकर उसाची नोंद झालेली असून त्यामधून १२.१० लाख मे. टन उसाचे गाळप होईल. ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांच्या उसाचे वेळेत गाळप होण्यासाठी कारखान्याने पुरेशी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा उभी केलेली आहे. या प्रसंगी बोलताना कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के म्हणाले की, आपल्या कारखान्यास कै. औदुंबर अण्णा पाटील यांना अभिप्रेत असलेला चेअरमन मिळालेला असल्यामुळे अभिजीत आबा पाटील यांच्या नेतृत्वात या कारखान्यास गतवैभव प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी बोलताना स्वेरी कॉलेजचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे म्हणाले की, कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांचे नेतृत्वात गत दोन गळीत हंगाम उत्कृष्टपणे चालविले असून उच्चांकी दर दिलेला आहे. या कारखान्याच्या स्थापित गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर करुन जास्तीत जास्त गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. हा गळीत हंगाम ही यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सभासद व ऊस उत्पादक शेतकरी यांनी आपला संपूर्ण ऊस आपले श्री विठ्ठल कारखान्यास द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री विठ्ठल प्रशालेचे प्रा.चव्हाण यांनी केले व कारखान्याचे तज्ज्ञ संचालक सचिन पाटील यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी कारखान्याचे संचालक संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाने नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सीताराम गवळी, अशोक जाधव, सिद्धेश्वर बंडगर, कलावती खटके, सविता रणदिवे, तज्ज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, निमंत्रीत संचालक धनाजी खरात, तानाजी बागल, उमेश मोरे, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, गणेश ननवरे, समाधान गाजरे व कारखान्याचे जनरल मॅनेंजर डी. आर.गायकवाड तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद, कंत्राटदार, व्यापारी व हितचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते.



### कारखाना प्रगतीपथावर जाणार

श्री विठ्ठल कारखान्यामागे फार मोठी आध्यात्मिक शक्ती असून श्री विठ्ठल कारखान्याला अनेक साधू-संताचे आशीर्वाद लाभले आहेत. कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील हे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशिल असून त्यांचे मार्गदर्शनाखाली कारखाना निश्चित प्रगतीपथावर राहील, असे याप्रसंगी ह.भ.प. किरण बोधले महाराज म्हणाले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गोवंशीय जनावरांची वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**
गोवंशीय जनावरांची निर्दयीपणे कोंबून वाहतुक करणाऱ्या दोन व्यक्तीवर तामलवाडी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणात १० गायी आणि ७ वासरांची सुटका करण्यात आली आहे. ही करवाई बुधवारी सायंकाळी ७ च्या सुमारास केली. यात एक आयशर टेम्पो जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तामलवाडी येथील टोल नाक्याजवळ आयशर टेम्पो (क्र. एमएच १२/आर एन ६००८) मध्ये काळ्या-पांढऱ्या रंगाच्या १० जर्शी गायी, आयशार टेम्पो गाडी (क्र. एमएच १४ /जीडी १८४८) मध्ये काळ्या पांढऱ्या रंगाची ७ जर्शी वासरे दाटीवाटीने कोंबून निर्दयतेने जनावरांची वाहतूक सुरु होती. तसेच त्या जनावराबाबत कसलीही सुरक्षीततेची खबरदारी न घेता दोरीने आवळून बांधण्यात आले होते. तसेच ती जनावरे कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतुक करीत असताना तामलवाडी पोलिस पथकास आढळून आले. यावरून आरोपी शिवशंकर शेषराव बिराजदार (वय ५०, रा. शंभो उंबरगा ता. उदगीर जि. लातुर), केशव दत्तात्रय राजे (वय ४०, रा. सय्यदपुर ता. देवणी जि. लातुर) यांनी दि.२० नोव्हेंबर रोजी पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तीविरुध्द प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंद कायदा कलम ११ (१) (के) ५ (ब) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम कलम ८३,१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### इटकळ येथे विधानसभेचे मतदान शांततेत; होता चोख पोलीस बंदोबस्त

**इटकळ, दि.२१ नोव्हेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे दोन्ही बूथ वर बुधवार दि.२० नोव्हेंबर रोजी विधानसभेचे मतदान अगदी शांततेत पार पडले. येथे दोन मतदान केंद्र होते. मतदान केंद्र ३२० मध्ये एकूण मतदान १०१५ पैकी ७२१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये पुरुष ३६९ महिला ३५२ व मतदान क्र.३२१ मध्ये एकूण मतदान ७३७ मतदारांनी मतदान केले. यामध्ये पुरुष ३५५ व महिला ३८२ असे एकूण मतदान १९९८ पैकी १४४८ मतदारांनी मतदान केले. सरासरी ७२.९७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान करण्यासाठी महिला व पुरुषांनी रांगेत थांबून व सर्व नियमांचे पालन करीत मतदान केले. मतदान शांततेत व सुव्यवस्थित पार पडावे कसलाच अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस कर्मचारी व पोलीस पाटील विनोद सलगरे यांनी चोख बंदोबस्त ठेवलेला होता. नळदुर्ग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी ही येथील मतदान केंद्रात भेट दिली.

### मतमोजणी निरीक्षक श्रीरामप्रसाद चौहान यांची नियुक्ती

**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**
२० नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २४१-तुळजापूर विधानसभा मतदारसंघात शांततेत मतदान झाले. २३ नोव्हेंबर रोजी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्पोर्ट हॉल येथे सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने मतमोजणी निरीक्षक म्हणून रामप्रसाद चौहान यांची नियुक्ती केली आहे. निवडणूक प्रक्रिया अथवा मतमोजणीच्या बाबतीत कोणास काही तक्रार असल्यास मतमोजणी निरीक्षक चौहान यांना भेटण्यासाठी शासकीय विश्रामगृह तुळजापूर येथे २२ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजता आणि दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजताच्या कालावधी उपलब्ध राहणार आहे.



### वागदरीत ६३ टक्के मतदान शांततेत

**जळकोट, दि.२१ नोव्हेंबर -**
तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील ३८१-वागदरी केंद्रात (ता.तुळजापूर) ६३ टक्के मतदान झाले. मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत पार पडली. २० नोव्हेंबर रोजी तुळजापूर तालुक्यातील बुथ क्रमांक ३८१ वागदरी येथे सकाळी ठिक ७ वा. मतदानाला सुरुवात करण्यात आली. सकाळी ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान जवळपास दिड ते दोनशे मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून शेतीच्या आपापल्या कामाला गेल्याचे दिसून आले. या मतदार केंद्रावर महिला मोठ्या प्रमाणात उस्फुर्तपणे मतदानाचा हक्क बजावताना दिसून आल्या. मतदान केंद्रावर एकूण मतदारांची संख्या १०१६ असून त्यापैकी एकूण ६४२ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये ३१५ पुरूष मतदारांनी तर ३२७ महिला मतदारांनी मतदान केले. या केंद्रात ६३ टक्के मतदान झाले. शेवटपर्यंत मतदान शांततेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

### ट्रक्टरच्या धडकेत एक मयत

**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**
आरोपी गणपत गाटे यांनी आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर निष्काळजीपणाचे चालवून इसलाम इकबाल सौदागर (वय ७३, रा.धोत्री, ता.तुळजापूर) यांना धडक देवून गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. याप्रकरणी नवान महम्मद शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून तामलवाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलिस करीत आहेत.

### ‘लोकशाही’चा उत्सव धाराशिव जिल्ह्यात शांततेत साजरा...

# १४ लाख ४ हजार १५ मतदारांपैकी ९ लाख २१ हजार २८० मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**जिल्ह्यातील मतदानाचा टक्का घरसला... सर्वात कमी मतदान उमरगा-लोहारा मतदारसंघात... सर्वाधिक मतदान भूम-परंडा-वाशी मतदारसंघात...**

**विजयीचा मार्ग सुकर...**



कैलास पाटील राणादादा पाटील

**डेंजर झोनमध्ये...**



तानाजीराव सावंत ज्ञानराज चौगुले


**तभा वृत्तसेवा / विपिन वीर**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**
धाराशिव जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांत २० नोव्हेंबर रोजी शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. मतदानाच्या दिवशी जिल्ह्यात प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे अनुचित प्रकाराला आळा बसला. विधानसभेच्या चार मतदारसंघात एकूण १४ लाख ४ हजार १५ मतदारांपैकी ९ लाख २१ हजार २८० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यात झालेल्या मतदानाची टक्केवारी गुरूवारी स्पष्ट झाली. जिल्ह्यात ६५.६१ टक्के मतदान झाले आहे.

लिंगनिहाय मतदान जिल्ह्यातील १४ लाख ४ हजार १५ मतदारांमध्ये ७ लाख ३८ हजार ६२८ पुरुष, ६ लाख ६५ हजार ३४५ महिला आणि ३ ९ इतर मतदारांचा समावेश आहे. पैकी ४ लाख ८९ हजार १२२ पुरुष, ४ लाख ३२ हजार १४० महिला आणि १८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत महिला मतदारांनीही उत्साहाने सहभागी होऊन आपला हक्क बजावल्याचे दिसून आले.

धाराशिव जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांत मतदानाच्या टक्केवारीत चढ- उतार दिसून आला. **उमरगा-लोहारा मतदारसंघ :** एकूण मतदार ३ लाख १५ हजार ३९४. झालेले मतदान १ लाख ९४ हजार ८९६. टक्केवारी: ६१.७९ टक्के (सर्वात कमी मतदान) उमरगा मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी सर्वात कमी असून येथील उमेदवारांसाठी ही बाब चिंताजनक ठरली आहे.

**तुळजापूर मतदारसंघ :** एकूण मतदार ३ लाख ८३ हजार ०७७. झालेले मतदान : २ लाख ५६ हजार ५६९ टक्केवारी ६६.९८ टक्के. तुळजापूर मतदारसंघात चांगले मतदान झाले असून येथे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. **धाराशिव-कळंब मतदारसंघ :** एकूण मतदार : ३ हजार ७४ हजार ७६८. झालेले मतदान २ लाख ३८ हजार ८४०. टक्केवारी ६३.७३ टक्के धाराशिव मतदारसंघानेही सरासरी मतदानाची पातळी गाठली आहे.

**परंडा-भूम-वाशी मतदारसंघ :** एकूण मतदार ३ लाख ३० हजार ७७६. झालेले मतदान २ लाख ३० हजार ९७५. टक्केवारी ६९.८३ टक्के. (सर्वांत जास्त मतदान) परंडा मतदारसंघात सर्वाधिक मतदानाची नोंद झाली असून इथल्या उमेदवारांसाठी हा सकारात्मक संकेत मानला जात आहे. दैनिक तरूण भारतचा निवडणूक अंदाज मतदानाच्या निकालांवर आधारित काही निवडणूक अंदाज वर्तवले जात आहेत. दैनिक तरूण भारतने दिलेल्या अंदाजानुसार मतदारसंघवार परिस्थिती अशी आहे. धाराशिव-कळंबचे विद्यमान आमदार कैलास पाटील विजयाच्या मार्गावर आहेत. त्यांच्या कामगिरीमुळे मतदारांनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास टाकल्याचे दिसून येते. तुळजापूर मतदारसंघाचे विद्यमान आमदार



राणाजगजितसिंह पाटील यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे विद्यमान आमदार तानाजी सावंत डेंजर झोनमध्ये असल्याचे भाकीत करण्यात आले आहे. तर उमरगा-लोहारा मतदारसंघाचे विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले यांची स्थिती देखील डेंजर झोनमध्ये असल्याचे संकेत मिळत आहेत. मतमोजणी २३ नोव्हेंबरला होणार असून मतमोजणीसाठी धाराशिव जिल्ह्यात सर्व तयारी पूर्ण झाली आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडेल. मतमोजणीनंतर कोण बाजी मारणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान धाराशिव आणि तुळजापूरमधील विद्यमान आमदारांवर पुन्हा विश्वास दाखवला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. लोकशाहीचा उत्सव यशस्वी जिल्ह्यात शांततेत आणि उत्साहात पार पडलेल्या या निवडणुकीने लोकशाही बळकट करण्यास हातभार लावला आहे. आता मतमोजणीच्या निकालावरून लोकांनी दिलेला कौल स्पष्ट होईल.



**जळकोट :** येथील मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी दिवंगत स्वातंत्र्य सेनानी यांच्या सुनबाई व माजी सैनिक, माजी पोलीस भरत पाठक यांच्या मातोश्री ताराबाई पाठक (वय ८८) व दिवंगत स्वातंत्र्य सेनानी किशनराव चौधरी यांच्या पत्नी गोदावरीबाई चौधरी (वय ९८) व जेष्ठ महिला रुक्मिणीबाई कुलकर्णी (वय ९३) यांनी जळकोट येथे मतदान केंद्रावरती जाऊन मतदान केल्याबद्दल जळकोट येथील मतदारांनी त्यांचे स्वागत केले.

## परंडा विधानसभेत कोणता पैलवान होणार विजयी

**कुस्तीचा निकाल उद्या...**

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.२१ नोव्हेंबर -**
राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडले आहे. तर २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. २०२४-२५ ची विधानसभा निवडणूक ही अटीतटीची झाली आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना राज्यात पाहायला मिळाला आहे.

निवडणूक काळात उमेदवारांनी आणि सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी प्रचार सभेत एकमेकांवर आरोप प्रत्यारोपचा धोधो पाऊसच पाडला होता. गेल्या काही दिवसात प्रचाराचा धुरळा उडाला होता. अनेक उमेदवार यांच्यात तर शाब्दिक युद्ध जुंपले होते. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी मधील राजकीय कुस्तीचा चांगलाच फड रंगला होता. विधानसभा निवडणुकीची कुस्ती होऊन आता दोन दिवस होत असून फक्त काही तास निकाल येण्यास बाकी आहे. राज्यात २०१९ नंतर २०२४-२५ ची निवडणूक अतिशय चुरशीची ठरणार आहे. यात निकालावर सर्वाधिक लक्ष परंडा विधानसभेवर लागले आहे. परंडा विधानसभेत एकूण २१ उमेदवार रिंगणात उतरले होते, मात्र खरी कुस्ती शिंदे सेना महायुतीचे विद्यमान आमदार व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे पंधरा वर्षे आमदार राहिलेले माजी आमदार राहुल मोठे यांच्यात कुस्ती रंगली होती.



दरम्यान निवडणूक काळात दोन्ही उमेदवारांनी एकमेकांवर जोरदार आरोप प्रत्यारोप करत मतदारसंघात प्रचार सभांचा धुरळा उडवला होता. आता उमेदवारांचे भवितव्य २० नोव्हेंबरला मतपेटीत बंद झाले आहे. अवघे काही तास मतमोजणीला शिल्लक राहिले आहेत. मतदान झाल्यानंतर वाशी तालुक्यातील गावागावात, हॉटेल मध्ये नागरिक आणि विविध राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये चाय पे चर्चा रंगात आहेत. हा उमेदवार निवडून येणार तो उमेदवार निवडून येणार असे तर्कवितर्क लावले जात आहेत.

परंडा विधानसभेच्या कुस्तीत कोणता पैलवान विजयी होऊन कोण कोणाला अस्मान दावणार व कोण कोणाला धोबीपछाड देणार हे चित्र येत्या २३ नोव्हेंबरला स्पष्ट होईल.

## तुळजापुर विधानसभा मतदारसंघात महायुती की महाविकास आघाडी बाजी मारणार



**लाडक्या बहिणी कुणाला तरणार... तुळजापुर विधानसभा मतदार संघात पुरुषांपेक्षा महिलांचे मतदान जास्त...**

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२१ नोव्हेंबर -**
तुळजापुर विधानसभा मतदार संघात यावेळी अतिशय चुरशीची लढत झाली असल्याचे पाहावयास मिळत आहे. महायुतीचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व महाविकास आघाडीचे ॲड. धीरज पाटील यांच्यात सरळ दुरंगी लढत होत असल्याचे चित्र सुरुवातीला होते. मात्र समाजवादी पक्षाचे देवानंद रोचकरी यांनीही जोरदार मुसंडी मारत ही निवडणुक दुरंगीवरून तिरंगी केली आहे. या तिरंगी लढतीमध्ये आता कोण बाजी मारणार याचा फैसला दि.२३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर होणार आहे.

विधानसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात एकुण २३ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. यामध्ये महायुतीचे आमदार राणा जगजितसिंह पाटील, महाविकास आघाडीचे ॲड. धीरज पाटील, समाजवादी पक्षाचे देवानंद रोचकरी व वंचित बहुजन आघाडीच्या डॉ. स्नेहा सोनकाटे या प्रमुख उमेदवारांचा समावेश आहे. दि.२० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. या निवडणुकीचा निकाल दि.२३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. या निवडणुकीत महायुती सरकारला लाडकी बहीण तरणार असल्याचे दिसुन येत आहे. कारण महिला मोठ्या संख्येने मतदानासाठी घराबाहेर पडले होते.

याचा परिणाम म्हणुन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत मतांची टक्केवारी वाढली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ६४.८७ टक्के इतके मतदान झाले होते. तर यावेळी ६६.८९ टक्के मतदान झाले आहे. मागच्या निवडणुकीपेक्षा यावेळी २ टक्के मतांची वाढ झाली आहे. हा मतांचा वाढलेला टक्का कुणाला विजयी करणार हे पाहणे गरजेचे आहे.

महायुतीचे उमेदवार आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शेवटच्या टप्प्यात प्रचारात जोरदार मुसंडी मारत विरोधकांच्या मनात धडकी भरविली. त्याचबरोबर आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथे केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची झालेली विराट सभा यामुळेही या मतदार संघात महायुतीला मोठा फायदा झाला असल्याचे दिसुन येत आहे. त्याचबरोबर या निवडणुकीत समाजवादी पक्षाचे देवानंद रोचकरी तसेच वंचित बहुजन आघाडीने जोरदार प्रचार करुन निवडणुक रंग भरला होता.

देवानंद रोचकरी आणि डॉ. स्नेहा सोनकाटे हे दोन उमेदवार किती मतदान घेणार यावर या मतदार संघात महायुती विजयी होणार की महाविकास आघाडी हे ठरणार आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात कांही किरकोळ घटना वगळता मतदान शांततेत झाले आहे. लोकसभा निवडणुकीत ज्या तीव्रतेने मुस्लिम आणि मराठा मतदारांनी महायुतीला विरोध केला तो विरोध किंवा ती तीव्रता विधानसभा निवडणुकीत दिसुन आली नाही हे महायुतीच्या उमेदवारासाठी समाधानाची बाब आहे. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीत दलित समाजाचे मतदान मोठ्याप्रमाणात महाविकास आघाडीकडे गेले होते. विधानसभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघात दलितांची मते महायुती, महाविकास आघाडी, समाजवादी पक्ष व वंचित बहुजन आघाडी या पक्षांकडे ही मते विभागुण गेले असल्याचे दिसुन येत आहे.

त्यामुळे सर्व बाबींचा विचार केला तर तुळजापुर विधानसभा मतदार संघात झालेल्या अटीतटीच्या लढतीमध्ये महायुतीचे उमेदवार आ. राणाजगजितसिंह पाटील हे बाजी मारू शकतात.

## ग्रामीण भागातील घरकुलांना शहरी भागाप्रमाणे २ लाख ४० हजारांचे अनुदान द्यावे : खा. राजेनिंबाळकर

**ग्रामविकास व पंचायत राज कमिटीच्या बैठकीत महत्वपुर्ण सुचना...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ नोव्हेंबर -**
दिल्ली येथे संसदेच्या ग्रामीण विकास व पंचायतराज समितीची बैठक पार पडली. यावेळी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जलजिवन योजना व ग्रामीण भागातील पाणीपुरवठा संदर्भातील जळजळीत वास्तव ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत झालेल्या ग्रामविकास व पंचायत राज समितीच्या बैठकीसंदर्भात निदर्शनास आणुन दिले.

या बैठकीत प्रामुख्याने सविस्तर सूचना मांडल्या ग्रामीण भागात पूर्वी जलस्वराज, भारत निर्माण राष्ट्रीय पेय जल, जल जीवन मिशन अशा पाणीपुरवठ्याच्या योजना झाल्या त्या पाहता त्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होऊन देखील त्या बंद अवस्थेत केवळ थडगे उभा केल्यासारखं दिसत आहेत व या सर्व योजना भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकले असल्याने ग्रामीण भागातील जनता पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. त्यामुळे अशा पाणी पुरवठा योजनेतील विहीर व पाण्याची खात्री झाल्यानंतर उर्वरित कामे करणे अपेक्षित आहे.

मात्र अनेक वेळा पाणीपुरवठा, विहिरीच्या पाण्याची खात्री न करता उर्वरित कामे करून मोठ्या प्रमाणात शासनाच्या पैशाचा अपव्यय केला जातो. त्यामुळे यापुढे सुरुवातील विहीर चा



स्तोत्र सक्षम असेल तरच पुढील कामे हाती घ्यावीत असी सूचना आजच्या बैठकीत केली.

प्रधानमंत्री घरकुल योजनेत शहरी भागातील लाभार्थ्यासाठी २ लाख ४० हजार व ग्रामीण भागातील योजनेसाठी १ लाख २० हजार एवढी रक्कम प्रत्येक लाभार्थ्याला दिली जाते, मात्र अशी घरकुले बांधण्यासाठी आवश्यक असणारे लोखंड, सळई, सिमेंट, वाळू, खडी, मजुरी हे समान असताना अशी विषमता का? यामुळे ग्रामीण भागातील जनतेवर अन्याय होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना देखील शहरी भागातील योजनेप्रमाणे प्रति लाभार्थी २ लाख ४० हजार रुपये द्यावेत अशी सूचना या बैठकीत केली.

१५ व्या वित्त आयोगांतर्गत महाराष्ट्रासाठी निधीची तरतुद २०२० ते २०२१ साठी ५८२७ कोटी होती. २०२१ ते २०२२ साठी ४३०७ कोटी होती व २०२२ ते २०२३ साठी ३६९६ कोटी होती व २०२३ ते २०२४ साठी ३६२९ कोटी आहे.

याकडेवारी पाहता दिवसेंदिवस या १५ व्या वित्त योजना अंतर्गत महाराष्ट्रावर निधीची कमी तरतूद करून अन्याय केला जात आहे तरी तो थांबवावा व पूर्वीप्रमाणेच निधीची तरतूद कायम असावी, अशी देखील सूचना यावेळी केली.


**जाहीर नोटीस**

**परंडा येथील जिल्हा न्यायालय-१, परंडा**

**उत्तरवादीस अपीलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस**

आदेशावर व अपील

RCA No. 100/2023
(Old No.09/2022)
Rukminbai/Ramchandra

**प्रति,**

Respondent :-

**२/ब/४. उषा भ्र. बापुसाहेब गुंजाळ,**
वय २५ वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. द्वारा-बापुसाहेब आप्पाराव गुंजाळ,
हॅपटेक इंजिनीयरींग कॉलेज, पंढरपुर रोड, सांगोला ता. सांगोला जि.सोलापुर.

तुम्हास नोटीस देण्यात येते की, नियमीत दिवाणी दावा क्र. २२१/२००१ या प्रकरणातील हुकुमनाम्यावर प्रतिवादी यांनी अपील सादर केले असुन ते या न्यायालयात नोंदविण्यात आले आहे, आणि या अपीलाच्या सुनावणीसाठी **दिनांक २५/११/२०२४** रोजी हा दिवस निश्चित केला आहे.

तरी उपरोक्त दिवशी सकाळी **ठिक १०.३०** वाजता या न्यायालयात हजर रहावे. तुमच्यातर्फे तुम्ही स्वतः किंवा या अपीलात तुमच्यातर्फे काम चालविण्यास विधिद्वारे प्राधिकृत केलेली कोणीही व्यक्ती हजर झाली नाही तर तुमच्या गैरहजेरीत त्या अपीलाची सुनावणी करुन निकाल देण्यात येईल.

**आज दिनांक १८/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**स्वाक्षरित/-**
**(अधिक्षक)**
जिल्हा न्यायालय-१, परंडा
(आदेशावरून)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यात सरासरी ६९.६४ टक्के मतदान; मतमोजणीसाठी सज्जता




छत्रपती संभाजीनगर,दि.२१ – विधानसभा निवडणूक २०२४ करीता जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण ६९.६४ टक्के मतदान झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

आज आयोजित पत्रकार परिषदेस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके उपस्थित होते.

मतदान प्रक्रिया आटोपून, सर्व मतदान यंत्रे इ. सहसाहित्य स्ट्राँग रुम मध्ये जमा करण्यात आले. हे काम रात्री उशीरापर्यंत सुरु होते. यासंदर्भात आज पत्रकार परिषदेचे आयोजन करुन माध्यमांना माहिती देण्यात आली.

जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४ मध्ये) मतदान टक्केवारी याप्रमाणे–

१०४– सिल्लोड–८०.०८ टक्के, १०५– कन्नड–६९.३१ टक्के, १०६– फुलंब्री–७२.२२ टक्के, १०७–औरंगाबाद मध्य–५९.३५ टक्के, १०८–औरंगाबाद पश्चिम–६०.५८ टक्के, १०९–औरंगाबाद पूर्व–६०.६३ टक्के, ११०– पैठण–७७.५३ टक्के, १११– गंगापूर–७३.७७ टक्के, ११२– वैजापूर–७५,९४ टक्के. असे एकूण सरासरी ६९.६४ टक्के मतदान झाले होते.

जिल्ह्यात एकूण १६ लाख ६३ हजार १८६ पुरुष मतदारांपैकी ११ लाख ७८ हजार ६१७ जणांनी मतदान केले. तर १५ लाख ३९ हजार ४२१ महिला मतदारांपैकी १० लाख ५१ हजार ६७७ महिलांनी मतदान केले. तर इतर मतदारांमध्ये १४४ जणांपैकी ४० जणांनी मतदान केले. एकूण ३२ लाख २ हजार ७५१ मतदारांपैकी २२ लाख ३० हजार ३३४ मतदारांनी मतदान केले. पुरुषांची मतदानाची टक्केवारी ७०.८७ तर महिलांची टक्केवारी ६८.३२ . इतर मतदारांची टक्केवारी २७.७८ टक्के होती. एकूण सरासरी टक्केवारी ६९.६४ टक्के आहे.

सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीच्या तुलनेत झालेले मतदान याप्रमाणे–

सन २०१९ मध्ये जिल्ह्यात २८ लाख ५४ हजार २८१ मतदार होते. त्यात १५ लाख ५ हजार २७६ पुरुष, १३ लाख ४८ हजार ९७९ महिला व २६ इतर मतदार होते. त्यावेळी यापैकी १० लाख २४ हजार ६७२ पुरुष, ८ लाख ४९ हजार ७०८ महिला व इतर ५ असे एकूण १८ लाख ७४ हजार ३८५ जणांनी मतदान केले होते. एकूण टक्केवारी ६५.६७ होती.

**सन २०१९ मध्ये मतदार संघनिहाय झालेले मतदान याप्रमाणे–**

१०४– सिल्लोड– २,३६,७३६– ७४.८३ टक्के, १०५–कन्नड– २,१४,४००– ६८.२५ टक्के., १०६–फुलंब्री– २,२७,१६४– ६९.६८ टक्के., १०७–औरंगाबाद मध्य– १,९२,८०५– ५९.१९ टक्के., १०८–औरंगाबाद पश्चिम–१,९८,१८२– ५९ टक्के, १०९–औरंगाबाद पूर्व– १,९४,३८१– ६०.९ टक्के., ११०–पैठण– २,१२,४९५– ७२.३ टक्के., १११–गंगापूर– २,०२,७५२– ६४.७२ टक्के., ११२–वैजापूर– १,९५,४७०– ६३.१ टक्के.,

**विधानसभा मतदारसंघनिहाय (सन २०२४)मतदानाची 'महिला,पुरुष व इतर' निहाय विगतवारी–**

१०४– सिल्लोड–पुरुष–१,५०,५८५,महिला–१,३६०९५,इतर–२, एकूण मतदान– २,८६,६८२., १०५– कन्नड–पुरुष–१,२२,५१९,महिला–१,०८,०९९,इतर–४,एकूण मतदान– २,३०,६२२, १०६–फुलंब्री–पुरुष–१,४१,५२८,महिला–१,२६,१७६,इतर–२,एकूण मतदान– २,६७,७०६., १०७– औरंगाबाद मध्य–पुरुष–१,१४,९८३,महिला–१,०३,९७८,इतर–५,एकूण मतदान– २,१८,९६६., १०८– औरंगाबाद पश्चिम–पुरुष–१,३०,०१७,महिला–१,१६,६०६,इतर–१५,एकूण मतदान– २,४६,६३८., १०९– औरंगाबाद पूर्व–पुरुष–१,१४,१०४,महिला–१,००,९२१,इतर–४,एकूण मतदान– २,१५,०२९., ११०– पैठण–पुरुष–१,३३,९६४,महिला–१,१८,२७३,इतर–०,एकूण मतदान– २,५२,२३७., १११–गंगापूर–पुरुष–१,४१,७३०,महिला–१,२७,३३७,इतर–८,एकूण मतदान– २,६९,०७५., ११२–वैजापूर–पुरुष–१,२९,१८७,महिला–१,१४,१९२,इतर–०,एकूण मतदान– २,४३,३७९.,

मतदान केंद्रावरील आरोग्य सेवेचा ९४७९ जणांना लाभ

प्रत्येक मतदान केंद्रस्थळी आरोग्य सेवांसाठी आरोग्य सेवा केंद्र उपलब्ध करण्यात आल्या होत्या. या सेवांचा लाभ ८३२४ मतदारांनी घेतला तर ११५५ मतदान कर्मचाऱ्यांनी अशा एकूण ९४७९ जणांनी लाभ घेतला. दरम्यान मतदान प्रक्रियेत ३४ कर्मचाऱ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. त्यापैकी ८ जणांना खाजगी रुग्णालयात तर २६ जणांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मतमोजणीसाठी सज्जता

शनिवार दि.२३ रोजी होणाऱ्या मतमोजणीसाठी प्रशासनाची सज्जता झाली आहे. आजच मतमोजणीसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सरमिसळीकरण करण्यात आले. इव्हीएमसाठी १२६ टेबल असतील , टपली मतपत्रिकांसाठी ७० टेबल असतील तर ईटीपीबीएस साठी १२ टेबल असतील, अशी माहिती देण्यात आली. ८५२ मतमोजणी कर्मचारी , २४२ सुक्ष्म निरीक्षक व ३००० पोलीस कर्मचारी असे ५७७८ मनुष्यबळ मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आले आहे. मतदारसंघ निहाय होणाऱ्या मतमोजणीच्या फेऱ्या या प्रमाणे– सिल्लोड–२९, कन्नड–२७, फुलंब्री–२७, औरंगाबाद मध्य–२३, औरंगाबाद पश्चिम –२८, औरंगाबाद पूर्व–२४, पैठण–२६, गंगापूर–२७, वैजापूर–२६.

मतमोजणी कालावधीत व मतमोजणी नंतरही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून पुरेसा पोलीस बंदोबस्त, केंद्रीय सुरक्षा बलांच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. संवेदनशील भागात गस्त, ड्रोनद्वारे, सीसीटिव्ही द्वारे गस्त वाढविण्यात आली आहे. सद्यस्थितीत ६ केंद्रीय बल गट तर २ राज्य राखीव पोलीस बल गट जिल्ह्यात तैनात आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी दिली.

## विराज प्रोफाईल्सने सुरु केली नवीन सीमलेस स्टेनलेस स्टील पाईप उत्पादन प्रक्रिया, पियर्सर मिलचे उद्घाटन

पुणे– विराज प्रोफाईल्स लिमिटेड, जो भारतातील स्टेनलेस स्टील उत्पादन क्षेत्रातील एक प्रमुख खेळाडू आहे, आपल्या उत्पादन क्षमतांमध्ये मोठा विस्तार करत आहे. कंपनीने नुकतेच महाराष्ट्रातील बोइसर येथे नवीन सीमलेस पाईप प्लांटमधील अत्याधुनिक पियर्सर मिलचे उद्घाटन केले. या नव्या प्रकल्पाद्वारे उच्च–शक्तीचे सीमलेस स्टेनलेस स्टील पाईप तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे पाऊल विराज प्रोफाईल्सच्या रणनीतिक विस्ताराचा एक भाग आहे, ज्यामुळे कंपनी सीमलेस पाईप्सच्या उच्च–गरजेच्या क्षेत्रात आपले स्थान मजबूत करेल. सीमलेस पाईप्स ही अत्यंत ताकदवान, टिकाऊ आणि गंज प्रतिरोधक असतात, जे अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये अत्यावश्यक असतात. हे पाईप्स तेल आणि गॅस, एरोस्पेस, ऊर्जा आणि बांधकाम अशा विविध उद्योगांमध्ये अत्यधिक दाब आणि ताण सहन करण्यासाठी आवश्यक असतात.

## द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्टच्या नोंदणीची तारीख ३० नोव्हेंबर

मुंबई : द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट , या राष्ट्रीय पातळीवरील ख्यातनाम एमबीए प्रवेश परीक्षेतर्फे द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट २०२५ साठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख जाहीर करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी बिझनेस मॅनेजमेंट करिअरच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील या महत्त्वाच्या वळणासाठी ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करायची आहे. ही परीक्षा ५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ ते सायं. ५.३० या वेळेत घेतली जाणार आहे.७५ वर्षांचा वारसा जपणाऱ्या द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट ने भारतभरातील मॅनेजमेंट अभ्यासक्रम इच्छुकांसाठी अत्यंत महत्त्वाची परीक्षा अशी ओळख निर्माण केली आहे. १५ जुलै २०२४ रोजी सुरू झालेल्या नोंदणी प्रक्रियेत आतापर्यंत लक्षणीय प्रतिसाद लाभला आहे. त्यामुळे एमबीए/ पीजीडीएम इच्छुकांमध्ये या परीक्षेचे महत्त्व वाढत असल्याचे अधोरेखित झाले आहे. भारतातील २५० हून अधिक बिझनेस स्कूलमधील प्रवेशासाठी द झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट हे प्रवेशद्वार आहे.

## स्नॅपड्रॅगन ८ एलीट सह फ्लॅगशिप आईकू १३ करणार लाँच

पुणे : उच्च–कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ३ डिसेंबर रोजी आईकू१३ लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके सेट करत, आईकू १३ प्रगत कॅमेरा क्षमता, आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले टेक्नॉलॉजीसह लाइटनिंग–फास्ट कार्यप्रदर्शन एकत्र करते जे वापरकर्त्यांना त्यांच्या स्मार्टफोनमधून सर्वोत्तम कामगिरी, डिझाइन आणि कार्यक्षमतेची अपेक्षा आहे त्यांना इमर्सिव्ह अनुभव प्रदान करते. आईकू १३ आतापर्यंतच्या सर्वात वेगवान प्रोसेसरवर चालते – नवीन स्नॅपड्रॅगन ८ एलिट, ज्याने ३ दशलक्षपेक्षा जास्त प्रभावी अंतुतु स्कोअर प्राप्त केला आहे. या पॉवरहाऊसला अतुलनीय गेमिंग अनुभवासाठी २के (पीसीग्रेड) गेम सुपर रिझोल्यूशन आणि १४४ एफपीएस गेम फ्रेम इंटरपोलेशनसह सुपरकंप्युटिंग चिप क्यू २ द्वारे समर्थित आहे. यात ७०००मिमीऑ वीसी शीतकरण प्रणाली देखील आहे, जी तापमान नियंत्रणात ठेवते.

## नगर जिल्ह्यात ७२.७४ टक्के मतदान

अ.नगर : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जिल्ह्यात ७२.७४ टक्के मतदान झाले असल्याची माहिती प्रशासनाने दिली. जिल्ह्यातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान केल्याबद्दल जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी सर्व मतदारांचे अभिनंदन केले आहे. लोकशाहीच्या या उत्सवात मतदारांचा सहभाग कौतुकास्पद आहे. लोकशाही बळकट करून जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी हा सहभाग महत्वाचा ठरेल असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे आयोजित विविध उपक्रमात सहभागी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पोलीस, शिक्षण आणि शासनाचे विविध विभाग, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्यांचे सहकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक – शैक्षणिक संस्था, नागरिक यांनादेखील जिल्हाधिकाऱ्यांनी धन्यवाद दिले आहेत. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून जिल्ह्याने ७२.७४ टक्के मतदान शक्य झाले असे श्री. सालीमठ यांनी म्हटले आहे.

## मयूरी साहाने महान संगीतकार ए. आर. रहमान यांना प्रभावित केले



छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन वरील इंडियन आयडॉल १५ मधल्या टॉप १५ स्पर्धकांनी बादशाह, श्रेया घोषाल आणि विशाल ददलानी या तिन्ही परीक्षकांना आपल्या अप्रतिम परफॉर्मन्सेसने प्रभावित केले आहे. या स्पर्धकांपैकी एक आहे, टॉलीगंज, कोलकाताहून आलेली 'आयडॉल की क्लासिक क्वीन' मयूरी साहा. मयूरीने महान संगीतकार ए. आर. रहमानचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने मयूरीने गायलेले त्याचे गाणे पोस्ट करून इन्स्टाग्रामवर तिला फॉलो केले आहे. या कौतुकामुळे आनंदित झालेली मयूरी साहा म्हणते, मी लहान असल्यापासून ए. आर. रहमान सरांना आदर्श मानले आहे आणि आता सोशल मीडियावर ते मला फॉलो करत आहेत, हे माझ्या कल्पनेच्या पलीकडचे आहे. हे स्वप्न साकार होण्यासारखे आहे आणि माझ्या परिश्रमाला मिळालेली पावती आहे. ऑडिशनपासून मयूरीचे वेगळेपण ठळकपणे जाणवणारे होते. श्रेया घोषालचा प्लॅटिनम माइक तिला मिळाला होता. आमी जे तोमार ३.० चे क्लासिकल बीटबॉक्स फ्यूजन गाऊन तिने सगळ्यांना मंत्रमुग्ध केले होते. तिचा हा प्रवास देशातील संगीत रसिकांना प्रेरणा देणारा आहे. बघत रहा, इंडियन आयडॉल १५ दर शनिवारी आणि रविवारी रात्री ९:०० वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर!

## केबीसी मध्ये ७ करोडविषयी अभिषेक बच्चनने केलेल्या विनोदाने सगळ्यांना खूप हसवले!

छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील 'कौन बनेगा करोडपती १६' चा एक हास्यविनोदाने आणि हृदयस्पर्शी क्षणांनी भरलेला एपिसोड बघण्यास सज्ज व्हा. सूत्रसंचालनाची धुरा अमिताभ बच्चन यांच्या हातात असलेल्या या कार्यक्रमाच्या शुक्रवारच्या भागात आकर्षक अभिषेक बच्चन, गुणी दिग्दर्शक शूजित सरकार आणि प्रसिद्ध लेखक अर्जुन सेन आपल्या 'आय वॉन्ट टू टॉक' या विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या आगामी चित्रपटाच्या प्रचारासाठी येणार आहेत.अभिषेक नेहमीप्रमाणे आपल्या खास विनोदी शैलीने आणि ऊर्जेने आपली उपस्थिती जाणवून देईल. हा भाग हलकेफुलके क्षण आणि हृदयस्पर्शी संभाषणाने भरलेला असणार आहे. यात बिग बी आणि ज्युनियर बच्चन यांच्यातील खेळीमेळीचे नाते दिसेल. तर मग तयार व्हा मनोरंजन, चातुर्य आणि आत्मियतेने भरलेल्या या रजनीसाठी! आपण ७ करोड रुपये जिंकलो तर ती बक्षीसाची रक्कम कुठे जाईल याचा तपशील अभिषेक बच्चन देऊ लागला आणि हास्याची कारंजी फुटू लागली. अर्जुन सेन यांनी सांगितले की ते एअर फोर्स वाईव्ज वेलफेअर असोसिएशनसाठी खेळतील आणि शूजित सरकार यांनी मनाली स्ट्रेज या भटक्या कुत्र्यांना मदत करणाऱ्या छत्रछ्ज ला मदत करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. अभिषेक हलक्या–फुलक्या शैलीत म्हणाला, मी कौन बनेगा करोडपती रॅप पार्टी फंडसाठी खेळेन!

## २०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटींवर; हवामान बदल मोठे आव्हान

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : २०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या ३५ कोटी होईल, मात्र त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हवामान बदलामुळे गंभीर आव्हान ठरणार आहे, असे युनिसेफच्या ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सध्या भारतात ४४ कोटींहून अधिक लहान मुले आहेत, परंतु लोकसंख्या घट होऊन ही संख्या १० कोटींनी कमी होईल. अहवालानुसार, हवामान बदल, पर्यावरणीय संकटे आणि तंत्रज्ञानाचे बदल हे मुलांच्या जीवनावर मोठा परिणाम करतील. विशेषतः उष्णतेच्या लाटांमुळे २००० सालाच्या तुलनेत २०५० पर्यंत आठपट जास्त मुलांना याचा तडाखा बसण्याची शक्यता आहे.

हवामान बदलाचा परिणाम आणि आव्हाने

दी एनर्जी रिसर्च इन्स्टिट्यूटच्या (टीईआरआय) सुरुची भडवाल यांनी स्पष्ट केले की, हवामान बदलाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम लहान मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि जीवनशैलीवर दीर्घकालीन परिणाम करतील. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये पर्यावरणीय संकटांशी लढण्यासाठी आवश्यक संसाधनांचा अभाव असल्याने मुलांना जास्त त्रास सहन करावा लागणार आहे.

प्रगत देशांतील आणि कमी उत्पन्न देशांतील तफावत

युनिसेफच्या अहवालात नमूद केले आहे की, उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये ९५% लोक इंटरनेटशी जोडलेले आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करून हवामान संकटांची आगाऊ सूचना मिळणे शक्य आहे. मात्र, कमी उत्पन्न देशांमध्ये हे प्रमाण फक्त २६% आहे, त्यामुळे या देशांतील मुलांना अधिक धोक्यांचा सामना करावा लागेल.

भारतातील मुलांचे भविष्य आणि उपाययोजना

युनिसेफचे कार्तिक वर्मा आणि भारतातील प्रतिनिधी सिंथिया मॅकॅफ्रे यांनी सांगितले की, भारताने या बदलांना सामोरे जाण्यासाठी मुलांच्या संरक्षणासाठी योजनात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक आहे. हवामानाशी निगडित धोके ओळखून, शिक्षण, आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग वाढवणे हेच भविष्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

निष्कर्ष

२०५० पर्यंत भारतातील लहान मुलांची संख्या कमी होणार असली तरी हवामान बदल, उष्णतेच्या लाटा आणि पर्यावरणीय संकटांमुळे त्यांचे भविष्य अनिश्चित होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आणि धोरणात्मक उपाय हे या संकटांवर मात करण्याचे प्रमुख साधन ठरतील, असे या अहवालात नमूद आहे.

## विद्यार्थ्यांच्या जातीप्रमाणपत्र पडताळणीसाठी २८ नोव्हेंबरपर्यंत विशेष मोहिम

छत्रपती संभाजीनगर,दि.२१ – शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विविध राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्यासाठी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीमार्फत गुरुवार दि.२८ नोव्हेंबर पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे,असे जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव किशोर कुलकर्णी यांनी कळविले आहे.

या शिबिराचा लाभ खालील विद्यार्थी गट घेऊ शकता–

१. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, एसईबीसी यासारख्या राखीव प्रवर्गातील सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी किंवा १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश असलेले विद्यार्थी. ज्यांना १२ वी नंतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यावयाचे आहेत.

२. ज्या विद्यार्थ्यांना पदवीनंतर एम.बी.ए., एम.सीए.ए., एल.एल.बी. (तीन वर्ष), बी.एड. इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावयाचा आहे. ३. तंत्रनिकेत अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज केले आहेत व त्यांची प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी प्रलंबित आहेत.

अशा विद्यार्थ्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. ही मोहिम गुरुवार दि.२८ नोव्हेंबर पर्यंत सुरु राहणार आहे. तरी विद्यार्थी व पालकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य सचिव किशोर कुलकर्णी यांनी केले आहे.

## बालदिनाच्या कॅन्सलेशनचा कार्यक्रम हेड पोस्टात उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर : येथील जुना बाजारच्या हेड पोस्टात बाल दिनाच्या कॅन्सलेशन चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्या पोस्ट ऑफिस चे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे हे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर यांच्या हस्ते बाल दिनाच्या विशेष कॅन्सलेशनची मुद्रा पाकिटावर आणि पोस्टकार्डवर उमटवून करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून जुन्या पोस्ट ऑफिसचे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे म्हणाले आपण ज्यांच्या जयंत्या साजऱ्या करतो त्या केवळ एक दिनाचे आपण त्या व्यक्तीचे स्मरण न करता त्यांचे स्मरण प्रत्येकांनी नेहमीच करायला हवे. तर उद्घाटनपर भाषणात टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर म्हणालेचाचा नेहरुंना मुलं खूप प्रिय होती ते त्यांच्यात रममाण होत असतं. आपणं देखील मुलांचे कला गुण छंद जोपासून त्यांना अधिक वेळ द्यायला हवा आपणं असं करु शकलो तरच खऱ्या अर्थाने आपण बालदिन साजरा केला असं होईल.

बालदिनाचा हा विशेष कॅन्सलेशनचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवशंकर पटेल , हरीश नागरगोजे , राज बेरवाल, विनय चामणीकर ( एपीएम मेल ) लखन वैष्णव, संदीप पडस्वान , वाय. जे. पैठणे , रोहिणी कोरडे आणि टपाल तिकीट संग्रहाक उदय नागापूरकर यांनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमा साठी अनेक नागरिक व छोटी मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुलांना बालदिनाचा कॅन्सलेशनचा शिक्का उमटलेली विशेष पाकिटे नी पोस्ट कार्ड भेट देण्यात आली.

## आरोग्य विभागातर्फे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ – कुटुंब नियोजन ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाच्या वतीने आजपासून (दि.२१) ते बुधवार दि.४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी विषयी जनजागृती करणे, लोकांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवुन देणे, स्त्रीयांप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी ही पुरुषांची सुद्धा आहे, या विषयी माहिती देऊन समुपदेशन करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

हे अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात दि.२१ ते दि.२७ नोव्हेंबर दरम्यान लाभार्थ्यांशी संपर्क साधणे. त्यांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवून देणे व प्रवृत्त करणे, योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करणे.ज्यांनी यापुर्वी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे.अशा लाभार्थ्यांमार्फत मोहीमेचा प्रचार व प्रसार करुन माहीती देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२८ नोव्हेंबर ते दि.४ डिसेंबर 'सेवा आठवडा' म्हणुन राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय लाभार्थ्यांचे शस्त्रक्रियेसाठी पूर्व नोंदणी करुन शिबिरे आयोजित करण्यात येतील. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असुन लाभार्थ्यास १ हजार ४५१ रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.या अभियानात जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बाळकुष्ण लांजेवार यांनी केले आहे.

## संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गाजणार अदानीचा मुद्दा

### विरोधकांनी चालवली केंद्र सरकारला घेरण्याची तयारी

नवी दिल्ली, २१ नोव्हेंबर : अमेरिकेच्या वर्तमानपत्रामध्ये सौर ऊर्जा करारात कथित भ्रष्टाचाराची बातमी प्रकाशित झाल्यानंतर विरोधकांना आयतेच कोलित मिळाले आहे. आगामी २५ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात या मुद्यावरून विरोधकांनी सरकारला घेरण्याची तयारी चालवली आहे. यासंदर्भात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज, गुरुवारी संकेत देखील दिलेत.

काँग्रेसने या करारातील कथित भ्रष्टाचाराबाबत राहुल गांधी यांनी गौतम अदानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट हल्लाबोल केला आहे. अदानीच्या अटकेसोबतच त्यांनी या प्रकरणाची संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) मार्फत चौकशीची मागणीही केली आहे. यासंदर्भात राहुल गांधी म्हणाले की, आम्ही हा मुद्दा उपस्थित करत आहोत. विरोधी पक्षनेता म्हणून हा मुद्दा मांडण्याची जबाबदारी माझी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या माणसाचे १०० टक्के संरक्षण करत आहेत. या माणसाने भ्रष्टाचार करून भारताची संपत्ती मिळवली आहे. अदानींचा भाजपला पाठिंबा आहे, आम्ही याचा पुनरुच्चार करू. जेपीसीमार्फत या प्रकरणाच्या चौकशीची मागणी हिवाळी अधिवेशनात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अदानींना अटक व्हावी ही आमची मागणी असल्याचे राहुल गांधी म्हणाले. पण आम्हाला माहित आहे की त्यांना अटक होणार नाही कारण भारताचे पंतप्रधान अदानींना पाठिंबा देतात, ते त्यांचे आश्रयदाते आहेत. हा मुद्दा संसदेत उपस्थित करणार असल्याचे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले. हा मुद्दा उपस्थित करून केंद्र सरकारवर दबाव आणण्यासाठी विरोधक सर्वतोपरी प्रयत्न करतील. विरोधकांच्या मतांकडे दुर्लक्ष केल्यास अधिवेशनात गदारोळ होण्याची शक्यता आहे. या गदारोळात घोषणाबाजीतून पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले जाणार आहे.संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या रणनीतीबाबत इंडी आघाडीची बैठक होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती

अहिल्यानगर, दि.२१ – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची मतमोजणी २२ नोव्हेंबर रोजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पार पडणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक हौलिनलाल गौईटे (संपर्क अधिकारी – उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे – ७३५००७८८७७), संगमनेरसाठी सुनिल सिंग (संपर्क अधिकारी – उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे – ९४०४०७३७३९), शिर्डीसाठी कविथा रामू (संपर्क अधिकारी – सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे – ७२१८४८०३२२), कोपरगावसाठी शेरी (संपर्क अधिकारी – रचना सहायक किरण जोशी – ९८५०१७८७९५), श्रीरामपूरसाठी अरूण कुमार (संपर्क अधिकारी – मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलम – ८४२५९२४४३३) आणि नेवासा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जे.एल.बी.हरि प्रिया (संपर्क अधिकारी – विस्तार अधिकारी बी.के.कासार – ७७७४०४७९७९) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शेवगाव विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून श्रीमती रंजिता (संपर्क अधिकारी – मुळा पाटबंधारे कार्यकारी अभियां सायली पाटील व धनश्री शिंदे– ९७६४५६४४५५), राहूरीसाठी केशव हिंगोनिया (संपर्क अधिकारी – सहायक प्राध्यापक आर.आर. निरगुडे – ७५८८६०४१५१), पारनेरसाठी सुरेंदर सिंग (संपर्क अधिकारी –कुकडी पाटबंधारे श्री.घोरपडे – ९२२५५४४३३१), अहमदनगर शहरसाठी ताय काये (संपर्क अधिकारी – सहायक अभियंता संदिप कुंभार – ९५५२१३४७८५), श्रीगोंदासाठी डी रथ्ना (संपर्क अधिकारी सहायक गटविकास अधिकारी विजय गायकवाड – ९०११८४५५२९, उपविभागीय अभियंता बबन वाळके – ९४२२३३५५१२, पुरवठा निरीक्षक – ८७८८४२०८५६) आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून पुजा यादव (संपर्क अधिकारी – मुख्याधिकारी अजय साळवे – ८४८३८४८५३७, पुरवठा निरीक्षक वृषाली जाधव– ७३८७४०६९७२) यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निरीक्षक समन्वयक अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.

## इस्रायलच्या पंतप्रधानांविरोधात अटक वॉरंट

### युद्ध आणि मानवतेविरोधातील गंभीर आरोप

जेरुसलेम, २१ नोव्हेंबर : इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि माजी संरक्षण मंत्री योव्ह गॅलंट यांच्यावर इंटरनॅशनल क्रिमिनल कोर्टाने (आयसीसी) युद्ध गुन्हे आणि मानवतेविरुद्धच्या गंभीर आरोपांसाठी अटक वॉरंट जारी केले आहे. गाझा पट्टीत युद्धकाळात सामान्य नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या हल्ल्यांसाठी आयसीसीने नेतान्याहू आणि गॅलंट यांच्यावर हत्या, शोषण आणि अमानवीय कृत्यांबद्दल गुन्हे दाखल केले आहेत. इस्रायलने गाझातील नागरिकांना अन्न, पाणी आणि वैद्यकीय सुविधा रोखल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मृत्यू आणि संकटांना सामोरे जावे लागल्याचे आरोप आहेत. यात लहान मुलांचा मृत्यू आणि मानवीय त्रासाचे पुरावे आढळल्याचे कोर्टाने नमूद केले आहे. आयसीसीच्या अहवालानुसार, नेतान्याहू यांनी जाणूनबुजून सामान्य नागरिकांना लक्ष्य बनविले, याबाबतचे पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत. दरम्यान, गाझातील युद्धबंदीबाबत कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. हमासचे गाझा प्रमुख खलील अल–हय्या यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत युद्धबंदी होत नाही, तोपर्यंत कैद्यांची अदलाबदल होणार नाही. अमेरिकेने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विनाअट युद्धबंदी प्रस्तावावर व्हेटो लावला आहे. मात्र, ओलीसांची सुटका करणाऱ्या प्रस्तावाला अमेरिकेने समर्थन दिले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नांदेड लोकसभा, विधानसभेत जनतेच्या हातात कमळ !

**सुरेश काशिदे**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**



अत्यंत अटीतटीच्या झालेल्या विधानसभा निवडणुकीत बुधवारी मतदान झाल्यानंतर विविध संस्थांनी कंपन्यांनी केलेल्या एक्झिट पोल मध्ये सत्तारूढ महायुती व महाविकास आघाडी यांच्यामध्ये काट्याची टक्कर असल्याचे दर्शविण्यात आले आहे. काँग्रेस दोन नंबरवर राहील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तर केवळ नांदेड जिल्ह्याची परिस्थिती पाहिली असता लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा मतदानात बहूतांश मतदारसंघात मतदारांनी 'हातात' 'कमळ' घेतले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

मतदान प्रक्रिया पार पडल्यांनतर आता सर्वच पोलमध्ये भाजपाला सर्वाधिक जागा मिळतील आणि लोकसभेत मोठी बाजी मारणारा काँग्रेस दुसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दोघांना अनुक्रमे ७८ व ६२ ठिकाणी विजयी होईल असे अंदाज दाखवण्यात आले आहेत. काहींच्या सर्व्हे त महायुतीला काठावरचे बहुतमत मिळेल, असे दर्शविण्यात आले आहे. तर काहींनी महाविकास आघाडी अवघ्या काही जागांनी सत्तेवर येईल, असे दाखविले आहे. दोन्ही प्रमुख आघाड्यांमध्ये सरासरी १५ ते २० जागांचा फरक असणार असल्याचे त्यात म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील दोन प्रमुख पक्षात फूट पडली. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फुटीनंतर ही पहिलीच विधानसभेची निवडणूक असल्यामुळे या निवडणुकीकडे राज्याचेच नाही तर संपर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

नांदेड लोकसभा पोटानिवडणुक व विधानसभेसाठी बुधवारी मतदान झाले. नांदेड जिल्ह्यात लोकसभेसाठी ६५ तर विधानसभेसाठी ६९ टक्के मतदान झाले. मतदानानंतर आता केवळ पक्ष उमेदवारच नव्हे तर जनता देखील आकडेमोड करण्यात व्यस्त झाली आहे. राजकीय विश्लेषक तसेच विविध कंपनीच्या सर्वे नुसार पुन्हा महायुतीला जास्त जागा मिळणार असल्याच अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परंतू नांदेडात मात्र संमिश्र अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मतदारांमधील चर्चा आणि मतदानाची टक्केवारी त्यातच उमेदवारांची वाढलेली संख्या त्यामुळे विजयी उमेदवार मोजक्याच मताने विजयी होणार असल्याचे बोलले जात आहे. महायूती आणि काँग्रेसची काट्याची टक्कर असली तरी नांदेड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघात मात्र जनतेने महायूती आणि कॉंग्रेसला बरोबरीने साथ दिली असल्याची परिस्थिती आहे.



नांदेड दक्षिण आणि उत्तर मतदारसंघात काँग्रेस आणि महायूती तर दक्षिण मतदारसंघात वंचीत बहूजन आघाडीच्या उमेदवारांना चांगली लढत दिली. भोकर मतदारसंघात सुरुवातीला महायूती विरोधात वातावरण होते परंतू मतदान प्रक्रीया जवळ येताच हे वातावरण अचानकपणे बदलून विधानसभा महायूती तर लोकसभा काँग्रेस अशीच काहीशी परिस्थिती निर्माण झाली आहे. किनवट मतदारसंघात विधानसभा महायुती तर लोकसभेत देखील महायूती अशी परिस्थिती आहे. तर दुसरीकडे देगलूर आणि लोहा मतदारसंघात घड्याळाच्या साथीने कमळाला साथ मिळणार असल्याची शक्यता आहे. अशीच काहीशी परिस्थिती देगलूर मतदारसंघात देखील निर्माण झाली आहे. नायगाव विधासभा मतदारसंघात महायूतीच्या अमेदवाराला मोठ्या प्रमाणात विरोध झाला असला तरी शेवटी त्या विरोधाचा फायदा देखील महायूतीच्या उमेदवारालाच होण्याची शक्यता आहे. तर लोकसभेच्या बाबतीत या ठिकाणी काँग्रेसला साथ मिळणार हे देखील तेवढेच खरे आहे. अशीच काहीशी परिस्थिती मुखेड विधानसभेतही असून या ठिकाणी ही विद्यमान आमदारांनाच पून्हा संधी मिळण्याची चाहूल असून लोकसभा बाबतीत जनतेने हाताला साथ दिली असल्याचे दिसून आले. तर हदगाव मतदारसंघात लोकसभेसाठी मतदारांनी महायूतीला जवळ केले असले तरी विधानसभेत देखील महाविकास आघाडीला दुर केले नाही. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघात लोकसभेची पूनरावृत्ती होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकुणच मतदानानंतरची चर्चा पाहता नांदेड लोकसभेत डॉ. संतुक हंबर्डे, भोकर विधानसभेत महायुतच्या श्रीजया चव्हाण, किनवट भिमराव केराम, देगलूर जितेश अंतापुरकर, लोहा माजी खा. प्रताप पा. चिखलीकर, नांदेड दक्षिण मोहन हंबर्डे, नांदेड उत्तर बालाजी कल्याणकर, नायगाव राजेश पवार, मुखेड डॉ. तुषार राठोड तर हदगाव विधानसभचे माधव जवळगावकर हेच विजयाचे दावेदार असल्याची चर्चा आहे.

## लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ६७.८१तर विधानसभेसाठी ६९.४५ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. मतदारांनी मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजेपासून लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दिव्यांग, जेष्ठ मतदारासोबत नवमतदार आणि तृतीयपंथीयांनी मतदानासाठी उपस्थिती लावली. यावर्षी २५ वर्षानंतर एकाच वेळी लोकसभा व विधानसभेसाठी एकाच शाईत दोन मतदान करण्याचा अनुभव मतदाराना मिळाला.

या निवडणुकीत लोकसभेसाठी १९ तर विधानसभेसाठी १६५ उमेदवारांचे भविष्य आज मतदान यंत्रात बंद झाले आहे. या लोकसभेसाठी १९ लाखांच्यावर व विधानसभेसाठी २७ लाखांच्यावर मतदारांचा समावेश आहे. बुधवारी सकाळी नांदेड जिल्ह्यामध्ये सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. काही ठिकाणी सकाळपासूनच मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. नांदेड लोकसभेसाठी आज सकाळी ९ वाजता ६.०३ तर विधानसभेसाठी ५.४२ टक्के मतदान झाले. सकाळी नांदेड मतदार संघातील लोकप्रतिनिधीनीसह अनेक मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सहकुटूंब व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनीही आयटीआय परिसरातील कामगार कल्याण केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. नवमतदार, जेष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, तृतीयपंथीय यांनी उत्स्फूत प्रतिसाद दिला असून त्यांनी मोठया प्रमाणात मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी ११ वाजेपर्यत लोकसभेसाठी १२.५९ तर विधानसभेसाठी १३.६७ टक्के मतदान झाले. आज दुपारी १ वाजता २७.२५ तर विधानसभेसाठी २८.१५ टक्के मतदान झाले. दुपारी ३ वाजेपर्यत लोकसभेसाठी ४१.५८ तर विधानसभा क्षेत्रात ४२.८७ टक्के मतदान झाले होते. रात्री उशिरा अधिकृत अंतिम आकडेवारी जाहिर करण्यात आली. त्यात लोकसभेसाठी ६७.८१ तर विधानसभेसाठी ६९.४५ एवढी होती. या निवडणुकीसाठी गेल्या ४० दिवसापासून जिल्हा प्रशासन कार्यरत आहे. १५ हजार कर्मचारी तसेच पोलीस व राखीव दलाच्या तुकडया गेल्या काही दिवसांपासून कार्यरत होत्या. आज दिवसभर वॉररुम व वेबकास्टिंग कक्षाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत निवडणूक आयोग व सामान्य मतदार यांच्या संपर्कात होते. वेब कास्टिंग विभागात वरिष्ठ अधिकारी निगराणी ठेवून होते. रात्री उशिरापर्यत या यंत्रणेमार्फत अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रावर ते लक्ष ठेवून होते.

बुधवारी दिवसभर इव्हिएम व अन्य कोणतीही अडचण आल्यास तातडीने विशिष्ट वेळात समस्या सोडवली जात होती. विधानसभा निहाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या संपर्कात ते होते. मतदान यंत्राच्या बदलाच्या एक दोन घटना वगळता जिल्ह्यामध्ये कुठेही मतदान थांबले नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी यासोबत अनेक केंद्राना अनेक ठिकाणी आकस्मिक भेटी दिल्या.तसेच याकाळात निवडणूक निरीक्षकांनी देखील भेटी दिल्या व परिस्थितीवर लक्ष दिले.

सन २०१९ च्या विधानसभा मतदारसंघात किनवट ७०.९०, हदगाव ७०.२०, लोहा ६९.७३ भोकर-७३.९९, नांदेड उत्तर ६१.२०, नांदेड दक्षिण-६३.६६, नायगाव ७३.८०, देगलूर ६०.८०, मुखेड ६६.२० असे एकूण ६७.८३ टक्के मतदान झाले होते.

यावर्षी निवडणूक विभागाने प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये महिला, दिव्यांग व तरुण अधिकाऱ्यांचे मतदान केंद्र उभारले होते. याशिवाय ५३९ पर्दानसिन केंद्र कार्यरत करण्यात आले होते. यासोबतच विष्णुपूरी जि.प. शाळेत पर्यावरण पूरक केंद्र उभारले होते. मात्र सोबतच प्रशासनाने यावेळी प्रत्येक केंद्रामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या होत्या. यामध्ये पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम, दिवाबत्ती, बसण्याची व्यवस्था, काही केंद्रावर सेल्फी पॉईट व अन्य सजावट करण्यात आली होती. मतदारांनी एकाच वेळी दोन ठिकाणी गतीने मतदान झाल्याबद्दल लोकसभा मतदार संघात समाधान व्यक्त केले. मोठया संख्येन जनतेने मतदानाला प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा प्रशासनाने मतदाराचे आभार व्यक्त केले आहे. जिल्ह्यामध्ये याकाळात कोणत्याही अप्रिय घटनेची नोंद नाही.

**२३ नोव्हेंबरला मतमोजणी**

बुधवारी मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात होणार असून किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### इंदिरा गांधी ह्या भारत देशाच्या सामाजिक व राजकीय महान राष्ट्रीय नेत्या : मिसलवाड



**नांदेड-**वयाच्या आकराव्या वर्षापासूनच भारत देशसेवेचे ध्येयवेड्या असलेल्या व विविध मंत्रीपदावर राहुन भारत देश समृद्धीसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक व राजकीय राष्ट्रीय महान नेत्या म्हणजेच माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी ह्या होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १९ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता आयर्न लेडी, भारतरत्न, तिसऱ्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांची १०७ वी जयंती राष्ट्रीय एकात्मता दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. सर्वप्रथम आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक मा.श्री. विष्णूकांत हारकळ व श्रीनिवास रेणके यांच्या हस्ते श्रीमती इंदिरा प्रियदर्शनी गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, इंदिरा गांधी यांनी आपल्या १५ वर्षे पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात ४१ आंतरराष्ट्रीय देशांचा सामाजिक अभ्यास दौरा करुन भारत देश विकसीत करण्यासाठी फॅक्ट्री कामगार बजेट, हरित क्रांती, शेतकऱ्यांसाठी बजेट, बँकांतील पैशांचे राष्ट्रीयीकरण करुन विनियोग, गरीबी हटाव चा नारा असे एक ना अनेक विधायक मोठे कार्य त्यांनी केले. अशा या थोर व्यक्तीमत्त्व नेत्यांचा आदर्श घेऊन आपण सर्वांनीच देशाप्रती, समाजाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी गुणवंत एच. मिसलवाड यांनी राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा (शपथ) चे वाचन करुन सामूहिकरित्या कामगार- कर्मचाऱ्यांना शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णूकांत हारकळ, श्रीनिवास रेणके, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक सुनील मोरे, आनंदा कंधारे, राजेश कांबळे, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, सुनीता हुंबे, श्वेता तेलेवार, संगीता वाघमारे, मनिषा कदम, वैष्णवी गंदेवार, प्रियंका खरात, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे, श्रीकांत अंकुशे, चालक राहुल लांडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी, बंधु- भगिणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नांदेडचे सुप्रसिद्ध गायक कलावंत पं. संजय जोशी सह्याद्री दूरदर्शनवर

**नांदेड-**गीत रामायण आणि सुगम संगीताच्या कार्यक्रमातून अवघ्या महाराष्ट्राला आपल्या सुमधुर व भावपूर्ण गायनाने सुपरिचित असणारे नांदेडचे सुप्रसिद्ध गायक पं. संजय जोशी यांचा संगीत प्रवास सह्याद्री



दूरदर्शनच्या मैत्र हे शब्द सुरांचे या कार्यक्रमात उलगडणार आहे. संजय जोशी यांनी आतापर्यंत एक हजारच्या वर गीत रामायणाचे आणि तीन हजार चे वर सुगम व नाट्य संगीताचे कार्यक्रम देश विदेशात केले आहेत. आणि ते पुरस्कार प्राप्त रंगभूमीवरील गायक नट म्हणूनही परिचित आहेत. अनेक संगीत नाटकातून त्यांनी भूमिका गाजवल्या आहेत. जोशी हे आकाशवाणीचे बी हाय दर्जाचे कलावंत असून त्यांनी कबीर व कविवर्य ग्रेस यांच्या रचनांना संगीत दिलेले कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरले आहेत. पं. संजय जोशी यांची मुलाखत घेणार आहेत दूरदर्शन वरील सुप्रसिद्ध निवेदक तथा गायक कलावंत विघ्नेश जोशी. आणि साथसंगत करणार आहेत डॉ. जगदीश देशमुख (तबला), पं. पंकज शिरभाते (व्हायोलिन), स्वरूप देशपांडे आणि विविध ताल वाद्यांवर साथ करणार आहेत प्रसाद जोशी. हा कार्यक्रम दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर २४ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ८.३० वाजता प्रसारित होणार आहे. याचेच पुनर्प्रसारण रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी दहा वाजता आणि सायंकाळी पाच वाजता दाखवण्यात येणार आहे. सर्व संगीत रसिकांनी अवश्य कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

### राज्य उत्पादन शुल्कच्या कारवाईत ८ लाखाचा मुद्देमाल जप्त

**नांदेड -**राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयात नव्यानेच रुज झालेल्या प्रशिक्षीत पोलिस उप. अधीक्षक रत्नमाला गायकवाड यांनी आचारसंहिता काळात ५४ ठिकाणी धाड टाकून ५४ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून ८ लाख ८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. किनवट येथे नव्यानेच रुजू झालेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलिस उप.अधीक्षक रत्नमाला गायकवाड यांनी १५ ऑक्टोवर ते आजपर्यंत तव्वल ५४ ठिकाणी धाडी टाकत ५४ आरोपींना अटक केली आहे. तसेच या कारवाईत एकूण ८ लाख ८ हजार ३६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे दोन्ही तालुक्यात हातभट्टीवर चालवणारे व दारूची अवैध विक्री करणाऱ्यांचे धावे दणाणले आहे.

## मतदान यंत्रावरील नाव व निशाणी स्पष्ट दिसत नसल्यामुळे लोकसभा पोट निवडणूक रद्द करा

### जनहित लोकशाही पार्टीचे अधिकृत उमेदवार नागोराव वाघमारे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

नांदेड १६-लोकसभा निवडणुकीतील इव्हीएम मशीनवरील काही उमेदवारांचे नाव व निशाणी अस्पष्ट दिसत असल्यामुळे मतदारांना मतदान करताना अनेक अडचणी येत होत्या, त्यामुळे नांदेड लोकसभा पोट निवडणूक रद्द करावी, अशी मागणी जनहित लोकशाही पार्टीचे उमेदवार नागोराव वाघमारे यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड १६-लोकसभेचा जनहित लोकशाही पार्टीचे उमेदवार नागोराव दिगंबर वाघमारे यांची निशाणी ऑटोरिक्षा असून इव्हीएम मशीन यंत्रावरील त्यांचे नाव व निशाणी स्पष्ट दिसत नसून ती अत्यंत फिकट (अस्पष्ट) दिसत होती. त्यामुळे अनेक मतदारांचे त्यांना फोन आले की, आपली निशाणी व नाव ओळखू येत नाही. त्यामुळे मतदारांना मतदान करण्यासाठी अडचण आली असून त्यामुळे ही निवडणूक रद्द करून पुन्हा नाव व निशाणी स्पष्ट दिसेल असे इव्हीएम मशीनवर लावून नांदेड लोकसभा पोट निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी नागोराव वाघमारे यांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



**नांदेड-बुधवारी मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या ज्ञान स्त्रोत संकुलात होणार असून मतमोजनीची तयारी सुरु आहे नांदेड लोकसभा मतदार संघातील मतपेट्या विद्यापिटात दाखल झाल्या आहेत. मतमोजणी ठिकाणी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी विद्यापिठात तसेच किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.**

## वंचितचा प्रचार भोवला, ब्राम्हणवाडेकर यांच्या साहित्याची नासधूस

### विमानतळ पोलीस ठाण्यात अज्ञातांविरूद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

मागील तीन महिन्यांपासून ब्राह्मणवाडा गावात जलजीवन मशीनचे काम चालू आहे, परंतु तीन महिन्यात एकाही रुपयाचे नुकसान कोणत्याही गावकऱ्यांकडून झालेले नाही. मतदानाच्या दिवसभर वंचित बहुजन आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अविनाश भोसीकर आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार फारुख अहमद यांच्या प्रचारार्थ एकनाथ बत्तलवाड ब्राह्मणवाडेकर हे बुथवर थांबले होते. त्यांच्यावर बुधवारी प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मतदान केंद्रप्रमुख व पोलिसांनी प्रसंगाचे गांभीर्य पाहून त्यांच्या अंगावर आलेल्या भाजपच्या लोकांचा हल्ला पाहून बुथमध्ये अर्धा तास बंद करून ब्राह्मणवाडेकर यांना संरक्षण देण्यात आले. त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

ही घटना श्रद्धेय ॲड. बाळासाहेब आंबेडकरांशी रात्री दहा वाजता ब्राह्मणवाडेकर यांनी सांगितली. ते म्हणाले काळजी करू नकोस, मी आहे. त्यावर ब्राह्मणवाडेकर शांत बसले, परंतु त्यावर विरोधक गप्प बसले नाहीत. त्यांनी गुरूवारी सकाळी ब्राह्मणवाडा गावातील साईटवर पीव्हीसी पाईप व जेसीबी मशीनचे नुकसान केले. म्हणून त्यांनी अज्ञात व्यक्तींविरोधात विमानतळ पोलीस स्टेशन येथे तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे मतदान पाहून विरोधकांच्या डोळ्यात खुपू लागले. भाजपचे कार्यकर्ते वयोवृद्ध माणसं नसतानाही बुथमध्ये नेऊन ते मतदान करत होते, त्यांना ब्राह्मणवाडेकर यांनी विरोध केला असता बीजेपीच्या २५ ते ३० लोकांनी त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. याचा व्हीडीओ सोशल मीडियावर आहे. पोलीस निरीक्षक चव्हाण हे येईपर्यंत ब्राह्मणवाडेकर यांचा जीव वाचवण्यासाठी येथील अधिकाऱ्यांनी बुथमध्ये अर्धा तास बंद ठेवून त्यांना संरक्षण दिले, म्हणून त्यांचा जीव वाचला.

परंतु रात्री दहा ते आज सकाळी पाचच्या दरम्यान गावातील गावगुंडांनी उपसरपंच प्रतिनिधी या नात्याने ब्राह्मणवाडेकर हे जलजीवन मिशनचे काम पाहत असलेले बुद्ध विहारासमोर नळ कनेक्शनचे तीन पीव्हीसी पाईप फोडून टाकून नुकसान केले व पाईप घेऊन गेले तसेच जेसीबी मशीनचे नुकसान केले. त्यामुळे अज्ञात इसमांविरोधात आज पहाटे सकाळी विमानतळ पोलीस स्टेशन गाठून ब्राह्मणवाडेकर यांनी तक्रार दिलेली आहे व आरोपींवर कठोर कारवाई करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

## शालेय राज्यस्तरीय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धेसाठी वर्धा येथे संघ रवाना



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने येथे दिनांक २४ ते २६ नोव्हेंबर रोजी क्रीडा संकुल वर्धा येथे राज्यस्तरीय शालेय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धा होणार आहेत त्यासाठी लातूर विभागातून समीर पिन्यप्रतिवार, सोहम पल्लेवाड, कृष्णा तायडे, ज्ञानेश्वरी नाकाडे ,स्नेहा पप्पुलवाड, तन्वी पवितवार, राजवीरसिंह चौहाण, ओम गुट्टे, स्वयंम गिरी, मानिनी क्षीरसागर, मयुरी गजभारे, सृष्टी मोतेवार, वैष्णवी पांचाळ, प्रणिता वारकड, आदित्य कोटगिरे, प्रणव वारकड, सुयशा क्षीरसागर, वरील सर्व खेळाडूंची निवड वेगवेगळ्या वजन व वयोगटात मध्ये झालेली आहे खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक एकनाथ पाटील महिला प्रशिक्षकअनुराधा पाटील सह प्रशिक्षक विशाल कंदुलवार यांनी केले जिल्हा नांदेड जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेभरे क्रीडाधिकारी विपुल सर मल्लखांब संघटनेचे सचिव कुलदीप सिंग जट सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत हंबर्डे संजय वाघमारे मनपा सिडको विष्णू जोशी संकेत पाटील दिलीप कदम यांनी खेळाडूंच्या अभिनंदन केव्हा पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## बौद्ध महिलांनी खा.डॉ.अजित गोपछडे यांना वाढदिवसानिमित्त दिले आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ नोव्हेंबर**

भाजपाचे नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय राज्यसभा खा.डॉ. अजित गोपछडे यांचा वाढदिवस दलित वस्तीतील महिलांनी औक्षण करून त्यांना शुभाशीर्वाद दिले. वास्तव तर हे आहे की,आजच्या काळात साधीसुधी माणसे देखील बडेजावचा आव आणत हारतुरे आणि बँनरबाजी करत फार मोठ्या प्रकारे वाढदिवस साजरा करत असतात. परंतु यास अपवाद ठरवत खा.डॉ.अजित गोपछडे यांची त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची नाळ जन्मभूमी कोल्हे बोरगाव गावातील गोरगरीब लोकांप्रती असलेली जाण व तळमळ आदींशी घट्ट आहे हे प्रकर्षाने जाणवते. साधी राहणी व उच्च विचार या उक्तीप्रमाणे डॉ. गोपछडे हे वैद्यकीय क्षेत्रातील एक निष्णात डॉक्टर असून देखील त्यांनी त्यांचा वाढदिवस बँनरबाजी न करता, हारेतुरे न स्विकारता जन्मभूमी असलेल्या कोल्हेबोरगाव येथे दलितवस्तीने आयोजित कार्यक्रमात अत्यंत साध्या पद्धतीने आणि प्रचंड उत्साहाने वाढदिवस साजरा केला. वाढदिवस कसा



साजरा करावयाचा असतो याचा एक आदर्श पाठच डॉ.गोपछडे यांनी यानिमित्ताने उपस्थितांना घालून दिला. खरोखरच त्यांना लहानपणापासून गोरगरीब, दीनदुबळे यांच्याप्रती फार कनवळा असल्याने आणि आईवडीलांच्या संस्कारात वाढल्याने त्यांना सामाजिक जाण कमालीची आहे, हे यानिमित्ताने उपस्थितीतांना समजली. त्यांनी दलितवस्तीमध्ये गोरगरीब माता भगिनीं आणि लहान मुलींच्या समवेत वाढदिवसाच्या निमित्ताने औक्षण स्विकारुन आशीर्वाद घेतले. यानिमित्ताने गावातील महिला सुशिक्षित व्हावे या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांनी पुढाकार घ्यावा,महिला आणि उद्योग धंद्यात पुढे यावे मुलींच्या शिक्षणासाठी वेळ दिला पाहिजे, महिला सुशिक्षित झाली तर समाज सुशिक्षित होतो त्यामुळे महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.तसेच तरुणांनी व्यसनमुक्त व्हावेत आणि सर्व जनतेनी हागणदारीमुक्त गाव करावा हीच भेट वाढदिवसानिमित्त मला पुढच्या वर्षी पर्यंत द्यावी असे भावनिक आवाहन यानिमित्ताने डॉ.गोपछडे यांनी उपस्थित नागरिकांसमोर व्यक्त केले. अत्यंत साधेपणाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आलेल्या वाढदिवस प्रसंगी उमाकांत गोपछडे, हावगीराव गोपछडे, कुंचनवार, रुपेश पाटील भोकसखेडकर, रेड्डी सर, शिवाजी शिंदे, आदित्य चोंडीकर, दत्ता दीवडे, रमेश गाडेकर, बाबू गादेवार, बनसोडे सर, भाऊसाहेब गाडेकर, मारोती गाडेकर, पंचक्रोशीतील अनेक मान्यवर,अनेक जेष्ठ नागरिक, माताभगिनी,तरुण वर्ग आणि लहानथोर देखील फार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

CMYK

# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## बाल संस्कार वर्गाला मुलांचा प्रतिसाद

### दर रविवारी आयोजन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने समर्थ नगरमधील श्रीराम मंदिरात बाल संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात बालकांमध्ये संस्कार, आहार-विहार, व्यायाम, योगासह श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक तसेच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी रचलेले श्रीमारुती स्तोत्र, त्रिकाल संध्या याचबरोबर श्रीज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान उपस्थित मुलांच्या मुखातून वदवून घेण्यात आले.

यानिमित्त चिन्मय संस्थानचे श्रीअपनेशानंद स्वामी व श्री समर्थ रामदास स्वामी अभ्यासक सुषमाताई धांडे यांनी उपस्थित मुलांना व पालकांना श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. मुलांनी दैनंदिन जीवनामध्ये कशाप्रकारे वर्तन असावे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर चिन्मय संस्थांचे श्रीआत्मसानंद स्वामी यांच्या हस्ते श्रीरामाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी संस्थे अंतर्गत चालू असलेल्या वेगवेगळ्या अभियानाबद्दल माहिती दिली. संस्थेचा मुख्य उद्देश श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्यांचा प्रचार व प्रसार करणे हा आहे, असे यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजुरकर यांनी, तर आभार प्रदर्शन सहसचिव प्रकाश सनान्से यांनी केले. दरम्यान, चिन्मय संस्थेचे श्रीआत्मेशानंद स्वामी यांचा सत्कार संस्थेचे संपर्कप्रमुख नरेश देवळे व संस्थेचे पदाधिकारी गजानन देशमुख व सुधीर पोतदार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले. उपस्थित मुलांना संस्थेतर्फे खाऊ वाटप करण्यात आला. प्रत्येक मुलाला श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांचे पुस्तके देण्यात आली. यावेळी मुलांसह त्यांचे पालक उपस्थित होते उपस्थित होते. संस्थेअंतर्गत हा बाल संस्कार वर्ग यानंतर प्रत्येक रविवारी ८.३० ते ९.३० यावेळेत समर्थनगरमधील श्रीराम मंदिरात घेतला जाईल. जास्तीत जास्त मुलांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी सर्वांना केले.

## पोलिस कर्मचाऱ्याने घेतला गळफास

छत्रपती संभाजीनगर : दहशतवाद विरोधी पथकात कार्यरत पोलिस कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. हसूल परिसरातील घृष्णेश्वर कॉलनीत १८ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. कैलास पांडुरंग मळेकर (वय ४१) असे आत्महत्या केलेल्या पोलिसाचे नाव आहे. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. या प्रकरणी हसूल ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मळेकर हे २००४ मध्ये शहर पोलिस दलात भरती झाले होते. मागील ६ वर्षांपासून ते एटीएसमध्ये कार्यरत होते. एटीएस अधीक्षकांच्या कार्यालयात ते काम करायचे. मळेकर यांनी रविवारी रात्री १२ वाजेपर्यंत कुटुंबीयांसोबत गप्पा मारल्या. बराच वेळ ते मोबाईलवर वेळ घालवत बसले होते. रात्रीच्या सुमारास घरातील सदस्य झोपण्यासाठी गेल्यानंतर तेही त्यांच्या खोलीत झोपण्यासाठी गेले. पहाटे तीन वाजेच्या सुमारास त्यांची मुलगी अभ्यासासाठी उठली असता तिची वडिलांच्या खोलीत नजर गेली. तेव्हा ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. तिने आरडाओरडा केल्यानंतर घरातील नातेवाईक जागे झाले. अनिल ताठे आणि दिलीप चंदनसे यांनी तातडीने मळेकर यांना घाटीत दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. कैलास मळेकर यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

## हुडहुडी वाढली, जनजीवन गारठले

### पुढे थंडी आणखी वाढण्याचे संकेत

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

पावसाळी वातावरण निवळताच उत्तरेकडील थंड वारे महाराष्ट्राकडे येऊ लागल्यामुळे मंगळवार, १९ नोव्हेंबरपासून थंडी वाढली आहे. ग्रामीणभागासह शहरातही हुडहुडी वाढली असून जनजीवन गारठेन गेले आहे. यापुढे थंडी आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याचा तापमानाचा पारा पुन्हा घसरला आहे. शहर आणि जिल्ह्यातही थंडी वाढू लागली असून, किमान तापमान ११ ते १४ अशांपर्यंत घसरले आहे. बुधवार, २१ नोव्हेंबरपासून तापमानात २ ते ४ अंशांची घट होणार असल्याने शहरासह संपूर्ण मराठवाड्यात गारठा वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे म्हणाले, कोमोरिन भाग आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार झाली आहे. दक्षिण भारतात पाऊस सुरू असून, उत्तर भारतात आकाश निरभ्र होत थंडी वाढू लागली आहे. मराठवाड्यासह राज्यात अनेक ठिकाणी किमान तापमान १५ अंशांपेक्षा खाली आले आहे. उर्वरित राज्याच्या किमान तापमानातही घट होत आहे, असे डॉ. साबळे म्हणाले. यापुढे किमान तापमानात घट होण्याची शक्यता असून, गारठा वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

वाढती थंडी गहू पेरणीसाठी उपयुक्त असून, तूर पिकासाठी देखील शेंगा भरण्यासाठी फायदेशीर असल्याचे राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी सांगितले. सध्या रब्बी हंगाम सुरू असून, थंडीअभावी गव्हाची पेरणी खोळंबली आहे. काही ठिकाणी तुरीला शेंगा लगडल्या असून, दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. मागील आठवड्यात ढगाळ वातावरण असल्याने तूर पिकावर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता. आता दिवसा कडक उन आणि रात्री-पहाटे हुडहुडी भरणारी थंडी सुरू झाल्यामुळे पिकांसाठी उपयुक्त असल्याचे डॉ. पवार म्हणाले.

सुरुवातीस थंडी सुरू झाली. मात्र, गेल्या आवठवड्यात थंडी गायब झाली होती. आता थंडी पुन्हा सुरू झाली असून, मंगळवारपासून हुडहुडी भरणारी थंडी सुरू झाली आहे.

### पेटू लागल्या शेकोट्या

**वाढत्या थंडीमुळे शहरासत ग्रामीण भागात ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागल्याा असून, नागरिकांनी स्वेटर, मफलर, कानटोप्या अशी उब देणारी कपडे बाहेर काढली आहेत. दिवाळीनंतर कडाक्याची थंडी सुरू होत असते, आता ती सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत थंडी आणखी वाढणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.**

## अपक्ष उमेदवार प्राध्यापक सुरेश सोनवणे यांच्यावर खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१९ नोव्हेंबर : विधानसभा मतदारसंघ गंगापूर ,मतदान केंद्र क्रमांक ८७ सुलतानपूर ,तालुका खुलताबाद येथे अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांनी सकाळी ८:४५ च्या सुमारास मतदान केंद्राच्या आत प्रवेश केला व बि.यू मांडणी पाहणी केली व ही मांडणी चुक आहे असे सांगितले .तसेच केंद्रात मोबाईल नेण्यास बंदी असतानाही मोबाईल सोबत नेऊन बि.यू व व्ही व्ही पॅट कक्ष व्हिडिओ रेकॉर्डिंग करून मतदान प्रक्रिया दहा मिनिट बंद पाडली तसेच सदर रेकॉर्डिंग चा व्हिडिओ व्हाट्सअप वर प्रसारित केला .

तसेच मतदान केंद्र क्रमांक ५१ कनकशिळ ,तालुका खुलताबाद येथे अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांनी सकाळी ९:५६ च्या सुमारास मतदान केंद्राच्या आत मोबाईल नेण्यास बंदी असतानाही मोबाईल सोबत नेऊन पूर्ण मतदान केंद्राची व्हिडिओ शूटिंग केले.

सदरील दोन्ही घटनाकरिता अपक्ष उमेदवार श्री सुरेश साहेबराव सोनवणे यांच्यावर लोकप्रतिनिधी नियम १९५१ चे कलम १३०,१३२ व भारतीय न्याय सुरक्षा संहितेचे कलम १६३ नुसार दिनांक २० नोव्हेंबर ला रात्री खुलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## हॉटेल जाळण्याची धमकी

छत्रपती संभाजीनगर : आम्हाला येथे दारू का पिऊ देत नाही, असे म्हणत चार ते पाच जणांनी हॉटेलमध्ये गोंधळ घातला. या प्रकरणी पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयूर मुंडे नितीन, राहुल व इतर पाच जण अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी सुरेंद्र गणेश गव्हाणे रा. रेणुका माता कमान सातारा परिसर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार सुरेंद्र गव्हाणे हे शौर्य पाटील वाडा येथे मॅनेजर म्हणून काम करतात. १८ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास आरोपी हॉटेलमध्ये आले. आम्हाला येथे दारू पिऊ का देत नाही, असे म्हणत गोंधळ घातला. हॉटेलमधील स्टाफला व फिर्यादीला मारहाण केली. तसेच हॉटेल जाळून टाकण्याची धमकी दिली.

## इम्तियाज जलील यांच्यावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : पूर्व मतदार संघातील शिवाजीनगर येथील पंडित जवाहर नेहरू महाविद्यालयातील बुथवर मतदारांना दमदाटी करत गोंधळ घातल्याप्रकरणी पूर्व मतदारसंघ एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांच्यासह इतर १० ते १२ जणांवर पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद बनसोडे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सव्वा पाच वाजेच्या सुमारास फिर्यादी पोलीस स्टाफसह पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथील सेक्टर नंबर ३ येथे मतदान बंदोबस्तावर होते. बुथ क्र. ९७ च्या खोली क्रमांक २ समोर इम्तियाज जलील हे त्यांच्यासोबत दहा ते बारा जणांना घेऊन आले. बोगस मतदान होत आहे असा आरोप करीत मतदानासाठी तेथे उपस्थित असलेल्या सहा-सात लोकांना मारहाण केली. याप्रकरणी पुंडलिक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बारा वर्षीय मुलगी बेपत्ता छत्रपती

छत्रपती संभाजीनगर : दुकानात चिप्स आणायला गेलेल्या १२ वर्षीय मुलीचे अज्ञाताने अपहरण केले. नारेगावातील राजेंद्रनगरात गुरुवारी (दि. १४) ही घटना घडली. या प्रकरणी मुलीच्या आईने एमआयडीसी सिडको ठाण्यात अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. अपहरण झालेल्या मुलीचे वडील खासगी नोकरी करतात. गुरुवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास त्यांची मुलगी घराजवळील दुकानात चिप्स आणण्यासाठी गेली. त्यानंतर ती घरी परतलीच नाही. महिलेने दुकानात जाऊन पाहिले असता मुलगी तेथे नव्हती. त्यानंतर ही बाब पतीला सांगितली. त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला मात्र, मुलगी मिळून आली नाही. अखेर एमआयडीसी सिडको ठाण्यात धाव घेत त्यांनी अपहरणाचा गुन्हा नोंद केला.

## एमजीएममध्ये गुरु नानक जयंती उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न





छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : महात्मा गांधी मिशन तर्फे एमजीएम विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारत येथे गुरू नानक जयंतीचे औचित्य साधून आज सकाळी ११ वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्व संबंधितांनी गुरु नानक देवजींच्या शिकवणीचे स्मरण केले. यावेळी, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, शीख बांधव व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सत् नाम सत् नाम सत् नाम जी वाहेगुरू वाहेगुरु वाहेगुरू जी, दमदम वाहेगुरु, कल तारण गुरुनानक आया नानक आया गुरू नायक आया, सत् नाम सत् नाम सत् नाम दा चकर फिराया, सत् गुरू नानक ज्ञान कर्म जान, धन गुरु नानक, हर दिन हर सिमरन, जो जो नामा हर गुण आदि भक्तीपर गीते आणि भजने गाण्यात आली.

यावेळी बोलताना म्हणाले वरियम सिंह तथा ज्ञानी जी म्हणाले , गुरु नानक देव जी यांचे जीवन आणि शिकवण आजही लाखो लोकांना प्रेरणा देते. त्यांनी शीख धर्माची स्थापना केली आणि समता, सेवा, सत्य आणि समर्पणाचा संदेश दिला. सर्वांसाठी प्रेम, भेदभाव न करता सेवा आणि ईश्वरावरील अपार भक्तीचा संदेश त्यांच्या शिकवणीत आहे.

आपण वापरत असलेल्या लेखणीत शाई नसेल तर त्या लेखणीचा काहीही उपयोग नाही त्याचप्रमाणे माणसामध्ये माणुसकी नसेल तर तो माणूस काहीही कामाचा नाही. चांगले विचार आणि चांगले गुण माणसामध्ये असतील तर त्या व्यक्तीला परमात्मा मिळेल अन्यथा नाही. सगळ्यांची निर्मिती ईश्वराने केली असेल तर आपण आपापल्यामध्ये भेदभेद करणे चुकीचे असल्याचे वरियम सिंह यांनी यावेळी सांगितले.

वरियम सिंह पुढे बोलताना म्हणाले, विद्यार्थी प्रामानिकपणे अभ्यास करतात आणि शिक्षकांचे ऐकतात. विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांची भूमिकाही महत्त्वपूर्ण असून त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण दिले पाहिजे. परमात्माची सर्वजण वेगवेगळ्या प्रकारे आठवण करीत असतात. ईश्वर एक असून ईश्वरास कोणी वाहेगुरू,कोणी गॉड, कोणी अल्ला, कोणी राम अशा पद्धतीने संबोधित करीत असतात.

## सिडको वाळूज महानगरात एकाच रात्री तीन घरे फोडली ; लाखोंचे दागिने लंपास



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून एमआयडीसी वाळूज पोलिस ॲक्शनमोड असून, सतर्क असतानाही पोलिसांच्या नाकावर टिच्चून चोरट्यांनी सिडको वाळूज महानगरातील राजस्वप्नपुर्ती अपार्टमेंट मध्ये एकाच रात्री तिन घरे फोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिक भयभीत झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल चांगदेव मालवदे हे राज स्वप्नपूर्ती मध्ये रो हाऊस नंबर ए २-१३ मध्ये कुटुंबासह राहतात. ते दिनांक १९ नोव्हेंबर रोजी मूळ गावी मतदान करण्यासाठी गेले होते. आज सकाळी ७ वाजेच्या दरम्यान ते परत घरी आले असता त्यांना दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला संशय आल्याने घरात जाऊन बघितले असता कपाटामध्ये ठेवलेले ५५ हजार रु. सोन्याचे दागिने ज्यात एक तोळ्याचे मिनी गंठण, ८ ग्राम वजनाचे मिनी मंगळसूत्र, ५ ग्राम सोन्याची ठुशी असा एकूण १ लाख ४७ हजाराचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे कळले. तात्काळ त्यांनी याबाबत सोसायटीमध्ये राहणारे शंतनू चौधरी यांना सांगितली असता त्यांनी चौधरी यांनी सागर देवसिंग जोनवाल यांच्याही घरी चोरी झाल्याचे सांगितले. सागर जोनवाल हे ही दि २० रोजी दुपारी बदनापूर येथे गेले असता त्यांना शेजारी राहणारे सदाशिव लांडगे यांनी चोरी झाल्याचे कळवले. जोनवाल यांनी तत्काळ घरी येऊन घरामध्ये साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले पाहणी केली असता, सोन्याचे १२ ग्राम वजनाच्या दोन अंगठ्या, ६ ग्राम वजनाचे गंठण असा एकूण ८५ हजाराचे दागिने त्यांना चिरट्यांनी चोरून नेल्याचे लक्षात आले. याच सोसायटीमध्ये राहणारे योगेश्वर जाधव हेही घनसावंगी येथे ड्यूटी कामी गेले व त्यांची पत्नी मुळगाव तुर्काबाद खराडी येथे मतदान करण्यासाठी गेले होते. त्यांच्याही घरी चोरी झाल्याचे कालिदास भगरे यांनी सांगितले. त्यांनी तत्काळ घरी पोहचून घरात ठेवलेले ६ ग्राम वजनाची सोन्याची आंगठी १० ग्राम वजनाचे मणी मंगळसूत्र, ३ ग्राम कानातील वेल, असा एकूण ९५ हजार रु किमतीचे दागिने जाधव यांचेही चोरट्यांनी लंपास केले. तिघांचा मिळून एकूण ३ लाख २७ हजार रुपये किमतीचे दागिने चिरट्यांनी लंपास केले.

चोरटे सीसीटीव्हीमध्ये वैद

रात्री अडीच वाजेच्या दरम्यान ५ चोरटे बॅग व तोंडाला रुमाल बांधलेल्या अवस्थेत आल्याचे दिसले. हे सर्व चोरटे सोसायटीमध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात वैद झाले आहे. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे.

## बजाजनगरातील खदानींवर अतिक्रमण; प्रशासनाचे दुर्लक्ष



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : वाळूज महानगर हा औद्योगिक परिसर आहे. त्यामुळे या परिसरात वाढती लोकसंख्या पाहता मुलभूत गरजा व राहण्यासाठी जागांचा तुटवडा होत असून, याचा गैरफायदा भूमाफिया घेत असून, शासकीय खदानीवर कब्जा करून अधिकार्यांना हाताशी धरून कोट्यवधी रुपयांच्या खदानी हडप केल्या आहेत. सध्या खदानींच्या टोलेजंग इमारती उभ्या आहेत. इतके होऊनही रमेश मोरे चौकातील खदानीवर या भूमाफियांची कुदृष्टी पडली असून, संपूर्ण खदानीमध्ये मुरुम टाकून गिळंकृत करण्यात आली आहे याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

बजाजनगरातील रमेश मोरे चौकाच्या बाजूला एक मोठी खदान होती, त्या खदानीवर अनेक मातब्बर नेत्यांनी अतिक्रमण करून त्यावर पक्के बांधकाम केलेले आहे. या खदानीच्या जागेवर आजपर्यंत वाहनांचे शोरुम, बँक, प्रिंटिंग प्रेस, ट्रान्सपोर्ट, रुग्णालय आदी उद्योग उभे आहेत. तर काहींकडे या जागेच्या रजिस्ट्रीही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

खदानींची रजिस्ट्रीद्वारे विक्री

याप्रकरणी अधिक चौकशी केली असता, बर्याच जणांकडे या जागेंच्या रजिस्ट्री असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या खदानींच्या जागेवरील शासकीय जागेची रजिस्ट्री कोणी करून दिली? कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नसताना या खदानींची रजिस्ट्री झाली कशी? हा प्रकार एमआयडीसींच्या लक्षात आला नसेल का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. यामागे भूमाफियांसह एमआयडीसी अधिकारी व रजिस्ट्री विभागातील अधिकारी यांचा 'अर्थ'पूर्ण हात असण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

खदान बुजवून ट्रक पार्किंग

रमेश मोरे चौकालगत असलेल्या एका शोरुमच्या पाठीमागे असलेली खदान मुरुम टाकून बुजविण्याचे काम सुरू असून, अर्ध्यापेक्षा जास्त खदान बुजविण्यात आली आहे. या बुजवण्यात आलेल्या खदानीवर सर्रासपणे ट्रक पार्किंग केल्या जात आहेत.

## पैठण विधानसभेसाठी बिडकीन येथे ७५. टक्के मतदान



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २१ नोव्हेंबर पैठण विधानसभा मतदारसंघ ११० निवडणुकीसाठी बुधवार रोजी शांततापूर्ण वातावरणात मतदान पार पडले, विशेष म्हणजे शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत असल्याने या लढतीकडे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे लक्ष लागले आहे, सायंकाळ पर्यंत सरासरी ७५,७१ टक्के मतदान झाले आहे, पैठण तालुक्यातील बिडकीन मधील १५ मतदान केंद्रांवरील १५७५० मतदारां पैकी ११९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असुन एकुण ७५.७१ टक्के मतदान झाले आहे.भाग क्रमांक १७ मधील १३३३ पैकी ९७४ , भाग क्रमांक १८ मधील ८९२ पैकी ६६६ ,भाग क्रमांक १९ मधील ५४७ पैकी ३९९ ,भाग क्रमांक २० मधील १३३७ पैकी १०४८ , भाग क्रमांक २१ मधील ११२६ पैकी ८६२ ,भाग क्रमांक २२ मधील १२८१ पैकी ९८० , भाग क्रमांक २३ मधील ११३२ पैकी ८९३ भाग क्रमांक २४ मधील १२९१ पैकी १००७ , भाग क्रमांक २५ मधील १२९७ पैकी १०१६ , भाग क्रमांक २६ मधील १३४५ पैकी ९६८ , भाग क्रमांक २७ मधील १३६४ पैकी ९४७ , भाग क्रमांक २८ मधील ९२२ पैकी ५७५ , भाग क्रमांक २९ मधील ८८९ पैकी ६६५ , भाग क्रमांक ३१ मधील ६४३ पैकी ५१० तर भाग क्रमांक ३२ मधील ५२९ पैकी ४३१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असुन १५७५० पैकी ११९२५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत ७५.७१ टक्के मतदान केले आहे.यावेळी निवडणूक अधिकारी, शिक्षकांना, महसूल विभाग यांनी मतदान प्रक्रिया पार पडली, यावेळी कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरिक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोउपनि अशोक माने,पोउपनि मनेश जाधव, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,सह पोलीस कर्मचारी यांनी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्व मतदान केंद्रावर चेक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते

## एमएसएमई कडून देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महिला इन्क्युबेटीला (उद्यमी) १५ लाख अनुदान मंजूर

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय (चडचए), भारत सरकार, ने देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महिला इन्क्युबेटीला त्यांच्या इन्क्युबेशन आणि इनोव्हेशन कार्यक्रमांतर्गत १५ लाख अनुदान मंजूर केले आहे. या अनुदानाचा उद्देश महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटरमधून उभरत्या स्टार्टअप्सच्या वाढीस मदत करणे आणि त्यांना अधिक प्रगती करण्यासाठी सक्षम बनविणे आहे.

चडचए आयडिया हॅकाथॉनसाठी देशभरातून एकूण १८,८८८ कल्पना सादर झाल्या. यापैकी ६८० कल्पनांची निवड केली गेली आणि प्रकल्प निरीक्षण व सल्लागार समितीने (झच-उ) ३९७ कल्पनांना निधी मिळवण्यासाठी मंजुरी दिली. होस्ट संस्थेच्या रूपात देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला ११ कल्पना प्राप्त झाल्या, ज्यामध्ये ७ कल्पनांना सादरीकरणासाठी निवडले गेले. यातील २ कल्पनांना निधी मिळवण्यासाठी शिफारस करण्यात आली. या मधून एक कल्पना १५ लाख अनुदान मिळवण्यात यशस्वी ठरली. ही कल्पना 'एअर कुलरमधील वॉटर पंप नियंत्रित करून वीज आणि पाणी वापर कमी करण्यासाठी' संबंधित आहे.

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने नेहमीच नवोन्मेष आणि उद्यमशीलतेला प्रोत्साहन दिले आहे. महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटरने युवा उद्योजकांना त्यांच्या कल्पनांना व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध केले आहे. चडचए कडून मिळालेल्या या अनुदानामुळे महाविद्यालयाच्या उद्यमशीलतेला मान्यता मिळाली आहे आणि स्टार्टअप इकोसिस्टमला अधिक बळ मिळाले आहे. प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली, इन्क्युबीटिंसला योग्य संसाधने, कौशल्यवर्धन आणि व्यवसायाची योग्य दिशा मिळत आहे, ज्यामुळे त्यांना त्यांच्या स्टार्टअप्समध्ये यश मिळवण्यासाठी मदत होणार आहे. डॉ. सचिन अग्रवाल यांनी चडचए ळअ- हॅकथॉनच्या संबंधित स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले आहेत.

चडचए आयडिया हॅकाथॉन कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करण्या बद्दल, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारीणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ. सचिन बोरसे, डॉ. सुगंधा असोदेकर, डॉ. आरती वाढेकर, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, प्रा. संजय कल्याणकर, श्री. अच्युत भोसले, डॉ. राजेश औटी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.